(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

औचित्याच्या मुद्याबाबत

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, काल मी औचित्याच्या मुद्याद्वारे खालच्या सभागृहाच्या संदर्भातील विषय या ठिकाणी उपस्थित केला होता. लोकशाही प्रथेनुसार विधिमंडळाच्या कामकाजामध्ये जसे सत्ताधारी पक्षाचे महत्व आहे तेवढेच महत्व विरोधी पक्षाचे सुध्दा आहे. असे असतांनाही सत्ताधारी पक्षाने बहुमताच्या जोरावर विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना निलंबित करुन मुस्कटदाबी करण्याचा प्रकार केला त्याचा आम्ही काल या सभागृहात उल्लेख केला होता. खरे म्हणजे काल सत्ताधारी पक्षाने जी मुस्कटदाबी केलेली आहे त्याची आम्हाला खंत वाटते. कालचा प्रकार घडल्यानंतर आजच्या वर्तमानपत्रात त्या संदर्भात बातम्या छापून आलेल्या आहेत. वर्तमान पत्रात मथळा देण्यात आले आहे की, "विरोधी पक्षाने खालच्या सभागृहात बहिष्कार टाकला".

खरे म्हणजे यासंदर्भात आपसात बसून, चर्चा करुन मार्ग काढता आला असता. परंतु तसे घडलेले नाही. आपले हे वरिष्ठ सभागृह आहे त्यामुळे मला खेदाने असे म्हणावे लागत आहे की, सभागृह चालविण्याची जबाबदारी सत्ताधारी पक्षाची असते, हे अंदाजपत्रकीय अधिवेशन सुरु असतांना विरोधी पक्षाशी याबाबत चर्चा करुन मार्ग काढणे आवश्यक होते. राज्याच्या वर्षभराच्या प्रगतीची दिशा व वाटचाल अंदापत्रकीय अधिवेशनातून दिग्दर्शित होत असते. असे असताना विरोधी पक्ष सभागृहात असू नये ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. खालच्या सभागृहाच्या कामकाजावर विरोधी पक्षाने बहिष्कार टाकलेला आहे. अशा स्थितीत सभागृहात कामकाज करणे आम्हाला अपेक्षित नाही. म्हणून आज पूर्ण दिवसभरासाठी भाजप व सेना पक्षाच्या वतीने सभागृहाच्या कामकाजावर बहिष्कार टाकीत आहोत एवढेच मला या निमित्ताने स्टेटमेंट करावयाचे आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य बर्हिगमन करतात.)

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर साहेबांनी खालच्या सभागृहात जी घटना घडलेली आहे त्याचा उल्लेख या ठिकाणी केलेला आहे. खालच्या सभागृहात विरोधी पक्षाने अतिशय चुकीच्या पध्दतीचे गैर वर्तन करुन जाणीवपूर्वक गोंधळ घातला होता. त्यामुळेच खालच्या सभागृहाने संबंधित सदस्यांवर जी काही कारवाई करावयाची होती ती केलेली आहे. विरोधी पक्ष नेत्यांनी खालच्या सभागृहाच्या संदर्भातील उल्लेख या सभागृहात केला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

आहे. खरे म्हणजे खालच्या सभागृहाचा येथे काहीही संबंध येत नाही. तरी सुध्दा तशा प्रकारचा प्रयत्न या सभागृहाच्या विरोधी पक्षाने केलेला आहे. काल या सभागृहात सुध्दा विरोधी पक्षाने गोंधळ घातला होता परंतु खालच्या सभागृहाचा उल्लेख करुन या सभागृहात गोंधळ घालण्याचा जो प्रयत्न करण्यात आलेला आहे तो योग्य नाही. आज सुध्दा विरोधी पक्ष नेत्यानी खालच्या सभागृहातील घटनेचा उल्लेख करुन या सभागृहाच्या कामकाजावर बहिष्कार टाकलेला आहे. त्यांनी बहिष्कार टाकावयाचा किंवा नाही याचे स्वातंत्र्य त्यांना आहे. परंतु चुकीची पध्दत, चुकीची परंपरा या सभागृहात विरोधी पक्ष पाळू इच्छितात हे अतिशय वाईट आहे, निषेधार्ह आहे. माझे म्हणणे एवढेच आहे की, खालच्या सभागृहात आपल्या सभागृहापेक्षा वेगळा निर्णय घेतला असतांना सुध्दा आपल्या सभागृहाचे स्वतंत्र अधिवेशन भरवण्यात आलेले आहे, कामकाजाचे दिवस सुध्दा वाढविण्यात आलेले आहेत. विधान परिषदेने एक चांगली परंपरा घालून दिलेली आहे हे आपण विसरता कामा नये. चांगल्या परंपरेला छेद देण्याचे काम विरोधी पक्ष नेते करीत आहेत असे माझे स्वत:चे स्पष्ट मत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.:तोंडी उत्तरे

चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रातील सहा संच बंद पडल्याबाबत

(1) * 13177 **श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.अमरनाथ राजूरकर , श्री.चरणसिंग सप्रा , श्रीमती अलका देसाई , डॉ.सुधीर तांबे , श्री.हुसेन दलवाई , श्री.विजय सावंत , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्रीमती दिप्ती चवधरी , श्रीमती शोभाताई फडणवीस** : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचे सहा संच माहे नोव्हेंबर व डिसेंबर, 2010 ह्या कालावधीसाठी एकाएकी बंद पडून विज पुरवठा बंद झाला होता, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, निकृष्ट प्रतिचा कोळसा हे वीज संच बंद पडण्याचे कारण आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर घटनेची चौकशी करुन पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

श्री. राजेंद्र मुळक, श्री.अजित पवार यांच्या करिता : (1) हे खरे नाही. माहे नोव्हेंबर व डिसेंबर 2010 मध्ये सर्व संच सुरळीत सुरू होते. त्यामुळे वीज पुरवठा खंडीत झाला नाही.

(2), (3) व (4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, छापील उत्तरामुळे माझे समाधान झालेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 13504.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करणेबाबत

(३) * १२९०४ डॉ.सुधीर तांबे ,सर्वश्री.सुभाष चव्हाण ,एम.एम.शेख ,.चरणसिंग सप्रा , राजन तेली , प्रा.सुरेश नवले , सर्वश्री.अशोक ऊर्फ भाई जगताप ,सतीश चव्हाण , हुसेन दलवाई , विजय सावंत , अरुण गुजराथी , ॲड उषाताई दराडे , सर्वश्री.रमेश शेंडगे ,विक्रम काळे , हेमंत टकले , दिपकराव साळुंखे , प्रकाश बिनसाळे , डॉ.निलम गोऱ्हे , डॉ.दिपक सावंत , सर्वश्री.परशुराम उपरकर ,.विनायकराव मेटे

महादेवराव महाडिक : सन्माननीय महिला व बालविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या मानधनात शासनाने केलेली वाढ अत्यल्प असल्याने किमान वेतन कायद्यानुसार वेतन वाढ द्यावी या मागणीसाठी अंगणवाडी सेविकांनी महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कृषि समितीच्या नेतृत्त्वाखाली आझाद मैदान येथे दिनांक २८ डिसेंबर, २०१० रोजी वा त्या सुमारास धरणे आंदोलन केले तसेच परभणी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा आंदोलन करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान,प्रा.वर्षा गायकवाड यांच्याकरिता : (१) हे खरे आहे.

(२) व (३) अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि मिनी अंगणवाडी सेविका यांना जानेवारी, २०११ पासून राज्याच्या निधीतून अनुक्रमे रु.२५०/-, १००/- व २००/- इतके मानधन नुकतेच वाढविण्यात आले आहे. त्यामुळे राज्याच्या निधीतून सध्या मानधनात वाढ करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, उत्तरामुळे माझे समाधान झालेले असल्यामुळे मी उप प्रश्न विचारु इच्छित नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांना मला असे विचारावयाचे आहे की, केन्द्र सरकारने अंगणवाडी कर्मचा-यांच्या मानधनात भरीव वाढ केलेली आहे हे लक्षात घेता राज्य सरकार सुध्दा त्याच धर्तीवर मानधनात मोठी वाढ करणार आहे काय.? या संदर्भात अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली नसल्यामुळे मी हा प्रश्न विचारत आहे.

२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.१२९०४..

प्रा.फौजिया खान : याच वर्षी राज्य सरकारने अंगणवाडी कार्यकर्ती, अंगणवाडी मदतनीस आणि मिनी अंगणवाडी कार्यकर्ती इत्यादींचे मानधन वाढवलेले आहे. केन्द्र सरकारने जी घोषणा केलेली आहे त्या प्रमाणे त्यांचे मानधन वाढविण्यात आले तर अंगणवाडी सेविकांना ४ हजार ५० रुपयापर्यत, मदतनीसाना २ हजार रुपयापर्यत आणि मिनी अंगणवाडी सेविकांना १९५० रुपयापर्यत मानधन द्यावे लागणार आहे. त्याचबरोबर भाऊबीजे निमित्त या कर्मचा-यांना ५०० रुपये अधिक म्हणजेच एक हजार रुपये देण्याचा निर्णयसुध्दा याच वर्षी घेण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बीड जिल्ह्यासह राज्यात परप्रांतीय बोगस डॉक्टरांची संख्या वाढल्याबाबत

(४) * १३९५३ श्री.विनायकराव मेटे : सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यासह संपूर्ण राज्यातील परप्रांतीय डॉक्टरांची संख्या वाढली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बोगस डॉक्टर विरोधी पथकाने आतापर्यंत किती बोगस डॉक्टरांवर गुन्हे दाखल केले आहेत,

(३) असल्यास, बीड जिल्ह्यात पश्चिम बंगालवरून आलेल्या डॉक्टरने पश्चिम बंगालहून १० वी व १२ वीच्या मुलांना आणून तेथील ग्रामीण भागात बोगस दवाखाने टाकून दिले आहेत हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व तद्नुंषगाने पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

डॉ.विजयकुमार गावित : (१) अंशत: खरे आहे.

(२) बीड जिल्ह्यात एकूण ३९ बोगस डॉक्टरांच्या प्रकरणांची नोंद झालेली आहे.

(३) नाही.

(४) होय, बोगस डॉक्टर आढळून आल्यास बोगस डॉक्टरांचा शोध घेण्याकरिता जिल्हा दंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरावर समिती गठीत करण्यात आली आहे. सदर पथक बोगस डॉक्टर आढळून आल्यास चौकशी करुन त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्याची कारवाई करतात.

श्री.विनायकराव मेटे : सभापती महोदय,शासनाच्या भूमिकेबद्दल शंका घ्यावी अशा प्रकारचे विपर्यस्त उत्तर देण्यात आले आहे. मी पहिला प्रश्न असा विचारला होता की, बीड जिल्हयासह संपूर्ण राज्यातील परप्रांतीय डॉक्टरांची संख्या वाढली आहे हे खरे आहे काय ? या प्रश्नाला " अंशत: खरे आहे " असे उत्तर दिले असून दुस-या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, बीड जिल्हयात एकूण ३९ बोगस डॉक्टरांच्या प्रकरणांची नोंद झालेली आहे. हे उत्तर बरोबर

४.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे.यानंतर मी तिसरा प्रश्न असा विचारला होता की," बीड जिल्हयात पश्चिम बंगालवरुन आलेल्या डॉक्टरने पश्चिम बंगालहून दहावी व बारावीच्या मुलांना आणून तेथील ग्रामीण भागात बोगस दवाखाने टाकून दिले आहेत हे खरे आहे काय या प्रश्नाला " नाही " असे उत्तर देण्यात आले आहे . माझ्याकडे तालुका निहाय बोगस डॉक्टर्स असलेल्या गावांची व त्या डॉक्टरांची नावे असलेली यादी आहे . ही यादी मी माननीय मंत्र्यांना देऊ शकतो. गेवराई तालुक्यात मानरभोई, पाचेगाव,या गावात त्याचबरोबर बीड, आष्टी, आणि माजलगाव, आंबेजोगाई या ठिकाणी बोगस डॉक्टर्स आहेत.प्रत्येक तालुक्यामध्ये पाच ते सहा डॉक्टर्स पश्चिम बंगाल मधून आलेले असून "चान्सी दवाखाना" या नावाने त्यांनी दवाखाने उघडलेले आहेत. ते एका ठिकाणी पाच सहा महिने दवाखाने चालवतात आणि नंतर दुस-या ठिकाणी जातात त्या ठिकाणी पुन्हा तीन चार महिने दवाखाने चालवतात आणि तिस-या ठिकाणी जातात. बीड जिल्हयामध्ये त्यांचे मोठया प्रमाणावर रॅकेट निर्माण झालेले आहे. या संदर्भात शासनाने २००४ साली एक समिती गठीत केली आहे परंतु त्या समितीच्या बैठका होत नाहीत. जिल्हाधिकारी या समितीचे अध्यक्ष आहेत आणि डी.सी.पी. हे सदस्य सचिव आहेत. या बैठकीस हे अधिकारी उपस्थित राहत नाहीत आणि जाणीवपूर्वक या बैठकीकडे दुर्लक्ष करतात. या दवाखान्यांमध्ये रुग्णांना वाईट पध्दतीचा उपचार मिळतो व त्यांचा अत्यंत वाईट परिणाम त्या रुग्णांना भोगावे लागतात . या संदर्भात संबंधित बोगस डॉक्टरांच्या विरुध्द शासन कडक कारवाई करणार आहे काय, तसेच या समितीचे पुनर्गटन करण्यात येणार आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले आहे की, या समितीच्या बैंठका होत नाहीत परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, आतापर्यत या समितीच्या २४ बैठका झालेल्या आहेत. तीन महिन्यातून एकदा बैठक घ्यावी असे अभिप्रेत असल्यामुळे त्या प्रमाणे त्यांनी बैठका घेतलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न असा विचारला आहे की, पश्चिम बंगालमधून बोगस डॉक्टर्स येथे आलेले आहेत आणि ते अनधिकृतपणे प्रॅक्टीस करीत आहेत. एकूण ३९ बोगस डॉक्टरांच्या विरुध्द कारवाई केलेली आहे. त्यांच्या नावावरुन पश्चिम बंगाल मधून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोणीही डॉक्टर आलेले नाहीत असे दिसून येते. या समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी हे डेसिग्नेटेड अध्यक्ष असल्यामुळे एका जिल्हाधिका-यांची दुस-या ठिकाणी बदली झाल्यास त्या जागेवर येणारे दुसरे जिल्हाधिकारी त्या समितीचे अध्यक्ष म्हणून काम पाहातात त्यामुळे या समितीचे पुर्नगठन करण्याची गरज नाही..

नंतर श्री.सरफरे

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13953...

डॉ. विजयकुमार गावित...

त्या उपरांत तालुका पातळीवरील समितीच्या माध्यमातून जिल्हा पातळीवर विस्तार अधिकारी किंवा अन्य अधिकारी संबंधित गावांना भेट देऊन त्याठिकाणी डॉक्टरी व्यवसाय करणाऱ्यांकडून प्रमाणपत्र मागवून घेऊन ते तपासण्याचे काम करतात. जर तपासणीमध्ये त्यांना बोगस प्रॅक्टिस करीत असल्याचे आढळल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाते अशाप्रकारची पध्दत आहे.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, विधानसभा असो किंवा विधान परिषद असो या दोन्ही सभागृहांमध्ये बोगस डॉक्टरा संबंधीचा प्रश्न दरवर्षी विचारण्यात येतो. याठिकाणी शासन असे म्हणते की, त्या संदर्भातील प्रकरणांची नोंद घेतली, म्हणजे काय केले, त्यांच्यावर आपण कारवाई करणार काय, त्या संदर्भात परिणामकारक उपाय योजना हे शासन करणार आहे काय?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, यापूर्वी खाजगी प्रॅक्टिस करणाऱ्या डॉक्टर्सना प्रतिबंध करण्यासाठी कायद्यात बदल करण्यात आला. त्यामध्ये पूर्वी 1 हजार रुपयापासून 5 हजार रुपयापर्यंत शिक्षा केली जात होती, आता त्या शिक्षेमध्ये वाढ करुन ती 2 हजार रुपयापासून 10 हजार रुपयापर्यंत वाढविली आहे. त्याचप्रमाणे यापूर्वी त्यांना 2 वर्षाची शिक्षा करीत होतो, आता दुसऱ्या टप्प्यामध्ये जर ते डॉक्टर पुन्हा प्रॅक्टिस करीत असतील तर त्यांना 10 वर्षापर्यंत शिक्षा करण्याची तरतूद ठेवण्यात आली आहे.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीला फिल्डवर काय घटना घडतात याची माहिती नसते. नेहमी हस्तीदंत मनोऱ्यामध्ये बसून कारभार चालविणाऱ्या या अधिकाऱ्यांना प्रत्यक्षात गावात काय चालते याची माहिती नसते. याकरिता या समितीवर अशासकीय सदस्यांचा अंतर्भाव करणार काय?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, या समितीवर अशासकीय सदस्य आहेत. त्यामध्ये इंडियन मेडिकल असोसिएशन, बीडचे अध्यक्ष आहेत, त्याचप्रमाणे श्री. जयंत लहूकर आहेत, श्री. शेख सिराज शेख आयूब हे सदस्य आहेत.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, बोगस डॉक्टर्सची संख्या दिवसें दिवस वाढत असल्याच्या तक्रारी महाराष्ट्रामधून येत आहेत. या संदर्भात माझा असा प्रश्न आहे की, या डॉक्टर्सना दवाखाना स्थापन करण्यासाठी महानगरपालिका किंवा नगरपालिकेकडून शॉप्स अँड एस्टॅब्लिशमेंटचे लायसन्स आवश्यक असते ते त्यांना सहज मिळते. त्यापूर्वी त्यांच्याकडील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ ST/

ता.प्र.क्र. 13953...

श्री.प्रकाश बिनसाळे....

प्रमाणपत्रांची तपासणी आपल्या विभागामार्फत करुन तशाप्रकारचे आपल्या विभागाचे प्रमाणपत्र त्यांना देण्यात आल्यानंतर महानगरपालिकेने त्यांना लायसन्स द्यावे अशाप्रकारची तरतूद आपण कायद्यामध्ये केली तर असे बोगस दवाखाने उघडले जाणार नाहीत आणि हा प्रश्न देखील उद्भवणार नाही. त्यादृष्टीने हे शासन पावले उचलणार आहे काय?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, जे डॉक्टर्स खाजगी प्रॅक्टिस करतात त्यांनी रजिस्ट्रेशन केले पाहिजे तसेच हॉस्पिटलचेही रजिस्ट्रेशन केले पाहिजे. हे हॉस्पिटल किंवा दवाखाना महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये येत असेल किंवा तालुक्यामध्ये असेल तर त्या त्या स्तरावर नेमण्यात आलेल्या समितीमार्फत त्याची तपासणी होऊन संबंधितावर कारवाई केली जाते.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, वैद्यकीय क्षेत्रातील आरोग्य सेवा ग्रामीण भागापर्यंत द्यावयाची असल्यामुळे तिचा दर्जा निश्चितपणे संभाळला गेला पाहिजे. या करिता शासनाने जिल्हा पातळीवर व तालुका पातळीवर समित्यांची रचना केली आहे. अचानकपणे धाडी टाकण्यासाठी इतर विभागामध्ये भरारी पथकांची निर्मिती करण्यात आली आहे, परंतु त्यामध्ये स्थानिक अधिकारी प्रस्थापित झाले असल्यामुळे त्यांच्यावर योग्य प्रकारे नियंत्रण ठेवले जात नाही. या करिता अशा भरारी पथकामध्ये जिल्हयाबाहेरील एकमेकांशी संबंध नसलेल्या वेगवेगळया विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश आपल्याला करता येईल काय, अशा भरारी पथकामार्फत अचानक तपासणी मोहिम हाती घेऊन कारवाई करता येईल काय? लोकांकडून तक्रारी येण्यापूर्वी अशाप्रकारचे प्रिव्हेंटीव्ह उपाय केले तर या प्रश्नाकडे हे शासन अधिक चांगल्या रितीने बघू शकेल, तशा प्रकारची एक टीम करण्या बाबत शासन विचार करील काय?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, होय.

श्री. विनायकराव मेटे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आता जिल्हा समित्यांच्या बैठका बऱ्याच वेळा झाल्याचे सांगितले. वास्तविक दर तीन महिन्यामधून एकदा जिल्हा समितीची बैठक घेण्यात आली पाहिजे. परंतु या जिल्हा समितीची गेल्या वर्षी सन 2010 मध्ये एकही बैठक झालेली नाही हे मी या ठिकाणी खात्रीपूर्वक सांगतो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशोधित प्रत/ग्रंथपालांसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ही बैठक तीन महिन्यातून एक वेळा होणे अपेक्षित आहे. 2009 मध्ये फक्त दोन बैठका झाल्या. परंतु या बैठकीसाठी कोणीही वरिष्ठ अधिकारी हजर रहात नाहीत हा एक मूळ प्रश्न आहे. त्यामुळे या समितीकडे पहाण्याचा दृष्टीकोन असा आहे हे आपल्याला समजते. दुसरे म्हणजे मुळामध्ये असा प्रश्न आहे की, जे बोगस परप्रांतीय डॉक्टर आहेत, त्यांनी निश्चितपणे काही काम केलेले आहे. परंतु त्यांच्या संदर्भात एकंदर 39 प्रकरणे कोर्टामध्ये प्रलंबित आहेत. याचे एक कारण असे आहे की, बोगस डॉक्टरांची व्याख्या थोडीशी ब्रॉड असल्यामुळे याबाबत खरी अडचण येत आहे. शासनाने काही जी.आर.काढून आयुर्वेद झालेल्या डॉक्टरांना सुध्दा उपचार करण्यासाठी परवानगी दिलेली आहे. त्याचा फायदा हे डॉक्टर घेतात आणि मग केसेस कोर्टामध्ये जातात, त्यानंतर त्यांना थोडा दंड करण्यात येतो किंवा ती प्रकरणे प्रलंबित रहातात आणि परत ते डॉक्टर दुसऱ्या ठिकाणी जाऊन प्रॅक्टीस सुरु करतात. म्हणून शासन बोगस डॉक्टरांच्या संबंधातील व्याख्या निश्चितपणे करणार आहे काय ? त्यानुसार जे बोगस डॉक्टर असतील त्यांना वगळण्याचे काम करणार आहात काय ? हा माझा दुसरा प्रश्न आहे. तसेच मी याठिकाणी यादी सांगू इच्छितो की, गेवराई मध्ये "मादळमोही, पाचेगाव", आष्टीमध्ये "हरिनारायण आष्टा, आष्टी, धामणगांव" माजलगांव मध्ये "माजलगाव शहर आणि परिसर, दिंद्रुड, कुप्पा, बीड मध्ये "चौसाळा", अंबेजोगाई इ. ठिकाणी आता राजरोसपणे बोगस दवाखाने सुरु आहेत. माझा असा प्रश्न आहे की, त्याठिकाणी संबंधित अधिकारी जाऊन याबाबत शहानिशा करुन कारवाई करतील काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आता ज्या गावांची नावे वाचून दाखविलेली आहे, ती यादी माझ्याकडे द्यावी. त्याबाबत आजच तेथील संबंधित अधिकाऱ्यांना फॅक्स केला जाईल आणि ते अधिकारी त्याठिकाणी जाऊन इन्स्पेक्शन करतील आणि योग्य ती कारवाई करतील. दुसरी बाब म्हणजे ज्या वेगवेगळया पॅथी आहेत म्हणजे ॲलोपॅथी असेल, आयुर्वेदीक असेल. त्यामुळे संबंधित डॉक्टरांनी ज्या पॅथीमध्ये डिग्री घेतली असेल, त्याप्रमाणेच संबंधित डॉक्टरांना कायद्याप्रमाणे तेवढीच प्रॅक्टीस करता येते, दुसरी प्रॅक्टीस करता येत नाही. त्यामुळे संबंधितांनी ज्या पॅथीचे शिक्षण घेतले असेल, त्याच्या व्यतिरिक्त इतर पॅथीचा जो अभ्यासक्रम असतो त्याची जर प्रॅक्टीस करीत असतील तर निश्चितपणे त्याबाबत कारवाई केली जाते.सन्माननीय सदस्यांनी तिसरा प्रश्न उपस्थित करताना सांगितले की,"तीन महिन्यातून एक वेळा बैठक होणे अपेक्षित आहे. 2009 मध्ये फक्त दोन बैठका झाल्या. परंतु या बैठकीसाठी कोणीही ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वरिष्ठ अधिकारी हजर रहात नाहीत." मी सदरहू बैठकांच्या तारखा निश्चितपणे तपासून घेतो आणि जर तीन महिन्याच्या आत बैठका झाल्या नसतील तर यापुढे अशा प्रकारच्या बैठका निश्चितपणे घेतल्या पाहिजेत, नाहीतर याबाबत कारवाई करण्यात येईल अशा पध्दतीचे आदेश देऊ.

. . . .डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(5) * 12718 श्री.वसंतराव खोटरे, श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.विक्रम काळे : दिनांक 10 डिसेंबर, 2010 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्र.23 मधील प्रश्न क्रमांक 2628 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सिध्दबेट या पर्यटन तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास करणेबाबत शासन निर्णय क्र.तिक्षेवि/2010-प्र.क्र.13-का-1444 दिनांक 06 जुलै, 2010 अन्वये सिध्दबेट स्थळाच्या विकासासाठी (शासन निर्णयातील जोडपत्र 3 मधील अनुक्रमांक 10) रु.25 कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, नियोजन विभागामार्फत सिध्दबेट विकास आराखड्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(3) असल्यास, प्रस्तुत आराखड्यात दर्शविल्याप्रमाणे प्रत्यक्ष बांधकामास मंजुरी मिळाली आहे, हे ही खरे आहे काय,
(4) नसल्यास, याप्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेंद्र मुळक, श्री.अजित पवार यांच्याकरिता : (1) होय.
(2), (3) व (4) सिध्दबेट स्थळाच्या विकासाबाबत आराखड्यात समाविष्ट असलेल्या कामांची अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही आराखड्यासाठी नियुक्त केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारामार्फत सुरु आहे.आराखड्यानुसार इंद्रायणी नदीच्या तीराकडील संरक्षक भिंतीच्या बांधकामामध्ये सिध्दबेटास लागून असलेल्या कोल्हापूर बंधाऱ्यातील पाण्याचा फुगवटा आणि साखळी क्र.0 ते 420 मीटर पर्यंत असलेली झाडेझुडपे व सिध्दबेटाचा काळ्या मातीचा परिसर इ. अडचणी उद्‌भवल्याने त्या संदर्भात कार्यवाही करुन प्रस्तावित कामे करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, श्री क्षेत्र सिध्दबेट हे संत ज्ञानेश्वर महाराज व त्यांच्या भावंडांचे जन्मस्थान आहे. एक वास्तव भूमी आहे, अति प्राचीन जागतिक पर्यटन क्षेत्र आहे, दलित, रंजले-गांजले यांची ही भूमी आहे. म्हणून या क्षेत्राचा विकास व्हावा म्हणून संत वासुदेव महाराज, आकोट आणि त्यांच्या वारकऱ्यांनी हा मुक्ती लढा सुरु केलेला आहे. त्याठिकाणी अनेक आंदोलने, धरणे आंदोलन करुन, संघर्ष करुन सिध्दबेट मुक्त केले. त्याच्या विकासासाठी त्यावेळचे पालक मंत्री आणि आजचे आदरणीय माननीय श्री.अजितदादा पवार साहेब तसेच त्यावेळचे कलेक्टरसाहेब यांनी त्या तीर्थक्षेत्राचा विकास व्हावा म्हणून निधी देण्याचे कबूल केले होते आणि दि.6 जुलै 2010 च्या शासन निर्णयाप्रमाणे या सिध्दबेटासाठी 25 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला.मी प्रथम शासनाचे अभिनंदन करतो की, मागच्या आठवड्यामध्ये जो अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे,त्यामध्ये संत गजानन महाराज शेगाव, मोजरी आणि इतर जी तीर्थक्षेत्र आहेत, त्यांच्यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.परंतु सिध्दबेट तीर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे . . . .

25 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. शासन निर्णयाप्रमाणे जी कामे करावयाची आहेत, त्याअनुषंगाने जे प्रारुप तयार केलेले आहे त्या साठी किती निधी उपलब्ध करुन दिला आणि आजपर्यंत त्या कामाची सद्यस्थिती काय आहे ? तेथे येणारे वारकरी आहेत त्यांच्या अशा भावना आहेत की, सिध्दबेटाचे काम झाले पाहिजे. तेथील काम लवकरात लवकर झाले तर तेथे येणाऱ्या भाविकांची सोय होईल. म्हणून हे काम ताबडतोब सुरु करावे. त्यासाठी किती निधी प्राप्त झाला आणि जर निधी प्राप्त झाला नसेल तर तो ताबडतोब उपलब्ध करुन त्या कामाची सुरुवात करणार आहात काय ?

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12718...

श्री अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. खोटरे यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे, त्या संदर्भात दिनांक 6 जुलै, 2010 रोजी जो आदेश काढला होता, त्यामध्ये एकूण 25 कोटी रुपये निधी, या कामासाठी खर्च करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. शासनाकडे आज देखील हा निधी आहे. हा निधी खर्च करण्यास काही अडचण नाही. श्रीक्षेत्र आळंदी विकास कार्यक्रमांतर्गत सिध्दबेट येथील विविध विकास कामासाठी शासन सहभागातून 25 कोटी रुपये एवढा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, पार्किंग, पिण्याच्या पाण्याची व स्वच्छता गृहांची सुविधा, उद्यान, पर्णकुटी, प्रसादालय, ध्यान मंदिर,ज्ञानेश्वर महाराज यांचे माता-पिता व भावंडाचे स्मारक आणि इंद्रायणी तीराच्या उत्तरेकडील सिध्दबेटाच्या बाजूला साधारणपणे 690 मीटर लांब आणि 9 मीटर उंचीची संरक्षण भिंत बांधण्याचे ठरलेले होते. याबाबतीत एक अंदाज पत्रक मेसर्स पिलग्रीमेज डेव्हलपमेंट ग्रुप, पुणे यांची या आराखडयासाठी नियुक्ती केलेली होती आणि प्रकल्प व्यवसाय सल्लागार म्हणून त्यांनी त्या ठिकाणी काम सुरु केलेले होते. त्यानंतर एक गोष्ट लक्षात आली की, हा सिध्दबेटचा एकूण परिसर साधारणपणे 12 एकर 30 गुंठे म्हणजे 5 हेक्टर 10 आर इतका आहे. सिध्दबेट परिसर हा ग्रीनबेटमध्ये येतो, हे या ठिकाणचे काम सुरु करताना लक्षात आले. ज्यावेळी राज्य सरकारमार्फत निधी खर्च करण्यात येतो त्यावेळी अशा प्रकारच्या अडचणी आल्या तर त्याबातीत रीतसर परवानगी घेतल्या शिवाय पुढे जाता येत नाही. या ठिकाणी ग्रीनबेल्ट येत आल्यामुळे पुढे काय करावयाचे याबाबतचा विचार करण्यात आला. हा परिसर ग्रीनबेल्ट मध्ये येत असल्यामुळे सध्या या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व स्वच्छता गृहांची सुविधा, उद्यान, पर्णकुटी, पार्किंग. पार्किंगला जास्त खर्च येत नाही,फक्त त्या ठिकाणी झाडे लावावी लागतात. म्हणून एवढीच कामे घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याचे कारण असे की, अलीकडच्या काळात माहितीच्या अधिकारातून बरेच जण माहिती घेत असतात, त्यामुळे पुन्हा त्याठिकाणी अधिकाऱ्यांची अडचण होते, तेथे काम करणाऱ्या कॉन्ट्रॅक्टरची अडचण येते. म्हणून एवढीच कामे त्या ठिकाणी करण्याचे ठरविलेले आहे. याबाबतीत सविस्तर आराखडा तयार करुन, मंजूर तरतुदीमध्ये बदल करण्याचे स्वतंत्र प्रस्ताव स्थानिक पातळीवरुन शासनाकडे पाठविण्यात आलेले आहेत. शासन त्याला तातडीने

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री अजित पवार.....

मंजुरी देईल. त्याबाबतीत अडचण येणार नाही. या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये या कामासाठी 85 कोटी रुपये तरतूद करण्यात आलेली आहे. सुरुवातीला रु. 140 कोटी, आता संपणाऱ्या वर्षात रु. 140 कोटी आणि पुढच्या वर्षी रु. 85 कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे या कामासाठी निधीची अडचण नाही. परंतु हा परिसर ग्रीनबेल्टमध्ये येत असल्यामुळे या ठिकाणच्या कामाच्या बाबतीत काही अडचणी निर्माण झालेल्या आहेत. त्यामुळे पहिल्या टप्प्यात काही कामे घेतली जातील, त्यानंतर ग्रीनबेल्ट उठविण्याच्या दृष्टिकोनातून काही निर्णय घेता आले तर पुढची कामे घेतली जातील. पण ग्रीनबेल्ट उठविण्यामध्ये खूपच कायदेशीर अडचणी आल्या तर मी सुरुवातीलाच सांगितल्याप्रमाणे तेवढीच कामे, साधारणपणे 10 कोटी रुपयांची कामे घेण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. पंधरा कोटी रुपयांची कामे घेतली जाणार नाहीत. या ठिकाणची सगळीच कामे कशी करता येतील यादृष्टीने राज्य शासन प्रयत्न करील. परंतु ग्रीनबेल्ट जोपर्यंत उठत नाही, तोपर्यंत मात्र पहिल्या टप्प्यातील 10 कोटी रुपयांच्या कामाचा जो स्वतंत्र प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे, त्याला तातडीने मान्यता दिली जाईल आणि ती कामे तातडीने हाती घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल. यासाठी जो निधी देण्यात आलेला आहे तो पुणे विभागीय आयुक्तांच्या नियंत्रणाखाली खर्च केला जातो. त्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. कामे दर्जेदार व्हावीत, भाविकांची उत्तम प्रकारची सोय व्हावी, संत तुकाराम महाराजांच्या जन्म शताब्दीला 400 वर्षे पूर्ण

झाल्या बद्दल त्यावेळचे मुख्यमंत्री सन्माननीय श्री. विलासराव देशमुख यांनी जो निर्णय घेतला होता, त्याची अंमलबजावणी मर्यादित काळात व्हावी, त्यामध्ये देहू, आळंदी, भंडारा डोंगर, पंढरपूर आणि आता सन्मानीय सदस्य श्री. वसंतराव खोटरे यांनी ज्या गावांचा उल्लेख केलेला तो ही सिध्दबेटचा भाग त्यामध्ये येतो.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या उत्तराने माझे समाधान झालेले आहे. परंतु माझा प्रश्न असा आहे की, या सिध्दबेटामध्ये असंख्य देवळे, मंदिरे आणि काही स्मारके होती ती उद्ध्वस्त झालेली आहेत. त्यामुळे त्याच ठिकाणी त्यांची पुनर्बांधणी केली तर त्याला काही अडचण येईल काय? मंत्री महोदयांनी या ठिकाणी सांगितले की, त्या ठिकाणी ध्यान मंदिर बांधावयाचे आहे तर मग या ठिकाणची उद्ध्वस्त झालेली मंदिरे आणि स्मारके बांधण्यास काही अडचणी येतील काय?

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12718...

श्री अजित पवार.....

श्री. अजित पवार : सभापती महोदय, मी सुरुवातीलाचा सांगितले की, हा परिसर ग्रीनबेल्टमध्ये येतो असे लक्षात आल्यामुळे त्या ठिकाणी कुठल्याही प्रकारचे नवीन बांधकाम करावयाचे असेल तर ग्रीनबेल्टच्या बाबतीत जे नियम व अटी असतात.....

यानंतर श्री. बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या नियमांचे आणि अटींचे कोणतेही उल्लंघन होणार नाही अशा प्रकारची खबरदारी घेऊन पहिल्या टप्प्यामध्ये जी कामे करता येतील ती करण्याचा प्रयत्न आहे. ती कामे तातडीने करण्याच्या सूचना सुध्दा दिलेल्या आहेत. निधीची कमतरता नाही. त्या ठिकाणी थोडीशी काळी जमीन असल्यामुळे पाया खूप खोलवर खणावा लागतो त्यामुळे त्याचाही खर्च थोडा जास्त आहे. त्याही गोष्टी त्या ठिकाणी बघितलेल्या आहेत. बेटाचा परिसर काळ्या मातीचा आहे. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर झाडेझुडपे आलेली आहेत. या सगळ्या गोष्टींचा विचार करुनच त्या आराखड्यामध्ये हे क्षेत्र कसे विकसित करावयाचे, प्रस्तावित कामे कशा पध्दतीने घ्यावयाची या सगळ्यांचे नियोजन केलेले आहे. मी स्वत: देखील या बाबतीत वरचेवर बैठका घेऊन ही सगळीच कामे वेळेवर कशी पूर्ण होतील, दर्जेदार कशी होतील, भाविकांची आणि नागरिकांची यातून सोय कशी होईल या दृष्टीने प्रयत्न केला जाईल.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी आपल्या वित्तीय प्रपोजल्समध्ये सर्व विकास कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या माध्यमातून पर्यटनाची वाट निश्चितपणे होणार आहे. या संदर्भात माझा धोरणात्मक प्रश्न आहे. आपण सिध्दबेट परिसराचा विकास करण्यासाठी विकास आराखडा तयार करुन त्याप्रमाणे विकास करण्यासाठी एजन्सीची नेमणूक केली. पर्यटनाला प्रोत्साहन देण्याची एक पध्दत आहे. महाराष्ट्रामध्ये पर्यटनाची वेगवेगळी साधने आहेत. वन पर्यटन असेल, समुद्रकिनारे असलेल्या कोकणातील पर्यटन असेल, इको टुरिझम असेल, शेतीच्या संदर्भातील पर्यटन असेल, या वेगवेगळ्या पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी शासन पुढील काळामध्ये कालबध्द पध्दतीचा कार्यक्रम करणार का ? या सर्व पर्यटन स्थळांचा विकास आराखडा कालबध्द मर्यादित वेळेमध्ये पूर्ण करुन घेऊन त्यासाठी पाच वर्षाची एक विस्तृत योजना पुढील काढात करणार का, जेणेकरुन महाराष्ट्रामध्ये पर्यटन वाढेल आणि लोकांच्या हातामध्ये आर्थिक सुबत्ता पोहोचेल ? हे जे वेगवेगळे विकास आराखडे आहेत त्यामध्ये खाजगी लोकांना या पर्यटनाच्या ठिकाणी सुविधा निर्माण करण्यासाठी शासन वेगळ्या पध्दतीचे प्रोत्साहन देणार आहे का ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पुणे व नाशिक जिल्ह्यात बनावट सी फॉर्मद्वारे झालेला गैरव्यवहार

(६) * १४०११ श्री.मोहन जोशी , श्री.एम.एम.शेख , श्री.सुभाष चव्हाण , श्रीमती अलका देसाई , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , डॉ.सुधीर तांबे , श्री.हुसेन दलवाई , श्री.विजय सावंत , श्रीमती दिप्ती चवधरी : तारांकित प्रश्न क्रमांक १०५०२ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व नाशिक जिल्ह्यात बेरोजगार युवकांच्या नावाने करनोंदणी क्रमांक घेऊन बनावट सी फॉमद्वारे विक्रीकर चुकवून लाखो रुपयांच्या गैरव्यवहाराची व्याप्ती वाढत असल्याचे माहे डिसेंबर, २०१० मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणात दोषी आढळून येणाऱ्याविरुध्द कठोर कारवाई करण्याबाबत तसेच विक्रीकर चुकविण्याचे प्रकार रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेंद्र मुळक, श्री.अजित पवार यांच्याकरिता : (१) हे खरे आहे.

नाशिक येथे डिसेंबर, २०१० मध्ये अन्वेषण भेटी दरम्यान ७११ बनावट सी फॉर्म मिळाल्यामुळे नाशिक, पुणे व महाराष्ट्रातील अन्य जिल्ह्यांमध्ये १३६ टाईल्स व्यापाऱ्यांना अन्वेषण भेटी देण्यात आल्या आहेत.

(२) होय.

(३) महाराष्ट्रातील १३६ टाईल्स व्यापाऱ्यांना अन्वेषण शाखेमार्फत भेटी देण्यात आल्या असून, ३७ व्यापाऱ्यांच्या बँक खात्यावर टाच ठेवण्यात आलेली आहे, ६५ व्यापाऱ्यांविरुद्ध व ३ कर सल्लागारांविरुद्ध पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. अद्यापपर्यंत आगाऊ करभरणा म्हणून अंदाजे रु.३.८३ कोटी इतकी कराची वसुली करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्रातील सर्व अपर विक्रीकर आयुक्त यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व अधिकाऱ्यांना विक्रीकर आयुक्तांच्या दिनांक २२.१२.२०१० च्या परिपत्रकान्वये क नमुन्यातून होणाऱ्या करचुकवेगिरीबाबत घ्यावयाच्या खबरदारीच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) लागू नाही.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्याच्या आणि बेरोजगार असणाऱ्यांच्या नावावर विक्रीकर नोंदणी करुन बनावट 'सी' फॉर्मव्दारे आंतरराज्यीय व्यापारातून कोट्यवधी रुपयांचा शासनाचा महसूल या लोकांनी चुकविलेला आहे. ही टोळी केवळ या राज्यापुरती नसून त्यांनी अनेक राज्यांमध्ये अशा प्रकारची साखळी निर्माण करुन आपल्या महाराष्ट्र राज्याचे नुकसान केलेले आहे. ही गोष्टी ऑगस्ट, 2010 ला उघडीस येण्याच्या आधी किती वर्षापासून हा प्रकार सुरु आहे, यामुळे शासनाचे जे नुकसान झाले त्याला कोण जबाबदार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 14011 .... श्री. मोहन जोशी ....

आहे, सन 2001 पासून या 'सी' फॉर्मची तपासणी करुन संबंधितांवर गुन्हे दाखल करणार का, अशा प्रकारचे गुन्हे पुन्हा घडू नयेत म्हणून शासन कायम स्वरुपी काय उपाययोजना करणार आहे, खरे म्हणजे हा फौजदारी गुन्हा आहे. त्यांच्यावर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करताना भारतीय दंड संहितेची कोणती कलमे लावलेली आहेत ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, या बाबतीत थोडी सविस्तर माहिती सभागृहाला देणे आवश्यक आहे. जो सी फॉर्म आहे त्या संबंधी मी थोडक्यात माहिती सांगतो. केंद्रीय विक्रीकर कायद्याच्या तरतुदीनुसार आंतरराज्यीय व्यापारामध्ये एका राज्यातील खरेदीवर दुसऱ्या राज्यातील विक्रेत्याला कराच्या दरातील सवलत मिळण्याच्या उद्देशाने नमुना देऊन कर दरातील सवलत मिळू शकते या संबंधीचा हा फॉर्म असतो. सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबत मी सांगू इच्छितो की,

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14011.... श्री.राजेंद्र मुळक....

विक्रीकर खात्याकडून प्राप्त झालेल्या खात्रीलायक माहितीनुसार कोहिनूर ट्रेडिंग कंपनी, पुणे या व्यापाऱ्याच्या नावाने मोरबी, गुजरात येथून येणारा टाईल्सचा ट्रक पुण्याला न येता तो परस्पर नाशिक येथील मे.सोना मार्केटिंग या व्यापाऱ्याकडे उतरविला जात असताना 5 ब्लॅंक 'सी' फॉर्म सापडले. याबाबत संपूर्ण माहिती घेऊन तेथे रेड टाकल्यानंतर आणखी माहिती मिळाली. मोरबी, गुजरात येथे इटालिका फ्लोअर टाईल्स लिमिटेड या व्यापाऱ्याबरोबर खोट्या 'क' नमुन्याद्वारे व्यवहार केल्याची माहिती मिळाली. तेथेही रेड टाकल्यानंतर 31 ब्लॅंक 'सी' फॉर्मस् सापडले. त्या रेडमध्येही अधिक माहिती मिळाली. त्यामुळे विभागाने यासंबंधी सखोल माहिती घेण्याचा प्रयत्न केल्यावर 18 डिलर्सची माहिती मिळाली. त्यात महाराष्ट्रातील विविध ठिकाणी 14 व्यापाऱ्यांकडून 'क' नमुन्याद्वारे गैरव्यवहार होत असल्याचे दिसून आले. या 14 व्यापाऱ्यांकडून खरेदी व विक्रीची नोंदणी न करता कर चुकवेगिरीची शक्यता लक्षात घेऊन 14 व्यापा-यांच्या ठिकाणी भेटी देण्यात आल्या. या अनुषंगाने विक्रीकर आयुक्त, गुजरात राज्य यांच्याकडे सन 2008-09, सन 2009-10 व सप्टेंबर, 2010 पर्यंत मोरबी येथून टाईल्सची खरेदी केलेल्या सर्व व्यापाऱ्यांची यादी पाठविण्याची विनंती करुन माहिती मिळविण्यात आली. त्या यादीमध्ये मुंबई, पुणे, नागपूर, अहमदनगर, कोल्हापूर, गोंदिया याठिकाणी अद्यापपर्यंत 136 टाईल्स व्यापाऱ्यांचा उपलब्ध अन्वेषण शाखेकडून रेड टाकण्यात आल्या, त्या रेडस्मध्ये सेल्स टॅक्स प्रॅक्टीशनर्सची माहिती घेतली, त्यामध्ये दिनेश भावसार, कृष्णा रावल, पुणे येथील सुनील भलाई, आर.बी.शाह, जांभळे या सर्वांची चौकशी करण्यात आली. रावल यांच्या संदर्भात 48 प्रकरणांमध्ये तक्रार प्राप्त झाल्यावर 65 डिलर्सवर आयपीसी अंतर्गत कलम 420, 467, 468, 471, 472 आणि 34 अनुसार गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, हे रॅकेट नाशिकमध्ये उघडकीस आले. पुणे व नागपूर येथे शासनाने धाडी टाकल्या. केंद्र सरकारच्या अंतर्गत येणारा हा 'सी' फॉर्म आहे. हे आंतरराज्य रॅकेट आहे. त्यामुळे टाईल्स विकणाऱ्या व्यापाऱ्यांपुरते हे रॅकेट मर्यादित असण्याची शक्यता कमी आहे. हे सर्व प्रकार उघडकीस आले आहेत याचा अर्थ यापूर्वी चार्टर्ड अकाउंटण्ट,

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व्यापारी व अधिकारी यांच्या संगनमताशिवाय हे शक्य झालेले नाही. ज्या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये हे गुन्हे घडले आहेत त्या अधिकाऱ्यांना दोषी धरुन, त्यांना निलंबित करुन, त्यांची चौकशी शासनाने सुरु केलेली आहे काय, हा आंतरराज्य प्रश्न आहे. या प्रश्नाची व्याप्ती मोठी असण्याची शक्यता आहे, शासन एका वेगळ्या अँगलने चौकशी करीत आहे. परंतु संपूर्ण राज्यात या प्रश्नाची व्याप्ती असणार आहे. या गैरव्यवहारामुळे शासनाचा हजारो कोटींचा महसूल बुडाला असल्यामुळे, या सर्व प्रकरणाची सीआयडीमार्फत चौकशी केली जाईल काय ?

श्री.अजित पवार : सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत मी त्यांना सांगतो की, गुजरात राज्यामध्ये, महाराष्ट्र राज्यामध्ये या 'क' फॉर्मसंबंधी रॅकेट आहे असे आमच्या विक्रीकर विभागाच्याच लक्षात आले. त्यामुळे त्याबाबत चौकशी करीत असताना कोणालाही पाठीशी घालण्याचा सरकारने प्रयत्न केलेला नाही. उलट कधीकधी तो विभाग व्यवस्थितपणे काम करीत असताना सीआयडीकडे एखाद्या प्रकरणाची चौकशी सोपविणार काय, अन्य तपास यंत्रणेमार्फत चौकशी केली जाईल काय असे बोलले जाते. त्याप्रमाणेच सन्माननीय सदस्यांनी आपले मत मांडलेले आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विक्रीकर विभागाने जर या प्रकरणी व्यवस्थितपणे लक्ष दिले नसते तर ही चौकशी दुसरीकडे देणे उचित ठरले असते. सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी सांगितल्याप्रमाणे हा सगळा प्रकार प्रथम नाशिकला उघडकीस आला. अन्वेषणामध्ये 711 बनावट "सी" फॉर्म लक्षात आले. त्यानंतर महाराष्ट्रातील 136 टाईल्स व्यापा-यांना अन्वेषण शाखेमार्फत भेटी देण्यात आल्या. त्यामध्ये 37 व्यापा-यांची बँक खाती गोठवण्यात आली. आतापर्यन्तच्या अन्वेषणानुसार 185 कोटीच्या विक्रीच्या व्यवहारावर 26 कोटीची कर चुकवेगिरी करण्यात आलेली आहे. त्यामधील 3.83 कोटी इतक्या कराची वसुली करण्यात आलेली आहे. पुढील अन्वेषण सुरु आहे. राज्य मंत्री महोदयांनी सांगितल्या प्रमाणे 63 व्यापा-यांवर कोणत्या कलमाखाली खटले भरलेले आहेत हे सांगितलेले आहे. अशा प्रकारच्या घटना देशपातळीवर देखील होऊ नयेत म्हणून बनावट "सी" फॉर्मच्या वापरास आळा बसावा यासाठी यावर्षी केन्द्र शासनाकडे हा प्रश्न उपस्थित करण्यात आला. केन्द्रीय अर्थ मंत्री श्री. प्रणव मुखर्जी यांनी या वर्षीच्या केन्द्रीय अर्थसंकल्पीय भाषणामध्ये राज्यांनी इलेक्ट्रॉनिक्स "सी" फॉर्मचा वापर करण्यासंबंधीचे सूतोवाच केले . 11 राज्यामध्ये याबाबतचा पथदर्शक प्रकल्प राबविण्याची तयारी झालेली आहे.

सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांच्या प्रश्नाला उत्तर देत असताना मी सांगू इच्छितो की, सगळया गोष्टी बाहेर पडत असताना त्यामध्ये दुस-या कुणाचा हस्तक्षेप होणार नाही याची खबरदारी घेतलेली आहे. या गोष्टी बाहेर येत असताना विभागाच्या चौकशीमध्ये असे लक्षात आले की या गोष्टी अधिका-यांच्या संगनमताने होत आहेत, तर त्याही बाबतीत कारवाई करण्यास शासन मागेपुढे पाहाणार नाही. निश्चितपणे येथून पुढच्या काळामध्ये अशा प्रकारच्या ज्या पळवाटा शोधल्या जातात त्याबाबतीत कठोर भूमिका घेतल्यानंतर इतरांवरही वचक बसावा यादृष्टीनेही विक्रीकर विभागाने खबरदारी घेतलेली आहे. दिनांक 22.12.2010 रोजी विक्रीकर आयुक्तांनी एक परिपत्रक काढून महाराष्ट्रातील अपर विक्रीकर आयुक्तांच्या कार्यालयातील सर्व अधिका-यांना बनावट "सी" फॉर्मच्या माध्यमातून कर चुकवेगिरी होणार नाही याची खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. एकंदरीत या वर्षी विक्रीकराचे उत्पन्न देखील वाढलेले आहे. हे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर वाढविण्याच्या दृष्टीने विक्रीकर आयुक्त आणि त्यांच्या टीमने चांगले काम केलेले

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. अशा घटना लक्षात आल्यानंतर गुजराथ राज्यातील विक्रीकर आयुक्तांची मदत घेतलेली आहे. गुजराथ राज्यातील विक्रीकर आयुक्तांनी गुजराथ राज्यातील व्यापा-यांची यादी पाठविलेली आहे. त्यांना सर्व व्यापा-यांची माहिती पुरविण्याची विनंती केल्यानंतर त्यांनी देखील या कामामध्ये सहकार्याची् भूमिका घेतलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी असे कर चुकवेगिरीचे प्रकार होऊ नयेत म्हणून शासनाने पावले उचलली पाहिजेत अशी जी सूचना केली त्याचा निश्चितपणे विचार केला जाईल. महाराष्ट्रामध्ये या घटना घडणार नाहीत याची खबरदारी घेण्यात येईल. आता पर्यन्त आम्ही सन 2008-2009, 2009-2010 आणि सप्टेंबर 2010 पर्यंतची प्रकरणे बाहेर काढलेली आहेत. ही प्रकरणे तपासली जात असताना जे कोणी दोषी असतील मग ते व्यापारी असतील, अधिकारी असतील किंवा सल्लागार असतील, त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर सल्लागारांची माहिती वगैरे सगळ्या गोष्टी जाणून घेतल्या जातील, अशा प्रकारची खात्री मी या प्रश्नाच्या उत्तराच्या निमित्ताने सभागृहाला देऊ इच्छितो.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, बनावट सी फॉर्म छापले जातात. जेन्यूईन सी फॉर्म आणि बनावट सी फॉर्म लक्षात येण्याच्या संदर्भात कोणती खबरदारी घेण्यात येईल? मंत्री महोदयांनी सांगितले की, केंद्र शासनाने सी फॉर्म इलेक्ट्रॉनिक प्रणालीच्या माध्यमातून उपलब्ध करण्याच्या संदर्भात निर्णय घेतला आहे. या प्रणालीच्या संदर्भात शासनाने लक्ष घातले तर ताबडतोब बनावट सी फॉर्म ओळखता येतील. सी फॉर्मच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आंतरराज्य व्यवहार केले जातात. शासनाने या प्रकरणामध्ये तात्काळ ॲक्शन घेतली. 65 व्यापाऱ्यांवर गुन्हे दाखल केले आहेत आणि काही व्यापाऱ्यांची बँक खाती गोठविण्यात आली आहेत. फ्लाईंग स्क्वॉडच्या माध्यमातून चांगले काम केले जात असले तरी क्रॉस चेकिंग वाढविली तर बनावट सी फॉर्मच्या माध्यमातून होणारे गैरव्यवहार ताबडतोब लक्षात येतील. विक्रीकर आयुक्तांनी 22.12.2010 रोजी जे परिपत्रक काढले आहे त्याचा तपशील काय आहे?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी जे काही मुद्दे मांडले आहेत त्या सर्व मुद्यांचा विचार करुनच विभागाकडून पुढील कार्यवाही केली जाईल. याबाबत आणखी काही विधायक सूचना असतील तर त्यांचाही निश्चितपणे समावेश त्यामध्ये केला जाईल. दिनांक 22.12.2010 च्या परिपत्रक काढण्याचा मूळ उद्देश हाच होता की, एकंदरीत काही गोष्टी चौकशीतून पुढे आल्या आहेत. व्यापारी किंवा संबंधित कंपन्या या व्यवहारातून पळवाटा काढण्याचा प्रयत्न करीत असतात. मागील काळात काही गोष्टी राहून गेल्या. यापुढील काळात या गोष्टी राहून जाऊ नयेत यासाठी सर्व अपर विक्रीकर आयुक्तांना क नमुन्यातून होणाऱ्या कर चुकवेगिरीबाबत घ्यावयाच्या खबरदारीच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. केंद्रीय वित्त मंत्र्यांनी देखील काही बाबी सुचविल्या होत्या. तशा प्रकारे सी फॉर्म प्रणालीचा वापर केला गेला पाहिजे. त्यासंबंधी ज्या काही सूचना होत्या त्यांचा अंतर्भाव या परिपत्रकामध्ये केला गेला आहे. पुन्हा अशा घटना घडू नयेत म्हणून तशा प्रकारचे आदेश काढले आहेत. तरी देखील परिपत्रकाची प्रत माननीय सदस्यांना आवश्यकता असल्यास वाचन करण्यास दिली जाईल. म्हणजे कोणकोणत्या गोष्टी केल्या आहेत ते माननीय सदस्यांच्या लक्षात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, मी स्पेसिफिक प्रश्न विचारला होता. सन 2001 पासूनच्या बनावट सी फॉर्मच्या प्रकरणांची छाननी करुन जे गुन्हेगार असतील त्यांच्यावर गुन्हा दाखल केला जाईल काय? हा भयंकर मोठा गुन्हा आहे. कर सल्लागारांची संख्या जास्त असताना देखील केवळ 3 जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. या कर सल्लागारांची सनद रद्द करण्यासाठी शासन पाऊल उचलणार आहे का?

श्री.अजित पवार : चौकशीमधून जे काही निष्पन्न झाले त्यामुळेच मुंबई, पुणे, नागपूर, अहमदनगर, कोल्हापूर आणि गोंदिया येथील 136 टाईल्स व्यापाऱ्यांच्या उपलब्ध पत्त्यावर अन्वेषण शाखेमार्फत भेटी देण्यात आल्या. काही प्रकरणामध्ये असे लक्षात आले की, कोणताही व्यावसायिक उपलब्ध पत्त्यावर आढळलेला नाही. बोगसपणे सगळी नोंद झालेली आहे किंवा काही ठिकाणी ज्या व्यक्तीच्या नावाने नोंदणी दाखला घेण्यात आला, ती व्यक्ती बेरोजगार किंवा संबंधित व्यवसायाशी तिचा कोणताही संबंध नाही अथवा विक्रीकराचे ज्ञान त्या व्यक्तीला नव्हते. अशा व्यक्तींचे जाबजबाब नोंदवून घेतले आहेत. काही प्रकरणांचे सूत्रधार हे विक्रीकर सल्लागार असल्याचे लक्षात आले आहे. सदर विक्रीकर सल्लागारांनी विक्रीकर नोंदणी दाखला प्राप्त करण्यासाठी कार्यालयास पुरविलेल्या माहितीमध्ये व्यवसायासंबंधीच्या मूळ कागदपत्रांमध्ये फेरफार केला, खाडाखोड केली. आर्थिकदृष्टया दुर्बल असणाऱ्या व्यक्तींच्या जागेचा अल्प काळासाठी करार करुन त्याचा वापर नोंदणी दाखला प्राप्त करुन घेण्यासाठी केला असे निदर्शनास आले आहे.

नंतर जे.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ...

त्यामुळे संबंधित कर सल्लागाराची विस्तृत माहिती घेण्याचा प्रयत्न करण्यात आला असून त्यामध्ये दिवेश भावसार, कृष्णा रावल तसेच पुणे येथील सुनील भलाई, आर.बी.शहा व जांभळे यांची सुध्दा यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे. भावसार यांनी 17 प्रकरणामध्ये व रावल यांनी 48 प्रकरणामध्ये नोंदी केल्याचे दिसून आले. यांसदर्भात संबंधितांना कर सल्लागार कार्यालयामध्ये बोलावून त्यांच्याकडून अधिकची माहिती घेण्याचा प्रयत्न करण्यात आला व संबंधितांवर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पुण्याचे भलाई यांच्यावर गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत. या प्रकरणी सखोल चौकशी केल्यानंतर संबंधितांच्या मदतीने ज्या काही नोंदी करण्यात आलेल्या आहेत त्यासंदर्भातील 65 व्यापा-यांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. या प्रकरणामध्ये 37 व्यापा-यांच्या बँक खात्यावर टाच ठेवण्यात आलेली आहे. हे सर्व करीत असतांना संबंधितांविरुध्द जी काही कारवाई करावयास पाहिजे होती ती करण्यात आलेली आहे. या प्रकरणाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी सन 2000 सालापर्यंतची माहिती विचारली परंतु मी सन 2008-09, 2009-10 व सन सप्टेंबर 2010 पर्यंतची माहिती दिलेली आहे. हे प्रकरण अतिशय गंभीर असल्यामुळे या प्रकरणाकडे राज्य सरकार त्याच गंभीरतेने पहात आहे. या विषयाच्या संदर्भात शासन कोणालाही पाठीशी घालणार नाही. या प्रकरणामध्ये जी काही कठोर कारवाई करण्याची गरज आहे ती सर्व कारवाई करण्यात येईल, तसेच जी काही कारवाई राहिलेली आहे ती कारवाई सुध्दा अधिक कठोरपणे करण्यात येईल एवढे मी या निमित्ताने सभागृहाला सांगू इच्छितो.

सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यानी कर सल्लागाराच्या बाबतीत शासनाने काय कारवाई केलेली आहे असा प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यामुळे मी सभागृहाला सांगू इच्छितो की, या कर सल्लागारांची नोंदणी रद्द करण्याची कारवाई विभागाकडून करण्यात आलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ ST/ D/

मुंबईतील जे.जे.रुग्णालयात रुग्णासोबत आलेल्या महिलेचा तेथील कर्मचाऱ्यांनी विनयभंग केल्याबाबत

(7) * 13353 श्री.रमेश शेंडगे , श्री.हेमंत टकले , श्रीमती उषाताई दराडे , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.विक्रम काळे : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील जे.जे.रुग्णालयात मुलावर उपचार करण्यासाठी आलेल्या महिलेचा त्याच रुग्णालयातील तीन कामगारांनी विनयभंग केल्याची घटना माहे डिसेंबर, 2010 च्या शेवटच्या सप्ताहात घडली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार महिलेचा विनयभंग करणाऱ्या कामगारांवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ.विजयकुमार गावित : (1) होय.

(2) व (3) उक्त प्रकरणी रुग्णालय प्रशासनाकडून 5 सदस्यीय समितीमार्फत चौकशी करण्यात आली होती. चौकशी समितीच्या अहवालानुसार संबंधित 3 कर्मचाऱ्यांपैकी 2 कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात आले असून एका कायमस्वरुपी बदली कर्मचाऱ्यास कामावरुन काढून टाकण्यात आले आहे.

याशिवाय या प्रकरणी जे.जे.मार्ग पोलिस स्टेशन येथे भा.दं.वि.कलम 354 व 34 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस तपास सुरु आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, मुंबई शहरात उत्कृष्ट अशा वैद्यकीय सेवा मिळत असतात. वैद्यकीय सेवा मिळण्यामध्ये मुंबई देशामध्येच नाही तर संपूर्ण जगात प्रसिध्द आहे. जे.जे. रुग्णालय हे सुध्दा अशाच प्रकारे चांगल्या वैद्यकीय सेवा देणारे मुंबईतील एक रुग्णालय आहे. या रुग्णालयाचे डीन व वैद्यकीय अधिकारी अतिशय चांगल्या प्रकारे वैद्यकीय सेवा देत असतात. डिसेंबर महिन्यामध्ये आपल्या मुलाच्या पायावर शस्त्रक्रिया करण्यासाठी एक महिला या रुग्णालयात आली होती. या रुग्णालयाच्या कर्मचा-यांनी या महिलेचा विनयभंग केलेला आहे. रुग्णांच्या नातेवाईकावर विनयभंग करुन काळीमा फासण्याचा प्रकार जे.जे. रुग्णालयात घडलेला आहे. विनयभंग झाल्यानंतर सदर महिलेने अगोदर वैद्यकीय अधिका-यांकडे तक्रार केली, पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली. या रुग्णालयात चांगल्या प्रकारच्या वैद्यकीय सेवा मिळत असतांना रुग्णांच्या नातेवाईक महिलेचा विनयभंग होत असताना त्या ठिकाणचे सुरक्षा रक्षक काय करीत होते ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ ST/ D/

ता.प्र.क्र. :13353...

श्री. रमेश शेंडगे....

अशा प्रकारच्या घटना इतर कोणत्याही रुग्णालयात होऊ नये या संदर्भात शासनाने कोणती उपाययोजना व कारवाई केलेली आहे? पोलीस तपासात काय निष्पन्न झालेले आहे ? या प्रकरणात केवळ दोन कर्मचा-यांना निलंबित करण्यात आलेले आहे त्यामुळे या पुढील कारवाई कोणती करण्यात येणार आहे ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, विभागात त्या त्या विभागाचे शिपाई असतात. ॲम्ब्यूलन्स ऑफिसमध्ये ही घटना घडलेली आहे. हॉस्पीटलमध्ये गार्ड ठेवले जात असतात परंतु डिपार्टमेंटमध्ये गार्ड ठेवले जात नाही. घटना घडल्यानंतर सदर महिलेने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिल्यानंतर ही बाब निदर्शनास आलेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ही बाब निदर्शनास आल्यानंतर एक समिती नेमण्यात आली होती या समितीचा अहवाल आल्यानंतर कक्ष सेवक आणि वाहन चालक हे दोघेही कायम नोकरीत होते त्यांना निलंबित करण्यात आले असून एक जण कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर असल्यामुळे त्याला बडतर्फ करण्यात आले आहे. अशा प्रकारची दुर्देवी घटना घडावयास नको होती. येथून पुढच्या काळात रुग्णालयामध्ये असा प्रकार घडू नये यासाठी जास्तीत जास्त सुरक्षा रक्षक नेमण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.हेमंत टकले :सरकारी रुग्णालयामध्ये गरीब रुग्ण उपचार घेण्याकरिता येत असतात. या सर्व रुग्णालयाचा कारभार आपण नेहमीच पहात असतो. या रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्थेकडे शासन किती प्रमाणात लक्ष देत असते, जे.जे रुग्णालया सारख्या मोठया रुग्णालयामध्ये सुरक्षा व्यवस्था शासनाकडून ठेवली जाते की कंत्राट पध्दतीने ठेवली जाते ? एखादी व्यक्ती खाजगी कंत्राट पध्दतीने सुरक्षा व्यवस्था करीत असेल किंवा शासन ही सुरक्षा व्यवस्था करीत असेल तर त्या ठिकाणी येणा-या रुग्णांच्या संख्येचा विचार करता तेथे पुरेसे सुरक्षा रक्षक नेमण्यात आले आहेत काय ? त्या ठिकाणी 24 तास सुरक्षा रक्षक पुरविण्याची गरज आहे . त्या ठिकाणी जर पुरेसे सुरक्षा रक्षक नसतील, त्यांची काही पदे रिक्त असतील वा त्यांच्यावर देखरेख करणारी यंत्रणा बरोबर काम करीत नसेल तर असे प्रकार घडतच राहतील.अशा प्रकारच्या प्रमुख रुग्णालयामध्ये एक मुख्य सुरक्षा रक्षक असलाच पाहिजे. तसेच त्याच्या हाताखाली काम करणारे सुपरवाझर आणि सुरक्षा रक्षक पुरेशा प्रमाणात असणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारच्या घटना घडल्यानंतर या यंत्रणेमध्ये कमतरता आहे असे निदर्शनास येत असते. तेव्हा ही यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, रुग्णालयांमध्ये खाटांची संख्या वाढली आहे परंतु त्या प्रमाणात सुरक्षा रक्षक नेमण्यात आलेले नाहीत. ही गोष्ट खरी आहे. पूर्वी जेवढे सुरक्षा रक्षक होते तेवढेच आजही आहेत.हे सुरक्षा रक्षक महाराष्ट्र शासनाचे कर्मचारी असून येथून पुढच्या काळामध्ये सुरक्षा व्यवस्था अधिक चांगल्या प्रकारे होण्याच्या दृष्टीकोनातून आऊट सोर्सिंग करुन जास्तीत जास्त सुरक्षा रक्षक ठेवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.त्यामुळे रुग्णांना, डॉक्टर्सना किंवा बाकीच्या कर्मचा-यांना सुध्दा निश्चितपणे संरक्षण मिळेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई : हा प्रश्न केवळ सुरक्षा रक्षकापुरताच मर्यादित नाही. सर्व रुग्णालयांमध्ये चतुर्थ श्रेणीतील कर्मचारी काम करीत नाहीत, वरिष्ठ डॉक्टराचे ऐकत नाहीत. अनेकदा डॉक्टरच कीटची गाडी घेऊन फिरत असतात. जे शिकाऊ डॉक्टर्स असतात त्यांना तर हे काम करावेच लागते परंतु जे नियमित डॉक्टर्स आहेत ते देखील हे काम करीत असतात. चतुर्थ श्रेणीतील कर्मचारी कोणाचेही ऐकत नाहीत. त्यामुळे सुरक्षा रक्षकांची संख्या वाढवून हा प्रश्न सुटणार नाही. हे कर्मचारी कामच करीत नाहीत त्यामुळे हे कर्मचारी नसले तरी चालतील असे या कर्मचा-यांच्या युनियनच्या पदाधिका-यांना सांगावे असे मला वाटते.सध्या तेथे जे कर्मचारी आहेत ते काम करीत नाहीत अशा वेळी बाहेरचे सुरक्षा रक्षक तेथे नेमणे घातक ठरणार आहे. बाहेरचे सुरक्षा रक्षक कोठून येतात आणि ते कसे आहेत याची माहिती माननीय कामगार मंत्र्यांनासुध्दा आहे त्यामुळे या रुग्णालयांमध्ये बाहेरचे सुरक्षा रक्षक नेमता कामा नये असे मला सांगावयाचे आहे.त्याचबरोबर जे कामचुकार आहेत त्यांना सस्पेड करण्यात आले तर ही व्यवस्था खरोखर सुधारेल. तेव्हा काम चुकार कर्मचा-यांना सस्पेन्ड करण्यात येणार आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्थेसंबंधी जे काही सांगितले आहे ते बरोबर आहे.कामचुकार व्यक्तीला सस्पेन्ड करुन या स्थितीमध्ये फारशी सुधारणा होणार नाही असे मला वाटते. त्यामुळे आऊट सोर्सिंग करण्याचे शासनाने ठरविले आहे.अशा प्रकारे आऊट सोर्सिंग करुन जर सुरक्षा रक्षक नेमण्यात आले तर काढून टाकता येते त्यामुळे यासंबंधी आम्ही हाच उपाय शोधला आहे.

श्री.विक्रम काळे : राज्यातील प्रत्येक महाविद्यालयात जाऊन तेथील लोकांचे गा-हाणे ऐकणारे या राज्य मंत्रिमंडळाच्या इतिहासातील ते एकमेव मंत्री असल्यामुळे मी त्यांचे प्रथम अभिनंदन करतो. परवाच्या दिवशी ते लातूर, अंबेजागाई येथे आले होते आणि उद्या ते नांदेड येथे जाणार आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून आमच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. अशा प्रकारच्या घटना रुग्णालयामध्ये होता कामा नये .

नंतर श्री सारफरे

अशोधित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13353....

श्री.विक्रम काळे ...

आपण या ठिकाणी सांगितल्याप्रमाणे जे कंत्राटी कामगार होते त्यांची सेवा समाप्त केली. परंतु जे कायम सेवेत आहेत त्यांना आपण निलंबित केल्यानंतर पुन्हा दोन महिन्यांनी रीइन्स्टेट होऊन कामावर येतात. आपल्याला जर त्यांच्यावर बंधन आणावयाचे असेल तर त्यांची देखील सेवा आपण समाप्त करणार काय?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, यामध्ये निश्चितपणे काही लोकांना डिसमिस केले जाते. परंतु यामध्ये असलेले लांबलचक प्रोसिजर सुरु करुन हा प्रश्न सुटणार नाही म्हणून नियोजन, वित्त आणि सामान्य प्रशासन विभागाबरोबर चर्चा करुन आऊट सोर्सिंगचा निर्णय घेतला तर त्यामधून बरेचसे प्रश्न सुटतील. आज आपण मंत्रालयामध्ये देखील आऊट सोर्सिंग सुरु केल्याचे पहात आहोत.त्यामुळे तेथील सफाई व्यवस्था आणि इतर व्यवस्थेवर खूप चांगला परिणाम झाल्याचे पहातो. त्यामुळे ही बिघडलेली व्यवस्था जर चांगली करावयाची असेल तर हा एक मार्ग आपल्यापुढे आहे, तो तपासून पाहून प्रॅक्टिकली आपण करुन बघितला पाहिजे. जर त्यामध्ये आपल्याला चांगले यश आले नाहीतर पूर्वी सारखी व्यवस्था आपल्याला ठेवता येईल त्या दृष्टीने आम्ही प्रयत्न सुरु केले आहेत. मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे यामध्ये दोषी आढळणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रथम निलंबित केले असून त्यानंतर त्यांची विभागीय चौकशी केली आहे, आणि त्यामध्ये त्याचा अपराध सिध्द झाल्यानंतर त्यांना नोकरीमधून बडतर्फ केले जाईल.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, याठिकाणी एखादी घटना घडल्या नंतर आपण त्यावर कारवाई करतो , कर्मचारी नेमतो, आऊट सोर्सिंग करतो. परंतु नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन सर्वत्र काना-कोपऱ्यामध्ये लक्ष ठेवणे सहज शक्य झाले आहे. व्हीडीओ रेकॉर्डींगव्दारे आपण सर्व घटनेची रेकॉर्डींग करु शकता. त्यामुळे एकप्रकारची धाक बसू शकते. तेव्हा सर्व रुग्णालयांमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्याव्दारे या सर्व घटनांवर लक्ष ठेवले जाईल काय? जर आपण एखादी गोष्ट बीओटी तत्वावर करु शकता, त्या पध्दतीने या बाबत आपण धोरणात्मक निर्णय घेऊन अशाप्रकारची व्यवस्था निर्माण करणार काय?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, यापूर्वी निर्णय घेऊन बऱ्याचशा दवाखान्यात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषाताई दराडे : सभापती महोदय, या ठिकाणी दोन कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे व एका कर्मचाऱ्याला कामावरुन काढून टाकले आहे. ज्या दोन कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे ते पुन्हा रीइन्स्टेट होणार नाहीत यासाठी आपण पावले उचलणार काय तसेच, त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु केली आहे काय?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी आपण अजून सुरु केली नाही. ज्यांना निलंबित करण्यात आले आहे, त्यांच्या बाबतीत पोलीस कारवाई करीत आहेत. त्यामुळे पोलीस जी कारवाई करतील त्यावर आपली पुढील कारवाई अवलंबून राहील.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आऊट सोर्सिंगव्दारे हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात येईल असे उत्तर दिले. चार दिवसापूर्वी वर्तमानपत्रामध्ये बातमी छापून आली होती की, माझगाव गोदीमध्ये आऊट सोर्सिंगच्या माध्यमातून बाहेरच्या लोकांना नोकऱ्या देण्यात आल्या आहेत. त्यामुळे तेथील संपूर्ण यंत्रणेला धक्का पोहोचण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. तशी परिस्थिती या हॉस्पिटलच्या बाबतीत होणार नाही असे आपण म्हणू शकता काय? तिसरा प्रश्न असा की, या ठिकाणी असलेल्या कामगारांच्या संघटनेला सुध्दा आपण जबाबदार धरुन त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करुन देणार की नाही, आणि या प्रकरणाचा छडा लावणार की नाही?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, निश्चितपणे छडा लावला जाईल. यामध्ये कामगारांची वारंवार बैठक घेऊन व त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करुन देऊन सुध्दा त्यांच्यामध्ये सुधारणा दिसून येत नसल्यामुळे आपल्याला दुर्दैवाने ही कारवाई करावी लागत आहे.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, याठिकाणी आपण आऊट सोर्सिंग लागू करणार असाल तर ज्या श्रेणीमधील कर्मचारी नेमणार आहात त्यांना शासनाचे किमान वेतन आपण दिले पाहिजे, ते देणे आपण बंधनकारक करणार की नाही?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, आऊट सोर्सिंग करीत असतांना माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे निश्चितपणे दक्षता घेतली जाईल.

उप सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: अतारांकित प्रश्नोत्तरांची अकरावी,बारावी,तेरावी, चौदावी,पंधरावी,सोळावी,सतरावी,अठरावी,एकोणिसावी व विसावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे

श्री.उत्तमसिंग चव्हाण (सह सचिव) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी, पंधरावी, सोळावी, सतरावी, अठरावी, एकोणिसावी व विसावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : अतारांकित प्रश्नोत्तराची अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी, पंधरावी, सोळावी, सतरावी, अठरावी, एकोणिसावी व विसावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

. . . .एम-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.राजेंद्र गावित (आदिवासी विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचा सन 2004-2005 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.राजेंद्र गावित (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नागपूर यांचा सन 2006-2007 चा तेहतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.राजेंद्र गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, रत्नागिरी यांचे सन 2006-2007, 2007-2008 व 2008-2009 चे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.राजेंद्र गावित : सभापती महोदय,आपल्या अनुमतीने "नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नागपूर यांचा सन 2002-2003, 2003-2004 व 2004-2005 चा अनुक्रमे पहिला, दुसरा व तिसरा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

. . . .एम-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, याठिकाणी सदनामध्ये माथाडी कामगारांच्या संबंधातील अहवाल सादर करण्यात आला आहे. ज्यावेळी सभागृहामध्ये 5-10 वर्षापूर्वीचे अहवाल ठेवण्यात येतात, तेव्हा आपण शासनाला त्याबाबत निर्देश दिलेले आहेत. परंतु मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आपण निर्देश देऊन सुध्दा नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचे सन 2002 ते 2005 पर्यंतचे अहवाल आता सादर करण्यात आलेले आहेत. नागपूर-वर्धा येथील जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचा सन 2007 पर्यंतचा अहवाल सादर करण्यात आला आहे. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचा 2005 पर्यंतचा अहवाल सादर करण्यात आलेला आहे. अशा प्रकारे कामगारांच्या संबंधातील जो अहवाल सादर केला जातो, त्यामध्ये त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न असतो. त्यामुळे आपण याबाबतीत निर्देश द्यावेत.

उप सभापती : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. या ठिकाणी नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नागपूर-वर्धा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ,शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ यांच्यामार्फत अहवाल सादर करण्यास जो विलंब झालेला आहे, त्याच्या कारणांचा तपशील संबंधित मंत्री महोदयांनी स्वत: तपासून पहावा.

. . . .एम-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा

उप सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"कन्नमवार नगर (विक्रोळी) मुंबई ही महाराष्ट्रातील सर्वात मोठी म्हाडा कॉलनी आहे. परंतु या कॉलनीत सध्या पाणी पुरवठा वेळवर व नियमित होत नाही, शिवाय संभाजी उद्यान येथे असलेल्या पाण्याच्या पंपावर गेल्या अनेक महिन्यापासून पंपमॅनच नाही. त्यामुळे पाणी पुरवठ्यात अनेक वेळा अडचणी येत असतात. त्याचप्रमाणे महापालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांच्यात समन्वय साधला जात नाही. यामुळे या कॉलनीतील रहिवाशांना पाणी वेळेवर मिळत नाही. यामुळे त्यांच्यात निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना,"पाणी पुरवठ्याच्या गंभीर व अतिशय महत्वाच्या विषयावर मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

. . . .एम-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"मध्यंतरी वर्तमानपत्रामध्ये म्हाडाने बांधलेल्या घरांच्या लॉटरी संदर्भात वेगवेगळया बातम्या प्रसिध्द होणे,त्यामुळे सामान्य जनतेमध्ये निर्माण होणारे गैरसमज, याबाबत म्हाडाच्या घरांची लॉटरी नक्की केव्हा निघणार आहे व किती गाळे विक्रीसाठी उपलब्ध होणार आहेत व या सर्व इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र मिळाले किंवा नाही, घरांच्या विक्रीची किंमत किती याबाबतची माहिती सर्वसामान्य नागरिकांना मिळण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, कोकण किनार पट्टी लगतच्या विशेषत: सिंधुदुर्ग जिल्ह्यात सुमारे 121 कि.मी. लांबीच्या लाभलेल्या समुद्रकिनारपट्टी भागात कोळी बांधव तसेच शेती-फळबागायतदार, मच्छीमार बाहय इंजिन नौकेद्वारे आपल्या उपजीविकेसाठी मच्छी व्यवसायांवर अवलंबून असणे,

सिंधुदुर्ग जिल्हयात सुमारे 1,065 बाहय इंजिन नौका असून तेथील मच्छीमारांना डिझेल ऐवजी रॉकेलची आवश्यकता असल्याने त्यांना प्रतिदिनी रुपये 25 ते 30 लिटरच्या भावाने काळयाबाजारातून रॉकेल खरेदी करावे लागत असणे, त्यामुळे सामान्य मच्छीमारांवर आर्थिक बोजा पडल्याने कर्जबाजारी होवून सोसावा लागणारा तोटा, सदर प्रकारामुळे संपूर्ण राज्यातील मच्छीमारांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष आणि निराशेची भावना, समुद्र किनारपट्टीच्या भागातील कर्नाटक राज्यात मच्छीमार बाह्य इंजिन धारक नौकांना रुपये 9 ते 10 प्रती लिटरच्या दराने रॉकेलचा पुरवठा होत असणे, परिणामी त्याच धर्तीवर आपल्या राज्यातील समुद्र किनारपट्टीच्या भागात मच्छीमारांसाठी, विक्रीकर मुक्त दराने, सहकारी संस्था मार्फत किंवा जिल्हा पुरवठा विभागामार्फत रॉकेल उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्याची आवश्यकता, यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, बाजूच्याच कर्नाटक, केरळ व गोवा या राज्यामध्ये मच्छीमारांना स्वस्त धान्य दुकानातून केरोसिनचा पुरवठा होतो, तशा पध्दतीने महाराष्ट्र राज्यातील मच्छीमारांना स्वस्त धान्य दुकानातून केरोसिनचा पुरवठा करण्यात यावा, अशा प्रकारचा औचित्याचा मुद्दा मी या ठिकाणी उपस्थित करतो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे

उप सभापती : माननीय सभापतीकडून आलेल्या यादीत ज्या सन्माननीय सदस्यांच्या नावाचा समावेश नाही, त्यांना या ठिकाणी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी दिली तर मारुतीच्या शेपटा सारखी नावे वाढत जातात. एका सन्माननीय सदस्यांना परवानगी दिली तर दुसऱ्या सन्माननीय सदस्यांना परवानगी नाकारता येत नाही. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील शेवटचा औचित्याचा मुद्दा मांडतील.

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा पुढील प्रमाणे आहे.

सभापती महोदय, काल मेक्सिकन सरकारने स्त्रीत्वाचा अपमान करणारा कोणताही स्थायी शब्दप्रयोग, भाषाप्रयोग किंवा अपशब्द वापरता येणार नाही, यासाठी एक आचारसंहिता जारी केलेली आहे. सर्व शासकीय कार्यालये, निम शासकीय कार्यालये, सार्वजनिक ठिकाणे आणि संपूर्ण मेक्सिकोमध्ये आचारसंहिता जारी केलेली आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र ही जिजामातेची, अहिल्याबाईंची, चांद बीबीची, सावित्री बाईंची आणि फातिमा शेखची भूमी आहे. या राज्य सरकारचा स्त्रियांच्या प्रश्नाकडे बघण्याचा दृष्टिकोन अधिक व्यापक आहे. स्त्रियांसाठी 33 टक्के आरक्षणाची मर्यादा आपण 50 टक्क्या पर्यंत वाढविली आहे. माझी या निमित्ताने शासनाला विनंती आहे की, शासनाने याबाबतीत पुढाकार घ्यावा. मेक्सिको सरकारने जाहीर केलेली यादी काल बी.बी.सी.च्या बातमीमध्ये देण्यात आली आहे. मेक्सिकोमध्ये वापरण्यात येणारे अत्यंत सौम्य अशा प्रकारचे शब्दप्रयोग या यादीमध्ये देण्यात आले असून अपशब्द बोलण्यास बंदी घालण्यात आली आहे. महाराष्ट्रात आई-बहिणीवरुन अशाच प्रकारच्या शिव्या दिल्या जातात. महाराष्ट्रात सुध्दा आपल्याकडे स्त्रित्वाचा, भगिनीचा किंवा आईचा अपमान होईल अशा प्रकारचा कोणताही भाषा प्रयोग सार्वजनिक ठिकाणी करता कामा नये, यासाठी महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेतला पाहिजे आणि प्रबोधनात्मक आचारसंहिता जारी केली पाहिजे,अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून करतो

<u>सभागृहाच्या कामकाजा संबंधी</u>

उप सभापती : सभागृहाच्या अनुमतीने प्रथम शासकीय विधेयके चर्चेला घेण्यात येतील.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मूल्यवर्धित कर (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक.

L.A. BILL NO. III OF 2011

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.)

श्री. राजेंद्र मुळक (वित्त राज्य मंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 3. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक, विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

...4...

अशुधारित प्रत / अशुधारित नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 3 - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक सभागृहागृहासमोर चर्चेसाठी आलेले आहे. या संदर्भात अध्यादेश काढण्यात आला होता. त्यानंतर आता या अध्यादेशाचे रुपांतर विधेयकात करण्यात येत आहे. या विधेयकाच्या उद्देश व कारणामध्ये कलम 21 वगळणे एवढेच लिहिलेले आहे. कलम 21 का वगळण्यात येत आहे, या संदर्भात या विधेयकाच्या उद्देश व कारणामध्ये तपशील यावयास पाहिजे होता, पण तो तपशील यामध्ये देण्यात आलेला नाही. 2005 पासून म्हणजे विथ रिट्रॉस्पेक्टिव्ह इफेक्टने हे कलम कमी करण्यात येत आहे. याचा शासनाला काय फायदा होणार आहे, जे कर भरतात त्यांच्यावर यामुळे अन्याय होतो काय ? हे बघितले पाहिजे. ज्यावेळी विथ रिट्रॉस्पेक्टिव्ह इफेक्टने एखादी सुधारणा आणण्यात येते, त्यावेळी त्या पाठीमागची भूमिका मांडली पाहिजे, पण ती या ठिकाणी मांडण्यात आलेली नाही. त्यामुळे हे कलम 21 का वगळण्यात आलेले आहे, याचा खुलासा करण्यात यावा, अशी माझी शासनाला विनंती आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

या विधेयकाला माझा विरोध नाही पण हे विधेयक का आणले आहे त्याचा तपशील उद्देश व कारणामध्ये देण्यात आलेला नाही. त्याच पध्दतीने कलम 23 मध्ये जी सुधारणा केलेली आहे त्या सुधारणेची देखील आवश्यकता काय आहे, हे नमूद केलेले नाही. कलम 21 काय आहे याची माहिती या विधेयकामध्ये दिलेली आहे तसेच कलम 23 काय आहे याची माहिती सुध्दा दिलेली आहे. पण कलम 21 का रद्द करण्यात आले, कलम 23 मध्ये सुधारणा का करण्यात आली, तसेच रिट्रॉस्पेक्टिव्ह इफेक्टने हे करण्याची काय गरज होती, याबाबत माननीय मंत्री महोदयांनी सभागृहाला ज्ञात करावे अशी मी विनंती करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, यामध्ये निर्धारणासाठी कालमर्यादा वाढविण्याकरिता महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायद्यात व्यापाऱ्यांच्या कर निर्धारणेकरिता कालमर्यादा विहित करण्यात आलेली आहे. व्यापाऱ्यांनी विवरणपत्रे विहित वेळत सादर केल्यास वर्ष संपल्यापासून, माझ्या माहितीप्रमाणे साधारणत: 3 वर्षामध्ये व विहित वेळेमध्ये विवरणपत्रे सादर केली असल्यास ते वर्ष संपल्यापासून 4 वर्षात निर्धारणा पूर्ण करणे आवश्यक आहे. या निर्धारणेकरिता नोटीस बजावण्याचा कालावधी अनुक्रमे 2 आणि 3 वर्षे आहे. मधल्या काळात सन 2008-2009 करिता नोटीस काढण्याचा जो कालावधी होता तो 31.3.2011 पर्यंत होता. 31.3.2011 रोजी सन 2008-2009 करिता नोटीस काढण्याचा कालावधी संपत आहे आणि नोटीस न काढता आल्यामुळे 2008-2009 च्या कालावधीची निर्धारणा करणे शक्य होणार नाही कारण 31.3.2011 ला मुदत संपलेली असताना आपण कशी काय नोटीस काढता म्हणून कोणीही कोर्टात जाईल. त्यामुळे नोटीसच्या वेगळ्या कलमाची आवश्यकता नसल्यामुळेच कलम 21 रद्द करुन नोटीसचा समावेश निर्धारणेच्या तरतुदीत करण्यात आलेला आहे. यामध्ये व्यापाऱ्यांचे 2008-2009 या वर्षासाठीचे जे लेखा परीक्षणाचे अहवाल प्राप्त झाले त्या अहवालात प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे सुधारित तरतुदीनुसार वेळेत विवरणपत्रे दाखल करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या सन 2008-2009 च्या निर्धारणा 31.3.2011 ऐवजी 31.3.2013 पर्यंत पूर्ण करणे शक्य होणार आहे. ज्या व्यापाऱ्यांनी विवरणपत्रे उशिरा भरलेली आहेत त्यांची निर्धारणा 31.3.2014 पर्यंत करता येणे शक्य होणार आहे. यामध्ये शासनाचा महसूल संरक्षित राहावा एवढीच राज्य सरकारची आणि विभागाची भूमिका होती. हे बिल जर मंजूर झाले तर तो महसूल संरक्षित होणार आहे. म्हणून हे बिल आणण्याचा प्रयत्न शासनाने केलेला आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 ते 5, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.

उप सभापती : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक

L.A.BILL NO. IV OF 2011

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.)

श्री.राजेंद्र मुळक (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 4, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 ते 4, (दोन्ही सम्मिलित) खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

उप सभापती : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वि.स.वि.क्रमांक 89 पुढे ढकलण्याबाबत

उप सभापती : सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 89 महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (दुसरी सुधारणा) विधेयक, 2010 या विधेयकाशी संबंधित असलेले नगरविकास राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव यांनी सदर विधेयक पुढे ढकलण्यात विनंती केलेली आहे. त्याप्रमाणे हे विधेयक पुढे ढकलण्यात येत आहे.

नियम 93 च्या सूचनांबाबत

उप सभापती : नियम 93 च्या सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपकर हे आता सभागृहात उपस्थित नाहीत. तरी सुध्दा मी त्यांनी दिलेल्या सूचनांबाबत माझा निर्णय देत आहे.

सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "सातार्डा, जि.सिंधुदुर्ग येथील श्री उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लि.या कंपनीने नियमबाह्यरित्या सुमारे 1400 एकर अतिरिक्त जमिनीची केलेली खरेदी व त्या जागी स्टील प्रकल्पाऐवजी पॉवर प्रकल्प उभारण्याचा सुरु असलेला प्रयत्न" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किशनचंद तनवाणी, परशुराम उपरकर यांनी "ता.कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग येथील प्राथमिक शिक्षकांच्या आवर्त ठेवींमध्ये झालेला लाखो रुपयांचा अपहार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "आदिवासी उपयोजनेंतर्गत आदिवासी विकास महामंडळाकडून भात खरेदी करण्यात आलेल्या गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर व ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे शासनाकडून 27 कोटी 94 लाख रुपये थकले असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती.....

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "राज्यात मल्टिप्लेक्स सिने थिएटरची वाढती संख्या व त्या उलट भरमसाठ कर आणि व्यवसाय चालू ठेवण्याची सक्ती यामुळे त्रस्त होऊन बंद पडत चाललेले सिंगल स्क्रीन थिएटर्स, या थिएटर्स चालकांनी दि.25.3.2011 पासून एक आठवडा संप करण्याचा दिलेला इशारा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "हडपसर, जि.पुणे येथील रयत शिक्षण संस्थेच्या आकुताई कल्याणी साधना विद्यालयातील 12 वी कला शाखेतील 2 विद्यार्थीनींचे दि.23.3.2011 रोजी व ससाणेनगर येथील मुठा कालव्यात सापडलेले मृतदेह" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "जिल्हा पुणे येथील लोहगांव, येरवडा, लाटेगांव परिसरातील राज्य शासनाच्या इमारतीच्या 107 एकर जमिनीचे विना परवानगी परस्पर खाजगी व्यक्तींच्या नावे करण्यात आलेले हस्तांतरण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

उर्वरित नियम 93 अन्वयेच्या सूचना मी दालनामध्ये नाकारलेल्या आहेत.

4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : कोल्हापूर जिल्ह्यात प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागाला पूर्णवेळ शिक्षणाधिकारी नसणे

मु. शी. : कोल्हापूर जिल्ह्यात प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागाला पूर्णवेळ शिक्षणाधिकारी नसणे याबाबत सर्वश्री चंद्रकांत पाटील, धनंजय मुंडे, भगवानराव साळुंखे व विनोद तावडे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

उप सभापती : आज एकूण 3 नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने चर्चेसाठी घ्यावयाची आहेत. क्रमांक 1 वर सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांचे निवेदन आहे. ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सदरहू निवेदन मंत्री महोदयांनी पटलावर ठेवावे.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, या निवेदनावर चर्चा करण्याची शासनाची तयारी आहे.

उप सभापती : शासनाची तशी तयारी असली तरी सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील आता सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांचे नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावे.

श्री.राजेंद्र दर्डा (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री चंद्रकांत पाटील, धनंजय मुंडे, भगवानराव साळुंखे व विनोद तावडे यांनी "कोल्हापूर जिल्ह्यात प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागाला पूर्णवेळ शिक्षणाधिकारी नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

5.....

पृ. शी. : अपर विक्रीकर आयुक्त, ठाणे विभाग अंतर्गत विभागीय कार्यालयातील चपराशी पदाच्या मुलाखती विक्रीकर आयुक्तांकडून रद्द करण्यात येणे

मु. शी. : अपर विक्रीकर आयुक्त, ठाणे विभाग अंतर्गत विभागीय कार्यालयातील चपराशी पदाच्या मुलाखती विक्रीकर आयुक्तांकडून रद्द करण्यात येणे याबाबत श्री.पांडुरंग फुंडकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

उप सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदन आता आपल्याला चर्चेसाठी घ्यावयाचे आहे. परंतु सन्माननीय विरोधी पक्ष नेते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सदर निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावे.

श्री.राजेंद्र मुळक (वित्त व नियोजन मंत्री) : सभापती महोदय, श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "अपर विक्रीकर आयुक्त, ठाणे विभाग अंतर्गत विभागीय कार्यालयातील चपराशी पदाच्या मुलाखती विक्रीकर आयुक्तांकडून रद्द करण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...6 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विदर्भात शेतकऱ्यांना ऐन पिकांचे वेळेस युरिया न मिळणे

मु.शी.: विदर्भात शेतकऱ्यांना ऐन पिकांचे वेळेस युरिया न मिळणे यासंबंधी श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.रणजित पाटील वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

उप सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक 1पुढे ढकलण्याबाबत सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी विनंती केली आहे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सदर लक्षवेधी सूचनायापूर्वी एकदा पुढे ढकलण्यात आली होती. आज ही लक्षवेधी सूचना पुन्हा कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्या गैरहजर आहेत. परंतु माझी आपल्याला अशी विनंती आहे की, या लक्षवेधी सूचनेवरील निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास आपण मला अनुमती द्यावी. या निवेदनानंतरही सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले नसेल तर त्यांना अन्य मार्गाने हा विषय उपस्थित करता येईल.

उप सभापती : ठीक आहे.

7.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>लक्षवेधी क्रमांक 2, 3 व 4 पुढे ढकलण्याबाबत</u>

उप सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविलेली लक्षवेधी सूचना 2 ही पुढे ढकलण्याबाबत सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी विनंती केली आहे. तसेच सन्माननीय मुख्यमंत्री विधानसभेच्या सभागृहात उपस्थित असल्यामुळे आणि सन्माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव हे आता येथे उपस्थित नसल्यामुळे लक्षवेधी सूचना क्र.2 पुढे ढकलण्यात येत आहे.

तसेच सन्माननीय मुख्यमंत्री विधानसभेच्या सभागृहात उपस्थित असल्यामुळे व सन्माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री आता येथे उपस्थित नसल्यामुळे आजच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविलेली लक्षवेधी सूचना क्र.3 ही लक्षवेधी सूचना मंत्री महोदय सभागृहात झाल्यानंतर चर्चेसाठी घेण्यात येईल.

आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविलेली लक्षवेधी सूचना 4 ही सोमवार, दिनांक 28 मार्च, 2011 रोजी घेण्यात येईल.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुक्यातील इंदिरा आवास योजनेतील घरकुलांची झालेली निकृष्ट दर्जाची कामे

मु.शी. : सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुक्यातील इंदिरा आवास योजनेतील घरकुलांची झालेली निकृष्ट दर्जाची कामे या संबंधी सर्वश्री रमेश शेंडगे व अरुण गुजराथी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो अणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुक्यात फेब्रुवारी, २००९ मध्ये मंजूर झालेल्या इंदिरा आवास योजनेतील घरकुलाचे काम दोन वर्ष होऊन देखील अद्याप अपूर्ण राहणे, तसेच निकृष्ट दर्जाचे काम झाल्याने सदर तालुक्यातील गोरगरीब जनतेत पसरलेला असंतोष, याबाबत शासनामार्फत चौकशी करुन निकृष्ट प्रतीच्या कामाची दुरुस्ती व अपूर्ण कामे पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील (ग्रामविकास मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, केन्द्र शासन आणि राज्य शासन यांच्या 75:25 अनुदानातून संपूर्ण राज्यामध्ये दारिद्रय रेषखालील लोकांसाठी इंदिरा आवास योजना राबविली जाते. कवठेमहांकाळ तालुक्यात या योजनेंतर्गत सन 2009-2010 मध्ये एकूण 434 घरकुले मंजूर झालेली असून त्यापैकी 315 घरकुलांचे काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित 119 घरकुलांपैकी 11 घरकुले ही बांधकामाधिन आहेत व 18 लाभार्थ्यांनी अद्याप घरकुलांचे काम सुरु केलेले नाही. घरकुलांची झालेली कामे निकृष्टदर्जाची झालेली आहेत. याबाबतीत अधिका-यांकडे चौकशी केल्यानंतर असे सांगितले जाते की, घरकुलांचे पैसे लाभार्थ्यांना दिले जातात आणि लाभार्थी ठेकेदार नेमून काम करुन घेतात. लाभार्थ्यांना चेक मिळाल्यानंतर ते ठेकेदाराला घर बांधण्यासाठी पैसे देतात. ठेकेदार हुशार असतो आणि लाभार्थी हा गरीब, निराधार असतो. या लाभार्थ्यांची ठेकेदाराकडून फसवणूक होते. ही अतिशय चांगली योजना असली तरी ती नीटपणे राबविली जात नसल्यामुळे लाभार्थ्यांची फसवणूक होते. कवठेमहांकाळ तालुक्यातील या घरकुलांचे बांधकाम मी स्वत: जाऊन पाहिलेले आहे. घरकुलांचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. एका निराधर महिलेच्या घरकुलाचे बांधकाम तर अर्धवट स्थितीत राहिलेले आहे. ती निराधार महिला कोठे जाऊ शकत नाही. सभापती महोदय, मी हे एक उदाहरण दिले. परंतु संपूर्ण राज्यभर या योजनेंतर्गत अशा प्रकारे निकृष्ट दर्जाची आणि अर्धवट कामे झालेली आहेत. अशा निकृष्ट आणि अर्धवट अवस्थेत बांधकाम करणा-या ठेकेदारावर शासनाने काय कारवाई केलेली आहे ? दुसरे असे की, या योजनेंतर्गत केवळ लाभार्थ्यांना पैसे दिल्यानंतर अधिका-यांनी त्यांची जबाबदारी झटकून चालणार नाही. याबाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झाल्यानंतर ते घरकुल चांगल्या प्रकारे पूर्ण होईपर्यंतची जाबदारी ही संबंधित अधिका-याची असली पाहिजे. लाभार्थ्याने ठेकेदाराला पैसे दिल्यानंतर ठेकेदाराकडून ते काम चांगल्या प्रकारे करुन घेण्याची जबाबदारी संबंधित अधिका-याची असली पाहिजे. तेव्हा अशा प्रकारची जबाबदारी अधिका-यावर टाकण्यात येणार आहे काय ?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी ही इंदिरा आवास योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत केन्द्र शासनाचे 75 आणि राज्य शासनाचे 25 टक्के अनुदान मिळते. या योजनेंतर्गत दुसरा आणि तिसरा हप्ता काम सुरु झाल्यानंतर टप्प्याटप्प्याने

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज ऊफ बंटी डी. पाटील....

दिला जातो. उर्वरित पैसे काम पूर्ण झाल्यानंतर दिले जातात. राज्यामध्ये या योजनेंतर्गत चांगल्या प्रकारची कामे झालेली आहेत. या योजनेंतर्गत संबंधित लाभार्थ्याने घरकुल बांधायचे आहे. घरकुल बांधण्यासंबंधीची जबाबदारी लाभार्थ्यावर टाकलेली असते. लाभार्थ्याने त्याला पाहिजे तसे काम करुन घ्यावे असे अपेक्षित आहे. या योजनेंतर्गत राज्य शासनाने आपला हिस्सा देखील वाढविलेला आहे. या योजनेंतर्गत लाभार्थ्याला 70 हजार रु.पर्यन्त लाभ मिळतो. येणा-या भविष्यकाळात या योजनेंतर्गत लाभार्थ्याला पंचायत समितीच्या माध्यमातून तांत्रिक सल्ला कसा उपलब्ध करुन देता येईल यादृष्टीने आमचा प्रयत्न राहाणार आहे.

श्री. प्रकाश बिनसाळे : इंदिरा आवास योजना ही दारिद्र्य रेषेखालील गरीब लोकांसाठी आहे. घरकुल बांधत असताना लाभार्थ्याला तांत्रिक सल्ला मिळणे आवश्यक आहे. या घरकुलांचा दर्जा चांगला नाही अशा प्रकारच्या तक्रारी अनेक ठिकाणाहून येत असतात.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

...नंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कॉन्ट्रॅक्टर त्यांना मदत करण्यासाठी ज्यांची नेमणूक करतो ते चांगल्या पध्दतीने काम करीत नाहीत. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, इंदिरा आवास योजनेतील घरकुले दिल्या जाणाऱ्या किंमतीत पूर्ण होण्यासाठी संशोधनात्मक कार्य करुन स्टॅण्डर्डायझेशनच्या माध्यमातून उत्तम घरकूल तयार करण्याकरिता शासनामार्फत योजना तयार केली जाईल काय? फॅक्टरीमेड कॉम्पोनन्ट असतील त्यांची क्वॉलिटी मेंटेन करुन ही घरकुले पूर्ण केली जातील काय?

श्री.सतेज ऊर्फ बंडी डी.पाटील : मी मघाशी सांगितले की, शासनाने स्वत:चा हिस्सा वाढवून 70 हजार रुपये एवढी घरकुलाची किंमत निश्चित केली आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्यांचा निश्चितपणे विचार केला जाईल.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, बेघर आणि उपेक्षित लोकांना हक्काचा निवारा देणारी ही योजना आहे. 70 हजार रुपये लाभार्थ्यांना दिले जातात. राज्य शासनाने आपला हिस्सा वाढवून दिला आहे. माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे हे कवठे महाकाळ तालुक्यातील आहेत. त्यांनी स्वत: तेथील वस्तुस्थिती पाहिली आहे. त्यांनी सांगितल्याप्रमाणे गेली दोन वर्षे घरकुलांची कामे सुरु आहेत. घरकुलाच्या भिंतींना तडे गेले आहेत. पत्रे तकलादू स्वरुपाचे वापरण्यात आले आहेत. शौचालयांचे काम दोन वर्षापासून अपूर्ण आहे. लाभार्थ्यांना देखील स्वत:ची जबाबदारी कळत नाही. त्यांना हे कळत नाही की, आपल्या आयुष्यासाठी, आपल्या संसारासाठी शासनाने घरकूल मंजूर केले आहे. लाभार्थी हिस्सा घेऊनही घरकूल पूर्ण न होणे हे योग्य नाही. मी कोणावर टीका करणार नाही. परंतु यामध्ये लक्ष घालून घरकुलांचे काम उत्तम दर्जाचे होईल यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली जाणार आहे?

श्री.सतेज ऊर्फ बंडी डी.पाटील : ज्या घटनेचा उल्लेख केला आहे त्या घटनेतील लाभार्थी निराधार महिलेच्या घरामध्ये कर्ता पुरुष नाही. पूर्वीच्या काळात बांधकाम करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीकडे होती. त्यामध्ये अनंत अडचणी आल्यामुळे नवीन नियमावली तयार करुन लाभार्थ्यांकडे जबाबदारी दिली गेली. लाभार्थी स्वत: त्या घरामध्ये राहणार असल्यामुळे त्यांना आपुलकी असणार आहे आणि घराचे काम चांगल्या पध्दतीचे व्हावे यादृष्टीने ते लक्ष घालतील, चांगले काम करुन घेतील म्हणून मुद्दाम लाभार्थ्यांवर जबाबदारी टाकण्यात आली आहे. एम.बी. रेकॉर्ड झाल्यानंतर फायनल बिल दिले जाते. भविष्यकाळात अशा घटना घडू नयेत यादृष्टीने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपाययोजना केली आहे. केंद्र शासनाने ही योजना सुरु केली आहे. गोरगरिब जनतेसाठी असणारी ही योजना भविष्यकाळात सक्षमपणे राबविण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, कवठे महाकाळ तालुक्यात 111 घरकुले बांधकामाधीन आहेत. 18 लाभार्थ्यांच्या घराचे काम सुरु आहे. त्यांना निधी दिला गेला आहे. तो निधी ठेकेदाराकडे वळता झाला आहे. निवेदनामध्ये म्हटले आहे की, मेळावे घेऊन तसेच गटविकास अधिकाऱ्यांमार्फत समन्वय समितीमध्ये आढावा घेऊन विशेष लक्ष देण्यात आले. विशेष लक्ष देण्यात आले म्हणजे नक्की काय केले? अपूर्ण बांधकामे लवकर पूर्ण होण्यासाठी कोणती कार्यवाही केली जाणार आहे? ठेकेदारांनी पैसे घेऊन पोबारा केला. घराचे काम पूर्ण केले नाही. त्या ठेकेदारांवर फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल काय? संबंधित अधिकाऱ्यांवर या प्रकरणाची जबाबदारी फिक्स केली जाईल काय?

श्री.सतेज ऊर्फ बंडी डी.पाटील : मी यापूर्वी सांगितल्याप्रमाणे ठेकेदार कोणाला नेमावे याचा निर्णय लाभार्थ्यांनी घ्यावयाचा असतो. केवळ एका खोलीचे बांधकाम करावयाचे होते. त्यामुळे ठेकेदार कोणाला नेमायचे किंवा स्थानिक पातळीवर काम करणा-याला नेमायचे हे लाभार्थ्याने ठरवायचे आहे. शासनाकडून कोणत्याही स्तरावर हस्तक्षेप केला जात नाही. पूर्वी ग्रामपंचायतीमार्फत काम केले जात होते. परंतु त्यामध्ये अडचणी आल्यामुळे लाभार्थ्यांवर जबाबदारी सोपविली आहे. लाभार्थ्यांवर जबाबदारी सोपविल्यामुळे शासनाचे कर्तव्य संपले असा भाग नाही. निश्चितपणे पंचायत समितीच्या माध्यमातून लाभार्थ्यांमार्फत चांगल्या पध्दतीचे बांधकाम कसे करता येईल याबाबत विचार करण्यात येईल.

नंतर एस.1...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती उषा दराडे)

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील ...

संबंधित ठेकेदारांना ब्लॅकलिस्टेड करणार का असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला असून यासंदर्भात मी सन्माननीय सदस्यांना एवढेच सांगू इच्छितो की, शासनाकडे जे नोंदणीकृत ठेकेदार असतात अशाच ठेकेदारांना ब्लॅकलिस्टेड करता येत.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. केंद्र शासन व राज्य शासनाच्या माध्यमातून ही योजना राबवली जात असते. ग्रामीण भागातील दारिद्रय रेषे खालील लोकांनाच या योजनेचा लाभ मिळत असतो. या योजनेचा लाभ 1 ते 2 टक्के लोकांना सुध्दा अजून पर्यंत मिळालेला नाही. या योजनेतील जे शासकीय अधिकारी आहेत त्यांनी आपापले कमिशन निश्चित करुन ठेवले आहे.

सभापती महोदय, या योजनेतून जी घरे बांधून दिली जातात त्या घरांना पत्र्याचे छत दिले जाते. या घराची जेवढी किंमत असते त्याच्या निम्मी रक्कम महाराष्ट्र शासन व निम्मी रक्कम केंद्र शासन देत असते. मुंबई सारख्या शहरात ही योजना राबवलीच जात नाही. ग्रामीण भागात ज्या गोरगरिबांसाठी ही योजना राबवली जाते त्यामध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार आहे. या योजनेचा लाभ महाराष्ट्रातील गोरगरीब जनतेला मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. महाराष्ट्र शासनाने इंदिरा आवास योजना किती जिल्हयांमध्ये, किती तालुक्यांमध्ये व किती खेडयांमध्ये राबवली आहे व त्यातून किती लोकांना घरे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी देण्याची आवश्यकता आहे.

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, गेल्या तीन वर्षात आपल्या राज्यात 4,55,201 घरकुले मंजूर झाली होती व त्यापैकी 4 लक्ष घरकुलांचे काम पूर्ण झाले असून 49 हजार घरकुलांचे बांधकाम सुरु आहे. या योजनेतून जवळपास 94 टक्के , 95 टक्के काम पूर्ण झालेले आहे. सन 2010-11 च्या फेब्रुवारी पर्यंतची आकडेवारी पाहिली तर या योजनेतील 76 टक्के काम पूर्ण झालेले आहे. मधील काळात दारिद्रय रेषेच्या यादीच्या अडचणी उभ्या राहिल्या होत्या त्यामुळे मध्यंतरी हे काम थोडे थांबले होते. परंतु नंतर या कामात प्रगती झालेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील....

इंदिरा आवास योजनेमध्ये आपल्याला काही निकष ठरवणे शक्य नाही त्याचे कारण असे आहे की, या योजनेतून लाभधारक जे घर बांधतो तो त्या घरात आपल्या जवळचे मटेरियल वापरुन घर बांधत असतो. चांगल्या दर्जाचे बांधकाम कसे होईल एवढेच आपण यामध्ये पाहू शकतो.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, केंद्र शासन व राज्य शासनाकडून शेकडो कोटी रुपये इंदिरा आवास योजनेसाठी खर्च होत असतात. या योजनेतील पैसा कसा बाहेर काढता येईल यासाठी ठेकेदार, अधिका-यांना व लाभार्थ्यांना पुढे करुन प्रयत्न करीत असतात. मी माननीय मंत्री महोदयांना विनंती केली होती की, या प्रकरणामध्ये आपण ठेकदार किंवा अधिका-यांवर जबाबदारी फिक्स न करता जो निराधार आहे, दारिद्रय रेषेखालील आहे त्याच्यावरच सर्व जाबाबदारी फिक्स करीत आहात. या योजनेमध्ये अधिकारी व ठेकेदार संगनमत करुन घोटाळे करीत आहेत असे असताना देखील आपण कोणालाच जबाबदार धरणार नसाल तर ते योग्य होणार नाही. त्यामुळे यासंदर्भात मला असे विचारावयाचे आहे की, या योजनेत नियोजन करुन शेकडो कोटी रुपयांचा अपहार केला जाऊन लाभार्थ्याला निकृष्ट दर्जाचे घर दिले जात आहे. त्यामुळे यासंदर्भात आपण जबाबदारी फिक्स करण्याची आवश्यकता आहे. मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, नोंदणीकृत ठेकेदार या योजनेमध्ये नाही. मला असे विचारावयाचे आहे की, नोंदणीकृत ठेकेदार नसतील तर अशा ठेकेदरांना या योजनेतील घर बांधण्याचे काम कसे काय दिले जाते ?

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे ..

कोणताही कंत्राटदार गरीब महिले कडून पैसे उचलतो आणि निकृष्ट दर्जाचे काम करतो त्याबाबत शासन असे सांगते की, तो कंत्राटदार रजिस्टर्ड नाही. तेव्हा या बाबतीत सबंधित कंत्राटदारावर जबाबदारी निश्चित करुन त्याच्या विरुध्द कारवाई करण्यात येणार आहे काय, तसेच या कामासाठी देण्यात येणारा प्रत्येक रुपया त्या घरकुलाच्या बांधकामासाठीच वापरला जाईल अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय घेण्यात येणार आहे काय ? या बाबतीत मी माननीय मंत्री महोदयांना वारंवार प्रश्न विचारत आहे परंतु माझ्या प्रश्नाला ते उत्तर देत नाहीत.तेव्हा या महत्वाचा प्रश्नाला त्यांनी उत्तर द्यावे अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी वारंवार या ठिकाणी सांगितले आहे की, ठेकेदार नेमण्याचा व बांधकाम पूर्ण करण्याचा अधिकार शासनाचा नसून सबंधित लाभधारकाचा आहे. परंतु बिल देत असतांना ती जबाबदारी आपण निश्चित करु शकतो.एखादे काम जर निकृष्ट दर्जाचे झालेले असेल तर त्याबाबत योग्य ती कारवाई करण्यासंबंधीची सूचना सर्व बीडीओ व ग्रामसेवकांना देण्यात येतील .

श्रीमती विद्या चव्हाण : माननीय मंत्र्यांना अधिका-यांनी जी माहिती पुरवली आहे तीच माहिती त्यांनी येथे सांगितलेली आहे. त्यांनी सांगितलेली माहिती खरी नाही. त्यांच्याकडे जी आकडेवारी आहे ती जिल्हावार आकडेवारी त्यांनी माझ्याकडे द्यावी. मे महिन्यामध्ये प्रत्येक गावामध्ये स्वत: फिरुन अधिका-यांनी दिलेली माहिती खरी नाही हे मी दाखवून देईन. इंदिरा आवास योजनेतून घरे बांधण्यात आल्याचे कागदोपत्री जेवढी संख्या दाखविण्यात येते तेवढी घरे प्रत्यक्षात त्या गावात बांधली जात नाहीत. जेवढी लाभधारकांची संख्या कागदावर दाखविण्यात आलेली आहेत तेवढे लाभधारक त्या गावामध्ये नाहीत हे मी सिध्द करुन दाखविन.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, इदिरा आवास योजनेमध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे असे दोन्ही सन्माननीय सदस्य सूचित करीत आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, या योजनेची अंमलबजावणी करीत असतांना ग्राम सभा लाभधारकाची निवड करीत असते . ग्रामसभेसमोर जे निर्णय होतात त्या निर्णयाची अंमलबजावणी केली जाते. राज्य सरकारने नुकताच नवीन निर्णय घेतला आहे. त्या प्रमाणे एखाद्या गावात जेवढे लाभधारक असतील त्या सर्व

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील...

लाभधारकांना एकाच वर्षात घरे देण्याची भूमिका राज्य सरकाराने घेतलेली आहे.त्यामुळे एक लाख पंधरा हजारापर्यंत उद्दिष्ट पूर्वी ठरवून देण्यात आले त्या ऐवजी दोन ते अडीच लाख घरे बांधण्याचा प्रयत्न करण्यासाठी या वर्षी 2 लाख 35 हजार घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.टारगेटचा विचार करता राज्यामध्ये गेल्या वर्षी मोठया प्रमाणावर घरे बांधण्यात आली होती. त्याचबरोबर काही घरे बांधण्याचे काम या वर्षीही सुरु आहे. सन्माननीय सदस्यांना असे वाटते की कोणी तरी ठेकेदार या घराचे बांधकाम करतो. मला या दोन्ही सन्माननीय सदस्यांना असे सांगावयाचे आहे की,आपण लाभधारकाला सांगतो की, घराचे बांधकाम चालू करावे. ज्या टप्याटप्याने काम होईल त्या टप्याने त्यांना निधी दिला जाईल. काही लाभधारक आर्थिक दृष्टया कमकुवत असतात व त्यांना सुरुवातीला काम करतांना अडचण येत असते त्यामुळे त्यांना ॲडव्हान्स द्यावयाचा आणि त्या पैशातून त्यांनी काम सुरु करावे असा या वर्षी शासनाने निर्णय घेतला आहे.दारिद्रय रेषेखालील या कुटुबांना घराचे बांधकाम करता यावे याच उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. या कामासाठी शासनाकडून कंत्राटदार नेमला जातो हा गैरसमज दोन्ही सन्माननीय सदस्यांनी प्रथम काढून टाकावा अशी माझी त्यांना विनंती आहे. राज्य सरकारची आणि केन्द्र सरकाराची घरकूल बांधण्याची योजना असून त्यासाठी टप्याटप्याने निधी दिला जाईल. ही जागा तुझी आहे या जागेवर तू बांधकाम कर असे लाभधाराकाला सांगण्यात येत असते. त्याप्रमाणे लाभधारकाने मोबलाईज करुन घर बांधण्याच्या कामाला सुरुवात करावयाची असते.त्या लाभधारकाला 70 हजार रुपये दिले जातात. परंतु घर बांधण्याचा प्रयत्न करीत असताना कधी कधी लाभधारकक कमी पडत असतो. काही वेळा घराचे काम कमी दर्जाचे होण्यामध्ये त्याची परिणीती होऊ शकते. त्यामुळे लाभधारकांना मदत करणे, मार्गदर्शन करणे इत्यादी कामे गट विकास अधिकारी करीत असतात. त्यातही काही लाभधारकांना काम पूर्ण करणे शक्य होत नाही.अशा लाभधारकांच्या सदर्भातील मुद्दा सन्माननीय सदस्य श्री रमेश शेंडगे व सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण मांडत आहेत.जागेचा अभाव असणे, जागा डिस्प्युटमध्ये येणे अशा कारणामुळे घराचे बांधकाम सुरु करता येत नाही. सन्माननीय सदस्यांनी कवठेमहांकाळ तालुक्यातील घरकुलाच्या संदर्भातील विषय या ठिकाणी मांडला असून त्या ठिकाणी घराचे बांधकाम करावयाचे राहिलेले आहे. महाराष्ट्रामध्ये इतर ठिकाणी सुध्दा घराचे बांधकाम करावयाचे

राहिले आहे. नतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील ...

ती घरे पूर्ण करण्याचा तेथील बीडीओ यांचा प्रयत्न असतो आणि म्हणून बीडीओ आणि ग्रामसेवक त्या लाभधारकांच्या मागे लागलेले असतात. ते बांधकाम करण्यासाठी लाभार्थ्याने कोणताही मक्ता दिलेला नसतो किंवा शासनाच्या कोणत्याही घटकाने दिलेला मक्ता नसतो. तो लाभधारक आपले घर स्वत: बांधीत असल्यामुळे त्यामध्ये भ्रष्टाचार झाला असे म्हणणे संयुक्तिक नाही.

सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यानी कवठेमहाकांळ या तालुक्यातील लाभार्थ्यांची यादी मागितली आहे ती यादी त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात येईल. माननीय सदस्यांनी स्वत: आपला वेळ देऊन त्या तालुक्यातील लाभधारकांना भेटण्याचे ठरविले आहे. हा एक चांगला प्रयोग महाराष्ट्रामध्ये यशस्वी होऊ द्यावा. माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण या सामाजिक चळवळीमधून पुढे आलेल्या आहेत. त्यामुळे त्यांनी त्याठिकाणी जाऊन माहिती घेतल्यानंतर निश्चितपणे योग्य ती माहिती त्यांच्या माध्यमातून सभागृहापुढे येईल. या ठिकाणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आले आहेत ते माननीय सदस्यांना पुढील आठवडयात यादी पाठवतील. त्या कवठेमहाकांळ तालुक्यामध्ये जातील तेव्हा माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांना सुध्दा त्यांनी बरोबर घेऊन जावे आणि त्यांनी सर्व लाभधारकांना भेटण्याचा प्रयत्न करावा. सभापती महोदय, या प्रश्नाच्या निमित्ताने मी माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण आणि माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांची आमच्या खात्यामार्फत समिती नियुक्त करतो. प्रत्येक लाभधारकाच्या घरापर्यंत जाऊन त्यांनी माहिती घ्यावी व ती आम्हाला सादर करावी त्या माहितीच्या आधारे राज्य शासन पुढील निर्णय घेईल.

श्री. एस.क्यू जमा : सभापति महोदय, मंत्री महोदय ने बहुत विस्तार से और स्पष्ट उत्तर दिया है. लक्षवेधी सूचना में एक जिले का प्रश्न उपस्थित किया गया है, लेकिन इंदिरा आवास योजना के अन्तर्गत मकान बनाने की प्रक्रिया पूरे राज्य में चल रही है. इसमें समय अधिक लगता है और मकान समय पर पूरा नहीं होता है. मकान बनने में देरी होने की वजह से उसकी कीमत बढ़ जाती है और उसकी भरपाई समय पर न होने से समय और बढ़ जाता है. मैं मंत्री जी से अनुरोध करना चाहता हूँ कि केन्द्रीय सरकार द्वारा अनुदानित यह एक महत्वाकांक्षी योजना है. इस योजना को समयबद्ध तरीके से लागू करने और निश्चित कीमत में पूरा करने के लिए मॉनिटरिंग करने की आवश्यकता है. क्या आपने इन दोनों कामों की मॉनिटरिंग करने के लिए

. . . U 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्री. एस.क्यू. जमा

जिला स्तर पर कोई व्यवस्था की है ? अगर आपने इस योजना की मॉनिटरिंग करने की व्यवस्था नहीं की है तो क्या आप ऐसी कोई नीति बनाएंगे, जिससे यह योजना समयबद्ध तरीके से लागू हो सके ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, मी वारंवार सांगतो की, यामध्ये अडचणी होत्या म्हणून ही जबाबदारी लाभार्थ्यांकडे दिली. जो लाभार्थी है, उसी को घर बनाने के लिए दिया गया है. याचे कारण एवढेच आहे की, त्यांचे स्वत:चे घर असल्यामुळे ते लवकर बांधकाम पूर्ण करतील. बांधकाम करीत असतांना बीडीओ आणि ग्रामसेवक यांच्यावर नियंत्रणाची जबाबदारी सोपविली आहे.

श्री. एस.क्यू जमा : आपने लाभार्थी को घर बनाने के लिए दिया, यह काम तो आपने ठीक किया. लेकिन घर बनाने का काम समय पर पूरा नहीं होता है और लाभार्थी को उसका नुकसान होता है. क्या इसके लिए आपने सरकार की ओर से कोई मॉनिटरिंग एजेन्सी नियुक्त की है ? क्या आपने जिला स्तर पर कोई मॉनिटरिंग कमेटी बनाई है ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, तालुका स्तरावर बीडीओ यांच्या मार्फत संपूर्ण कामकाजाची पहाणी केली जाते. माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी असा मुद्दा मांडला होता की, जी महिला लाभार्थी निराधार आहे तिच्या कुटुंबामध्ये कुणीही नाही अशा लाभार्थीला ग्रामसेवकाकडून वेगळी वागणूक मिळाली पाहिजे. राज्यामध्ये ज्या निराधार लाभार्थी महिला असतील,ज्यांच्या कुटुंबामध्ये कुणीही व्यक्ती नसेल अशा विशिष्ट प्रकरणामध्ये संबंधित लाभार्थ्यांना वेगळया प्रकारे नियोजनामध्ये मदतीचा हात शासनाच्या स्तरावर देता येईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी एका महत्वाच्या प्रश्नावर सभागृहाचे लक्ष वेधले आहे व त्याला मंत्री महोदयांनी देखील चांगले उत्तर दिले आहे. माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे व माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांना कवठेमहाकांळ तालुक्यातील लाभार्थींची पहाणी करण्यासाठी त्यांनी प्रोत्साहन दिले आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. हे करीत असतांना कवठेमहाकांळ तालुक्याचे बीडीओ यांनी दोन्ही आमदार महोदयांना सहाय्य करावे आणि त्यांच्याकरिता वाहनांची व्यवस्था करुन द्यावी. तशाप्रकारची व्यवस्था करण्यात येईल काय?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशोधित मसुदा / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, तेथील स्थानिक आमदारांनाही संबंधितांबरोबर जाण्याची सूचना देण्यात येईल.

. . . .व्ही-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : पुणे येथील म्हाडाच्या वसाहतींना अडीच एफएसआय देण्याबाबत शासनाने केलेली घोषणा

मु.शी. : पुणे येथील म्हाडाच्या वसाहतींना अडीच एफएसआय देण्याबाबत शासनाने केलेली घोषणा यासंबंधी सर्वश्री मोहन जोशी, हुसेन दलवाई, सुभाष चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे येथील म्हाडाच्या वसाहतींना अडीच एफएसआय देण्याबाबत शासनाने घोषणा करुनही प्रशासनाकडून अद्याप त्याबाबत अध्यादेश काढण्यात आले नसल्यामुळे पुणे शहरातील अनेक विकासाची कामे रखडणे, सध्या देशातील प्रमुख शहरांमध्ये शहर विकासाबाबत स्पर्धा सुरु असतानाही पुणे शहराच्या विकास कामाची बरीच प्रकरणे राज्य शासनाकडे प्रलंबित असल्याचे आढळून येणे, यामुळे सदर स्पर्धेमध्ये पुणे शहराची पिछेहाट निश्चित होण्याची निर्माण होत असलेली शक्यता, पुणे शहराची प्रलंबित असलेली विकास कामे त्वरित पूर्ण करण्याची तसेच पुणे शहरातील म्हाडाच्या वसाहतींना अडीच एफएसआय देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (ॲड.उषाताई दराडे) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

. . . .व्ही-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, या राज्यामध्ये पुणे शहर हे अतिशय महत्वाचे आहे. या शहरामध्ये वाढत असलेली लोकसंख्या, वाढत असलेला शहराचा विस्तार आणि देशातील 10 मेट्रो शहरांमध्ये आणि देशातील सर्वात महत्वाच्या शहरामध्ये पुणे शहराचा समावेश केला जातो. या शहरातील जो गरीब माणूस आहे,मध्यमवर्गीय आहे, शिपाई आहे,कारकून आहे अशा लोकांसाठी छोटी घरे पाहिजेत आणि ही घरे म्हाडाच्या माध्यमातून उपलब्ध होऊ शकतात आणि राज्यामध्ये गृहनिर्माण विभागाने नवीन धोरण जाहीर केले की,आपण यासाठी 2.5 इतका एफएसआय द्यावयाचा.त्याप्रमाणे दोन वर्षापूर्वी दि.12 जानेवारी 2009 रोजी शासनाने नोटीस काढली.या राज्यातील अनेक शहरांमध्ये यासंबंधातील नियम लागू झाला आणि त्याचा लोकांना लाभ मिळू लागला. तसा पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन शहरांमध्ये लाभ मिळणे आवश्यक आहे.क्लॉज 37 मधील अ,ब,इ.संपूर्ण तरतुदींचा वापर करण्यासाठी शासनाने तो क्लॉज प्रसिध्द केला आणि त्याबाबत लोकांची मते मागविली, हरकती मागविल्या. त्यानंतर दि.09-10-2000 आणि दि.07-05-2000 च्या पत्रान्वये शासनाला अंतिम स्वरुपामध्ये अभिप्राय सादर करण्यात आले. आठ महिन्यापूर्वी त्यावेळचे माजी मुख्यमंत्री माननीय श्री.अशोक चव्हाण हे पुणे येथे एका कार्यक्रमाच्या निमित्ताने आले होते.त्यावेळी त्यांनी जाहीर कार्यक्रमामध्ये सांगितले की, आम्ही एक महिन्याच्या आत याबाबतीतील निर्णय जाहीर करु. पण आता त्यावर आठ महिने उलटून गेले आहेत. या राज्याचे नवीन मुख्यमंत्री नामदार श्री.पृथ्वीराजजी चव्हाण साहेब, ज्यांनी या राज्याची सूत्रे हातामध्ये घेतल्यानंतर राज्याच्या विकासाच्या दृष्टीने अनेक गोष्टी केल्या.

सभापती महोदय, माझी पुणे शहरातील सर्वसामान्य नागरिकांच्या वतीने,गरीब लोकांच्या वतीने विनंती आहे की, 1 एप्रिलपासून नवीन आर्थिक वर्ष सुरु होत आहे.अशा वेळी शासनाकडे यासंबंधातील जो निर्णय प्रलंबित आहे,त्याबाबतीत 1 एप्रिल रोजी अधिसूचना काढली जाईल काय? तसेच मला या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे. पुणे शहरातील वाहतुकीचा प्रश्न सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने अतिशय बिकट झालेला आहे आणि यावर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था हा एकमेव पर्याय आहे. म्हणून पुणे महानगरपालिकेने या शहरासाठी मेट्रोचा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे आणि त्याला सुध्दा आता बरेच दिवस झालेले आहेत. मधल्या काळामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी सह्याद्री या शासकीय विश्रामगृहामध्ये सर्वपक्षीय आमदारांची बैठक बोलविली होती आणि त्या बैठकीमध्ये माननीय मुख्यमंत्री साहेबांनी सांगितले होते की, आम्ही यासंबंधातील प्रस्ताव 28 फेब्रुवारी पूर्वी राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे पाठवू.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याप्रमाणे हा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविलेला आहे काय? जर सदरहू प्रस्ताव पाठविला नसेल तर तो कधी पाठविण्यात येणार आहे ?

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी पुणे शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधले आहे. त्यांनी सांगितल्या प्रमाणे ही वस्तस्थिती आहे की, शासनाच्या गृहनिर्माण धोरणाला अनुसरुन म्हाडा कॉलनीचा विकास करण्या करिता अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक देणे, त्याचबरोबर जुन्या सदनिकांच्या आकारमानात बदल करणे, रहिवाशांना चांगली घरे देणे आणि शासनाकडे अतिरिक्त हाऊसिंग स्टाफ निर्माण करणे, अशा धोरणांचा समावेश होता. त्याला अनुसरुन राज्यामध्ये सर्व ठिकाणी हे धोरण राबविले गेले. परंतु फक्त पुणे आणि पिंपरी चिंचवड या विभागामध्ये हे धोरण राबविले गेले नव्हते. म्हणून पुणे आणि पिंपरी चिंचवड विभागात तेथील डीसी रुल्मध्ये बदल करुन हे धोरण लागू करण्यात यावे, या करिता शासनाने प्रयत्न केले. त्याकरिता विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल करण्या करिता, जानेवारी, 2000 मध्ये पहिल्यांदा प्रयत्न केले गेले. त्या ठिकाणी फेफार नोटिसा दिल्या गेल्या. या नोटिसा 2009 आणि 2010 मध्ये प्रकाशित करण्यात आल्या. या सर्व विषयाला खूप वेळ झ ालेला आहे, ही वस्तुस्थिती आहे. या फेरफाराच्या सूचना देण्यामध्येही सकृतदर्शनी काही तरी चूक झालेली आहे, असे माझ्या निदर्शनास आलेले आहे. स्थानिक सूचना व हरकती लक्षात घेऊन त्या ठिकाणी उप संचालक नगररचना पुणे यांनी त्यांना दिलेल्या अधिकारानुसार शासनाकडे तो प्रस्ताव पाठविला. त्यावर शासनाचा विचार होऊन तो प्रस्ताव माननीय मुख्यमंत्री कार्यालयात सप्टेंबर, 2000 साली आला.

सभापती महोदय, मी या राज्याचे नेतृत्व केल्यानंतर या प्रलंबित विषयांवर चर्चा केली आणि या संदर्भात काही सूचना देऊन मी ती फाईल जानेवारी, 2011 मध्ये परत पाठविली. ती फाईल फेब्रुवारी, 2011 मध्ये परत माझ्याकडे आलेली आहे. ती फाईल आता माझ्याकडे आहे. याबाबतच्या दोन-तीन गोष्टी सांगणे अपेक्षित आहे. या धोरणांतर्गत 2.5 चा चटईक्षेत्र निर्देशांक देऊन म्हाडाच्या कॉलनीज किंवा म्हाडाकडे जे ओपन प्लॉट्स आहेत त्यामध्ये विकर सेक्शन करिता इडब्लूएस,एलआयजी आणि एमआयजी करिता काही जागा राखून ठेवून त्यानंतर एचआयजी वर्गाकरिता काही घरे बांधण्यात यावीत, त्यामध्ये काही टक्केवारी दुर्बल घटकांसाठी राखून ठेवावी, असे काही प्रस्ताव आहेत. पुणे शहरामध्ये आणि पिंपरी चिंचवड शहरामध्ये म्हाडाकडे जवळ जवळ जी 300 एकर जमीन आहे त्यापैकी 280 एकरामध्ये म्हाडाच्या कॉलनी आहेत आणि 20 एकरामध्ये

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण.....

ओपन प्लॉट आहेत. लवकरात लवकर या बद्दलचा निर्णय घेणे आवश्यक आहे. त्या दृष्टिकोनातून मी पुण्याला बैठका घेतल्या आहेत. यामध्ये थोडया शंका निर्माण झालेल्या आहेत, काही प्रश्न उपस्थित करण्यात आलेले आहेत, त्याची माहिती मी घेत आहे. किती टक्के दुर्बल घटकासाठी राखीव ठेवावीत आणि किती टक्के एचआयजी या वर्गाकरिता ठेवावीत, याबद्दल एक विचार करावयाचा आहे. हा सगळा विचार करुन लवकरात लवकर म्हणजे दिनांक 01 एप्रिल, 2011 पर्यंत शक्य होणार नाही परंतु या अधिवेशनाच्या काळामध्ये याबाबतचे निर्णय घेतले जातील आणि त्याप्रमाणे अधिसूचना निर्गमित केली जाईल.

सभापती महोदय, मला या ठिकाणी आवर्जून सांगावयाचे आहे की, सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी, मी या राज्याच्या मुख्यमंत्री पदाचा कार्यभार स्वीकारल्याच्या पहिल्या दिवसापासून पुणे शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या प्रश्नाकडे माझ्याकडे कसोशीने पाठपुरावा केलेला आहे.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ....

यात ज्या सूचना करण्यात आलेल्या आहेत ते लवकर करता येतील. सन्माननीय सदस्यांनी वाहतुकीबद्दल आणि विशेषत: पुण्याच्या मेट्रोबद्दल विचारणा केली आहे. पुण्याच्या मेट्रोचा पहिला टप्पा वनाज ते रामवाडी हा कॉरिडॉर जवळजवळ 15 किलोमीटरचा एलिव्हेटेड कॉरिडॉर आहे. त्या कॉरिडॉरचा विकास आराखडा किंवा डीपीआर दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने तयार केलेला आहे आणि याला जवळजवळ 2 हजार कोटी रुपयांपर्यंतचा खर्च अपेक्षित आहे. या बाबतीत फंडींग पॅटर्न बद्दल विचार सुरु आहे. त्यामध्ये केंद्र शासनाकडून किती पैसे अपेक्षित आहेत, राज्य शासन किती पैसे घालू शकेल, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका किती पैसे घालू शकेल तसेच कर्ज किती उभारावयाचे या बाबतीत चर्चा चालू आहे. हा प्रस्ताव देखील लवकरात लवकर केंद्र शासनाकडे पाठविण्यात येईल.

श्री. अनिल भोसले : सभापती महोदय, या ठिकाणी म्हाडाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला गेला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या उत्तरात सांगितले की, त्या ठिकाणी म्हाडाची 300 एकर जागा असून 280 एकर जागेमध्ये कॉलनी आहे. आज त्या कॉलनीची काय परिस्थिती आहे ? भविष्य काळात एखादी कॉलनी पडली तर त्याला जबाबदार कोण ? दुसरी बाब अशी की, या म्हाडाच्या प्रकरणाच्या बाबतीत श्री. विलासराव देशमुख साहेबांनी दोन वेळा आणि श्री. अशोक चव्हाण साहेबांनी एकदा याप्रमाणे तीन वेळा जाहीर केले होते की, म्हाडाच्या लोकांना 2.5 एवढा एफएसआय देणार. या बाबतीत मला माननीय मुख्यमत्र्यांना असे सांगावयाचे आहे की, यामध्ये सर्वसामान्य लोकांना स्वस्त घरे मिळत असताना राज्य सरकारकडे अशा अनेक फाईल्स आहेत की, ज्यामध्ये मोठमोठ्या बिल्डर्सनी 2 एफएसआय, 2.5 एफएसआय वापरुन आय.टी.ची इमारत असेल किंवा दुसरे काही असे ते बांधकाम केलेले आहे. राज्य सरकारकडे असे प्रस्ताव पडलेले आहेत. भविष्य काळात या म्हाडा कॉलनीतील लोकांनी अशा पध्दतीने काम सुरु करुन शासनाकडे जर नंतर प्रस्ताव सादर केला तर शासन त्याला कायदेशीर मंजुरी देणार का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे या सूचना लवकरात लवकर निर्गमित केल्या जातील. त्यानंतर म्हाडाच्या जुन्या कॉलनीच्या पुनर्निर्माणाचे जे प्रस्ताव येतील त्याला त्वरित प्राथम्य देऊन ते मंजूर करण्यात येतील.

श्री. अनिल भोसले : सभापती महोदय, माझे माननीय मुख्यमंत्र्यांना असे सांगणे आहे की, सर्वसामान्य लोकांना स्वस्त घरे मिळण्याकरिता आमची ही चळवळ आहे. या ठिकाणी जो बिल्डर धंदा करतो, त्या ठिकाणी कॉर्पोरेशनने कोणताही जादा एफएसआय मंजूर न करता काम करतात असे अनेक प्रस्ताव राज्य सरकारकडे पडून आहेत. त्या जागेवर मोठ्या प्रमाणावर एफएसआय वापरलेला आहे. त्यांच्या बाबतीत हे कसे चालते आणि या म्हाडा कॉलनीच्या लोकांच्या बाबतीत का चालत नाही, या बाबत आम्हाला उत्तर अपेक्षित आहे.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, माझ्याकडे काही विशेष स्पेसिफिक केसेस आणल्या तर त्यामध्ये लक्ष घालीन परंतु जो धोरणात्मक निर्णय आहे तो लवकरात लवकर घेण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, म्हाडाची जी यंत्रणा आहे त्यामध्ये माझ्या माहिती प्रमाणे या ठिकाणी जवळजवळ 600 ते 650 इंजिनिअर्स आणि भरपूर स्टाफ त्यांच्याकडे आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर स्टाफ असताना, इंजिनिअर्स असताना म्हाडा स्वत: ते डेव्हलप न करता खाजगी विकासकांना डेव्हलप करण्यासाठी देतो. उदा. मुंबईमध्ये आपण शिर्के कंस्ट्रक्शन्स किंवा अन्य लोकांना डेव्हलप करण्यासाठी देतो त्यापेक्षा म्हाडाने जर ते स्वत: डेव्हलप केले तर संपूर्ण महाराष्ट्रभर चांगल्या प्रकारे मध्यमवर्गीय लोकांना, गरीब लोकांना कमी किंमतीमध्ये घर देऊ शकू असे मला वाटते. आपल्याकडे एवढ्या मोठ्या प्रमाणात स्टाफ आहे. आपण त्यांना सर्व फायदे देतो, पगार देतो, पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे, सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे पगार देतो, असे असताना आपले इंजिनियर्स सक्षम का नाहीत ? खाजगी विकासाकापेक्षा आपल्याकडे चांगला स्टाफ असताना घरांच्या किंमती कमी होण्याच्या दृष्टीने आणि लोकांना घरे मिळावीत या दृष्टीने.आपण हा विकास का करु शकत नाही ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण : राज्य शासनाने पुढाकार घेऊन गृहनिर्माणचे काम करावे, स्वस्त घरे बांधावीत, परवडण्यासारखी घरे बांधावीत या कल्पनेतून म्हाडाची निर्मिती करण्यात आली. परंतु म्हाडाने स्वत: ते काम पूर्ण करुन न करता कंत्राटदाराला देण्याचे काम आतापर्यंत चालू आहे. त्यामुळे विकासक व कंत्राटदार यामध्ये फरक करणे गरजेचे आहे. विकासक हा तेथील जमिनीचा लाभ घेतो व त्या जागेवर श्रीमंतांकरिता घरे बांधून त्यातून लाभही घेतो. म्हाडाकडून नियमाप्रमाणे कंत्राट देऊन घरे बांधून घेतली जातात. कारण स्वत: हे काम करण्यासाठी म्हाडाकडे मजूर नाहीत. त्यांच्याकडे असलेले इंजिनिअर फक्त आरेखनाचे, रचना करण्याचे आर्किटेक्चरचे व स्ट्रक्चरलचे काम करतात. त्यामुळे कंत्राट देऊन घरे बांधली जातात. पण यापुढे निश्चितपणे राज्य शासनाच्या अखत्यारीत असलेल्या संस्थांकडून जास्तीत जास्त घर बांधणीचे काम केले जाईल असे मी सांगतो.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रात नवीन गावांचा समावेश झालेला आहे. त्यांचा विकास आराखडा राज्य शासनाकडे प्रलंबित आहे. यासंबंधी शासनाकडे अनेक बैठका झालेल्या आहेत. नागपूरचे अधिवेशन किंवा त्यापूर्वीचे अधिवेशन असेल, त्या अधिवेशनामध्ये शासनाने असे सांगितले होते की, हा विकास आराखडा जाहीर करण्यात येईल. नवीन गावांचा समावेश असलेला पुणे शहराचा विकास आराखडा लवकरात लवकर म्हणजे 15 दिवसात किंवा एक महिन्यात शासन जाहीर करणार आहे का ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न मूळ लक्षवेधी सूचनेमध्ये नसला तरी मी सांगतो की, पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रात 23 गावांचा समावेश करण्यासाठी व त्यामुळे निर्माण झालेल्या बायो डायव्हर्सिटी पार्कसाठी मी स्वत: पुण्याला जाऊन एक विस्तृतपणे बैठक घेतली होती. त्या बैठकीमध्ये दोन परस्पर विरोधी मतप्रवाह दिसून आले. त्यातून मार्ग काढण्यासाठी मी एक समिती नेमली होती, त्या समितीला अहवाल सादर करण्यासाठी ठराविक कालावधी दिला होता. त्यामध्ये बायो डायव्हर्सिटी पार्कचा विषय आहे, हिल टॉपचा जो विषय आहे. त्यामुळे तेथे विकास करावा की करु नये हा प्रश्न आहे. याबाबत महानगरपालिकेकडून सूचना आल्या आहेत. या प्रश्नाबाबतही मी लवकरात लवकर निर्णय घेईन.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ ST/ D/ KGS/

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, अडीच एफएसआयची ही स्कीम आहे. मला जी माहिती मिळाली आहे त्यानुसार 35 वर्षापूर्वी ज्या इमारती बांधण्यात आल्या होत्या, त्यांच्यासाठी ही स्कीम आहे. मुळात पुणे गृहनिर्माण मंडळाची व सोलापूर गृहनिर्माण मंडळाची स्थापनाच 30 वर्षापूर्वी झालेली आहे. त्या घरांच्या बांधकामाला सुरुवात 25 वर्षापूर्वी झाली. असे असताना 35 वर्षांची अट टाकल्यामुळे ह्या योजना होऊ नयेत असे षडयंत्र रचले गेले आहे काय, म्हणजे मंडळांची स्थापना व 35 वर्षांची अट यामध्ये 10 वर्षांचा फरक आहे. त्यामुळे यामध्ये तातडीने बदल करण्यात येईल काय, जेणेकरुन या योजनेचा फायदा त्या कॉलनींना मिळू शकेल.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : मूळ प्रस्तावामध्ये 35 वर्षापेक्षा जुन्या इमारतींची पुनर्रचना व्हावी असे होते. परंतु आता सुधारित प्रस्ताव आलेला आहे त्यामध्ये 25 वर्षे असे प्रस्तावित केलेले आहे. या गोष्टीचा विचार करुन 35 वर्षांची अट काढून 25 वर्षे करावी का याबाबत चर्चा चालू आहे. मी सांगितल्याप्रमाणे याबाबत लवकरात लवकर अंतिम निर्णय घेतला जाईल.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी पुण्याच्या प्रलंबित प्रश्नांबाबत सकारात्मक भूमिका घेतली आहे. विशेषत: पुण्याच्या विकासाच्या व म्हाडाच्या प्रश्नासंबंधी चांगली भूमिका घेतली आहे. माझी शासनाला एक विनंती आहे. या वसाहतींना जोडूनच ज्या पूरग्रस्त वसाहती आहेत त्या जिल्हाधिकारी, महानगरपालिका व म्हाडा या तीन संस्थांच्या अंतर्गत येतात. या तिन्ही संस्थांकडून कारवाई करण्याबाबत विलंब झाल्यामुळे अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट झालेला आहे. त्याठिकाणी दुकानांनी सुध्दा परवानगी घेतलेली नाही, नवीन 3-3 मजली इमारती बांधण्यात आल्या आहेत. इमारतींच्या खाली दुकाने थाटली आहेत. या इमारतींना कोणी परवानगी दिली यासंबंधी जिल्हाधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता त्यांनी हा विषय महानगरपालिकेकडे आहे असे सांगितले. महानगरपालिकेकडे विचारणा केली तर हा विषय म्हाडाकडे आहे असे सांगण्यात आले. त्यामुळे हा विषय नक्की कोणाकडे आहे ते समजत नाही. याबाबत निर्णय घेण्यासाठी दिरंगाई होत आहे. ज्या पूरग्रस्त वसाहतींमध्ये 2-2, 3-3 मजली इमारती दुकानांसहित उभ्या राहिल्या आहेत, त्यांना महानगरपालिकेची परवानगी मिळाली आहे की नाही ते समजले पाहिजे. त्याठिकाणी अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट झालेला आहे, त्यामुळे शहराला बकालपण आलेले आहे, म्हणून शासनाने यावर त्वरित निर्णय घेण्याची आवश्यकता आहे आणि तो निर्णय शासन घेईल काय ?

नंतर श्री.शिगम.

अशुद्धित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री. पृथ्वीराज चव्हाण : लक्षवेधी सूचनेच्या मूळ प्रश्नाला धरुन हा प्रश्न नसला तरी सन्माननीय सदस्यांनी त्याबाबतीत स्पेसिफिक माहिती दिली तर त्याबाबतीत निश्चितपणे चौकशी होईल.

लक्षवेधी सूचना क्रमांक 1 व 6 बाबत

उप सभापती : लक्षवेधी सूचना क्रमांक 1 चे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यासाठी मंत्री महोदयांनी अनुमती मागितलेली आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी सदर लक्षवेधी सूचना उपस्थित केली नाही. सन्माननीय सदस्य सभागृहात गैरहजर असताना निवेदन पटलावर ठेवण्याची कोणतीही प्रथा नाही. त्यामुळे मी सदर लक्षवेधी सूचना प्रलंबित ठेवत आहे.

श्री. राधाकृष्णा विखे-पाटील : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना दोन वेळा पुढे ढकलण्यात आलेली आहे. महत्वाच्या विषयाच्या वेळी सन्माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये हजर रहावयास पाहिजे होते. या प्रश्नाऐवजी सन्माननीय सदस्यांना दुसरा प्रश्न महत्वाचा वाटतो. याबाबतीत आपण निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे.

उप सभापती : लक्षवेधी सूचना क्रमांक 1 व 6 बाबत सांगावयाचे झाले तर मला एक तर त्या प्रलंबित ठेवाव्या लागतील किंवा व्यपगत कराव्या लागतील. या लक्षवेधी सूचना व्यपगत करायच्या काय ?

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य "होय" असे एकाच वेळी बोलतात.)

उप सभापती : ठीक आहे. लक्षवेधी सूचना क्रमांक 1 आणि 6 व्यपगत झालेल्या आहेत.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: वाहन चालक अनुज्ञप्ती व वाहन नोंदणी प्रमाणपत्र नोंदणीकृत डाकेने पाठविण्याच्या योजनेचा शुभारंभ

मु.शी.: वाहन चालक अनुज्ञप्ती व वाहन नोंदणी प्रमाणपत्र नोंदणीकृत डाकेने पाठविण्याच्या योजनेचा शुभारंभ यासंबंधी माननीय परिवहन राज्यमंत्र्यांचे निवेदन

श्री. गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करीत आहे.

"मोटार वाहन कायदा 1988 व तद्नुषंगिक तरतुदीचा वापर करुन जनतेस विविध सेवा उपलब्ध करणे हे परिवहन विभागाचे महत्वाचे कार्य आहे. दैनंदिन कार्यप्रणालीत नवनवीन सुधारणा करुन जनतेस अधिकाधिक चांगली सेवा देण्याचा परिवहन विभागाचा नेहमीच प्रयत्न असतो. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून वाहन चालक अनुज्ञप्ती (ड्रायव्हिंग लायसन्स स्मार्ट कार्ड) व वाहन नोंदणी प्रमाणपत्र (आर.सी.स्मार्ट कार्ड) संबंधितांना नोंदणीकृत डाकेने (पोस्टाने) पाटविण्याच्या योजनेचा शुभारंभ तसेच मोटार वाहन विभागाच्या सांख्यिकी पुस्तिकेच्या विमोचनाचा कार्यक्रम माननीय मुख्यमंत्री महोदय यांच्याहस्ते आठवडाभरात संपन्न होणार आहे."

श्री. विक्रम काळे : आज वर्तमानपत्रामध्ये या योजनेच्या शुभारंभासंबंधी बातमी छापून आलेली आहे. लायसन्स घरपोच करण्याची योजना अतिशय चांगली आहे. तेव्हा या योजनेचा शुभारभ नेमका केव्हा होणार आहे ?

श्री. गुलाबराव देवकर : हा कार्यक्रम आम्ही घेणार होतो. परंतु नियमानुसार त्यासंबंधीचे निवेदन आधी सभागृहामध्ये सादर करावयास पाहिजे ते मी आता सादर केलेले आहे. या आठवडयाभरात हा कार्यक्रम आपण घेत आहोत.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मलकापूर(जि.बुलढाणा) येथील राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या अपघातात भाविकांचा झालेला मृत्यू

मु. शी. : मलकापूर(जि.बुलढाणा) येथील राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या अपघातात भाविकांचा झालेला मृत्यू याबाबत श्रीमती अलका देसाई, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : मा□□□य सदस्या श्रीमती अलका देसाई यां□□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडते.

"मलकापूर (जि. बुलढाणा) येथून 7 ते 8 कि.मी. अंतरावर राष्ट्रीय महामार्गावर दिनांक 18.3.2011 रोजी वा त्या दरम्यान झालेल्या अपघातात 17 भाविकांचा जागीच मृत्यू झाल्याची भयंकर घटना घडली असून सध्या रस्त्यावर अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे, अनेक वेळा वाहनचालकांच्या बेजबाबदारपणामुळे अपघातात वाढ होत असल्याचे आढळून येणे, त्याचप्रमाणे अनेक वेळा रस्ते नादुरस्त असल्यानेही अपघातात वाढ होऊन प्रवाशांचा नाहक बळी जात असल्याचे आढळून येणे, वाहनचालकांनी शासनाच्या नियमांचे पालन न करणे, महामार्ग ठिकठिकाणी अतिशय खराब झालेला असणे, यामुळे महामार्गावर मोठ्या प्रमाणात अपघात होऊन प्रवाशांचा नाहक मृत्यू होत आहे. यामुळे वाहन चालकांवर नियंत्रण ठेवण्याची व महामार्गाची त्वरित दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. या अतिशय महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

--

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मौ.शिवणी (जि.बीड) येथील माजी सैनिकास शासनाकडून जमीन मिळणे

मु.शी.: मौ.शिवणी (जि.बीड) येथील माजी सैनिकास शासनाकडून जमीन मिळणे याबाबत ॲड.उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

मौजे शिवणी (जि.बीड) येथील माजी सैनिक श्री.प्रकाश आबा वाघमारे यांना गट क्रमांक 262 मधील डोंगराळ भागातील जमीन देण्याचे आदेश दिनांक 28 सप्टेंबर, 2010 रोजी जिल्हा प्रशासनाने देऊनही त्याची दखल न घेणे, परिणामी माजी सैनिकास कुटुंबासह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसण्याची वेळ येणे, याबाबत सखोल चौकशी करुन सदर माजी सैनिकास जमीन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: उच्च माध्यमिक शाळांबाबत "कायम" शब्द वगळणे

मु.शी.: उच्च माध्यमिक शाळांबाबत "कायम" शब्द वगळणे याबाबत श्री.वसंतराव खोटरे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री.वसंतराव खोटरे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.वसंतराव खोटरे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळा कृती समितीने कायम शब्द वगळण्याकरिता दिनांक 21 मार्च, 2011 पासून आझाद मैदानावर उपोषण सुरु केलेले आहे. माध्यमिक शाळांचा कायम शब्द वगळण्यात आला. परंतु उच्च माध्यमिक शाळांचा कायम शब्द न काढल्यामुळे हजारो शिक्षकांवर अन्याय झालेला आहे. जवळपास 35 हजार विद्यार्थी उच्च माध्यमिक शाळेत शिकतात आणि 18 हजाराहून जास्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या शाळांमध्ये काम करीत आहेत. माझी शासनाला विनंती आहे, योगायोगाने माननीय मुख्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. राज्यातील उच्च माध्यमिक शाळांचा कायम शब्द वगळण्यात यावा. हजारो शिक्षक आझाद मैदानावर उपोषणास बसले आहेत. या प्रश्नामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी जातीने लक्ष घालून कायम शब्द वगळावा अशी मी विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनाला विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना वाढीव महागाई भत्ता जाहीर करणे

मु.शी.: केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना वाढीव महागाई भत्ता जाहीर करणे याबाबत श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री.वसंतराव खोटरे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना वेळोवेळी वेतन व भत्ते केंद्र सरकार देईल त्याप्रमाणे राज्य सरकार सुध्दा राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते देईल असा धोरणात्मक निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री.शरद पवार यांनी घेतला होता. केंद्र सरकार सर्वसाधारणपणे वर्षातून दोन वेळेस महागाई भत्त्याचा आढावा घेऊन त्यात बदल करीत असते. परंतु वर्तमान महागाई निर्देशांकाची उच्च पातळी लक्षात घेऊन केंद्र सरकारने महागाई भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय नुकताच जाहीर केला आहे. तेव्हा राज्य सरकारने तातडीने राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना व शिक्षक कर्मचाऱ्यांना केंद्र सरकारने जाहीर केल्याप्रमाणे 6 टक्के महागाई भत्ता त्यात कोणतीही कपात न करता 1 जानेवारी, 2011 पासून भूतलक्षी प्रभावाने देण्याचा निर्णय निर्गमित करावा अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: आंबा फळ पिकासाठी हमी भाव निश्चित करणे

मु.शी.: आंबा फळ पिकासाठी हमी भाव निश्चित करणे याबाबत श्री.राजन तेली, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

कोकणात अवकाळी पाऊस, अतिथंडी, अति तापमान व वादळी पाऊस इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे आंबा पीक धोक्यात येत असल्याचे मागील काही वर्षात निदर्शनास आले आहे. यामुळे संपूर्ण पीक सुध्दा वाया जात आहे. वर्षानुवर्षे या परिस्थितीमुळे आंबा बागायतदार हवालदिल झालेला आहे. यासाठी आंबा पिकाकरिता निश्चित विमा योजना तयार करण्यात यावी व आंबा पिकासाठी संपूर्ण हंगामाकरिता हमी भाव ठरविण्यात यावा. जेणेकरुन कोकणातील आंबा बागायतदारांना आर्थिक झळ सोसावी लागणार नाही. याकरिता ही बाब विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे मी शासनाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>अशासकीय ठराव क्रमांक- 1 व 2 बाबत</u>

तालिका सभापती : आजच्या अशासकीय कामकाजातील अनुक्रमे पहिला ठराव माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे याचा असून दुसरा ठराव माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांचा आहे. हे दोन्ही ठराव पुढे ढकलण्याबाबत माननीय सदस्यांनी लेखी विनंती केली आहे. त्यामुळे आता माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांचा ठराव चर्चेला घेण्यात येत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>अशासकीय कामकाज (ठराव)</u>

पृ.शी.: मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या कारभारात सुधारणा होणे

मु.शी.: मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या कारभारात सुधारणा होणे या विषयावरील श्रीमती अलका देसाई यांचा ठराव

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडते :-

"मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जीवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठया प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदय, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अंतर्गत मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई घर दुरुस्ती मंडळ आणि मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाचा कारभार चालविला जात आहे. गृहनिर्माण मंडळामार्फत उभारण्यात आलेल्या वसाहतीमध्ये आम्ही रहात असल्यामुळे आम्हाला या मंडळांच्या कारभाराची पुरेशी माहिती आहे. महाराष्ट्र राज्यातील त्यावेळच्या राज्यकर्त्यांनी अत्यंत उदार दृष्टीकोन ठेवून आणि भविष्यकाळाचा विचार करुन या मंडळांची स्थापना केली होती. सामान्य लोकांना चांगल्या घरामध्ये राहता यावे, परवडतील अशी घरे उपलब्ध व्हावीत यादृष्टीकोनातून त्यांनी रोडमॅप तयार केला होता.

नंतर 2बी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ....

हे सर्व व्यवस्थित होईल का असा विचार जेव्हा करतो तेव्हा त्यास उत्तर मिळत नाही. घरमालक टॅक्स भरत नसल्यामुळे घरांची दुरुस्ती होत नाही व त्यामुळे मुंबई शहरात इमारती कोसळून जीवित हानी होत असते. यावर कोणाचाही अंकुश राहिलेला नाही. अंकुश असला तरी त्याची कार्यपूर्ती होतेच असे काही नाही. अनेक इमारतींची आपल्याला दुरुस्ती करावी लागणार आहे. मुंबई किंवा मुंबईच्या उपनगरातील अनेक इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. मला हौसिंग बोर्डाच्या अधिका-यांविरुध्द बोलण्याची इच्छा नाही. मला असे वाटते की, या अधिका-यांना काही मंडळी दिग्दर्शन करीत असतात. या ठिकाणी मी रिपेअर बोर्डाच्या संदर्भात विचार मांडण्यासाठी उभी आहे. मुंबई शहरामध्ये हौसींग बोर्डाच्या 54 कॉलनीज आहेत. या 54 कॉलनीजमध्ये ज्या इमारती कोसळलेल्या आहेत त्या ठिकाणच्या रहिवाश्यांना शासनाने पर्यायी घरांची सोय करुन दिल्याबद्दल मी शासनाचे आभार मानते. या रहिवाश्यांना ज्या ट्रॅन्झीट कॅम्पमध्ये ठेवले होते त्यांना आमिष देऊन बाहेर काढण्यात आले व त्यांच्या ठिकाणी दुस-या घुसखोरांना ठेवले गेले ही वस्तुस्थिती आहे. या ठिकाणी पर्यायी व्यवस्था करण्यात आली होती त्या इमारती देखील आता मोडकळीस आलेल्या आहेत. इमारत कोसळून जीवित हानी कधी होईल हे सांगता येत नाही.

या ट्रॅन्झीट कँपमध्ये जे घुसखोर घुसलेले आहेत त्यांना आता 25-25 वर्षे होऊन गेलेले असल्यामुळे ते आता तेथून बाहेर निघणार नाहीत. यासंदर्भात मी हौसिंग बोर्डाच्या अधिका-यांना किती तरी वेळा पत्रव्यवहार केलेला आहे परंतु अधिका-यांनी माझ्या एकाही पत्राला उत्तर दिलेले नाही. या आधी या विषयाच्या संदर्भात मी म्हणाले होते की, मंत्रालयापासून ते हौसिंग बोर्डाचे अधिकारी एका एका विषयाच्या तीन तीन फाईल्स तयार करतात व कोणताही निर्णय ते लागू देत नाहीत. त्यामुळे यापुढील काळात तरी असे होणार नाही याची शासनाने खबरदारी घेण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्र हौसींग बोर्डाच्या कॉलनीत टागोर नगर, कन्नमवार नगर, पंत नगर, काळा चौकी, गोरेगाव, अंधेरी, शिवडी, सायन-कोळी वाडा या ठिकाणच्या सर्व कॉलनीचा समावेश असून त्यामध्ये सरकारच्या वेळोवळीच्या धोरणा प्रमाणे काही विकासक लोकांची दिशाभूल करीत आहेत. विकासक कोणाला नेमावा हा सरकारचा निर्णय आहे. परंतु हौसिग बोर्डाच्या निर्णयाच्या संदर्भात फार कमी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ....

लोकांना त्याची माहिती असते परंतु आम्ही तुम्हाला एतके पैसे देतो, एवढे मोठे घर देतो असे आमिष दाखवून गरीब लोकांची फसवणूक केली जात आहे. त्यामुळे शासनाने यासंदर्भात एक श्वेतपत्रिका काढण्याची आवश्यकता असून त्या माध्यमातून आम्ही या या योजनेतून या या इमारती बांधणार आहोत असे सांगण्याची आवश्यकता आहे. जशा इमारती आहेत तशाच जमिनी सुध्दा मोठया प्रमाणात आहेत. ब-याच बिल्डर लोकांचा या जागांवर डोळा आहे. मी येथे आमदार म्हणून आले त्यावेळेस माजी माननीय मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण हे या राज्याचे नेतृत्व करीत होते. त्यांना मी या विषयाच्या संदर्भात पत्र लिहिले होते. या ज्या इमारती आहे त्या सर्व इमारतींचे बांधकाम शासनाच्या अखत्यारीत करण्यात यावे असे मी त्या पत्रात लिहिले होते. विकासक म्हणून कोणास नेमावे हा शासनाचा प्रश्न आहे. परंतु इमारतीचे काम करण्यासाठी विकासक नेमून इमारती रिपेअर कराव्यात, नवीन बांधाव्यात. मुंबईत ज्या 54 कॉलनीज आहेत त्यांची अवस्था फार बिकट झालेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ...

सभापती महोदय, आताच्या माननीय मुख्यमंत्र्यांना देखील मी तशा प्रकारचे पत्र दिले असून मी त्यांना असे सांगितले की, ज्याप्रमाणे मुंबई शहरामध्ये उत्तुंग इमारती होत आहेत त्याप्रमाणे हौसिंग बोर्डाच्या वसाहतीमध्ये होता कामा नये. सामान्य माणसांना घरे परवडली पाहिजेत, सामान्य माणसे त्या घरामध्ये रहावयास गेली पाहिजेत यासाठी त्यावेळच्या नेतृत्वाने अत्यंत उदारमनाने हौसिंग बोर्डाची स्थापना करुन घरे बांधण्याचा निर्णय घेतला होता. आपण फक्त श्रीमंताची मुंबई करणार आहोत काय ? याचा देखील विचार होणे आवश्यक आहे.सभापती महोदय, या विषयावर पुष्कळ बोलण्यासारखे आहे परंतु मी जास्त न बोलता आणखी एक मुद्दा मांडणार आहे.

सभापती महोदय,घर दुरुस्ती मंडळ , हौसिंग बोर्ड, झोपडपट्टी सुधार मंडळ स्थापन करण्यात आलेले आहे. आपण झोपडपट्टी सुधार मंडळाचा वारंवार उल्लेख करतो व त्या संदर्भात वारंवार चर्चा करीत असतो. मी या ठिकाणी अत्यंत नम्रतापूर्वक सांगू इच्छिते की, ज्या सेन्सस झालेल्या झोपडया आहेत त्या ठिकाणी कशा प्रकारची कामे चालू आहेत या बाबतीत एका तरी अधिका-याने अधिकार वाणीने सरकारला खरी माहिती द्यावी . त्या ठिकाणी अनेक दलाल सतत फिरत असतात आणि येथे एस.आर.ए.ची योजना राबविण्यात येईल अशा प्रकारे सांगत असतात. सभापती महोदय, या ठिकाणी मी शासनाला एक सूचना करणार आहे. मघाशी मी एक हौसिंग बोर्डाच्या संदर्भात विशेष उल्लेखाची सूचना मांडली होती.हौसिंग बोर्डाच्या ज्या वेगवेगळया वसाहती आहेत त्या ठिकाणी काही वजनदार मंडळी आपल्या वजनाचा वापर करुन गेल्या चार पाच वर्षामध्ये तेथील जमिनी घेऊन विकासाची कामे करत असतात. मी महानगरपालिकेमध्ये नगरसेवक म्हणून काही वर्षे काम करुन देखील एका ठिकाणी तर दवाखान्याची जागा घेऊन दहा मजली इमारत कशी काय उभी केली हे मला तर कळलेच नाही.या गोष्टी माझ्या कळण्याच्या पलीकडच्या आहेत. मी घरी जात असतांना कॉलनीच्या सुरुवातीलाच "एसडीआयएल" लिहिलेला एक बोर्ड मला वाचावयास मिळतो . गेल्या आठ वर्षापासून मी हाच बोर्ड बघत आलेली आहे. त्या भागातील दहा अकरा बिल्डींगचे काम एका बिल्डरने घेतले आहे. हा बिल्डर कोण आहे हे मला माहीत नाही.सरकारच्या वेगवेगळया नियमांचे पालन त्या ठिकाणी केले जात नाही.त्या दहा बिल्डींगमधील लोक कोठे रहावयास गेली हेही समजत नाही. गेल्या अनेक वर्षापासून त्या इमारतीचे काम सुरु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ...

आहे परंतु अजूनही इमारतीचे बांधकाम पूर्ण होत नाही. हे कशाचे द्योतक आहे ? आपल्या चुकीच्या धोरणामुळ किंवा अधिका-याकडून संबंधित बिल्डरांना जी मदत केली जाते त्यामुळे असे घडत असते काय ? या बाबतीत मला खरोखर काहीही कळत नाही.

सभापती महोदय, मध्यंतरी वर्तमानपत्रात आलेली एक बातमी मी वाचली होती. त्या बातमीत असे म्हटले होते की,40 वर्षा पूर्वीच्या इमारतींना अमुक एक सेस लावणार आहे व 1964 सालापर्यतच्या ज्या इमारती आहेत त्यांना बांधकामाची परवानगी देणार आहे.या सगळया घोषणा बिल्डर्सच्या पथ्यावर पडत आहेत. या घोषणांचा वापर करुन या वसाहतीमध्ये राहणारे जे रहिवाशी आहेत त्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न होत असतो. मध्यंतरी झुम नावाचा बिल्डर या कॉलनीतून फिरत होता. तो बिल्डर कोण आहे हे मला माहीत नाही. त्या भागातील लोकांनी मला एका कार्यक्रमासाठी बोलावले होते त्यावेळी मला असे सांगितले की, या इमारतीचे पुनर्विकास करण्याचे ठरविले असून या भागातील इमारतीमध्ये राहणा-या लोकांसाठी दुसरीकडे इमारत बांधून देण्यात येणार आहे आणि या ठिकाणी उत्तुंग इमारती बांधण्यात येणार आहेत. संबंधित आर्किटेक्टला मी असे विचारले की, या ठिकाणच्या इमारतीत राहणा-यांना तीन मैल अंतरावर टाकावयाचे आणि या ठिकाणी नवीन उंच इमारत बांधण्याची अनुमती तुम्हाला कोणी दिली ?

नंतर श्री.सरफरे .

अशुद्धीत प्रत/शुद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई...

त्यावेळी त्या आर्किटेक्टने मला दमात घेऊन सांगितले की, अलका देसाई आम्ही सर्व काही करु शकतो. त्यावेळी मी त्याला सांगितले की, तू जरी करु शकत असलास तरी मी माझ्या पातळीवर हे तुझे काम थांबवू शकते, त्याप्रमाणे माझ्या पातळीवर मी ते काम थांबविले. मी केवळ 1 मैलापर्यंत समजू शकते, परंतु येथील भाडेकरुंनी 3 ते 4 मैल अंतरावर जायचे आणि त्यांच्या जागेवर केवळ श्रीमंतानीच घरे बांधावयाची हे चालणार नाही. मी सांगितलेले त्रिवार सत्य असून आमचे सरकार हे लोकांकरिता आहे हे मी त्याला सांगितले. या संदर्भात मी माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेबांबरोबर चर्चा केली. त्यांनी यापुढे असे काही होणार नाही आपण विकासक नेमणार आहोत, बिल्डर नेमणार नाही असे मला आश्वासन दिले आहे, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते.

त्याठिकाणी दहा वर्षापूर्वी शहा नावाच्या बिल्डरचा लावलेला फलक मी नेहमी वाचते. त्यानंतर ती जागा दुसऱ्या बिल्डरला विकण्यात आली आहे. अशाप्रकारे या 54 इमारतीच्या वसाहतीमध्ये हे दुष्टचक्र सुरु राहिले तर या वसाहतीमधील सर्वसामान्य माणसांना घरे मिळणार नाहीत. मोडकळीस आलेल्या शहरातील इमारती सुध्दा दुरुस्त होणार नाहीत. त्या दुरुस्त होण्याबाबत धोरण आखण्याकरिता आपण एक बैठक आयोजित केली पाहिजे. आज या अनेक इमारती अतिशय धोकादायक स्थितीमध्ये झालेल्या आहेत त्या पाडून त्याच जागेवर नवीन इमारती उभ्या केल्या पाहिजेत. या सर्व गोष्टींचा विचार करण्यासाठी विधानसभा आणि विधान परिषदेमधील तज्ज्ञ माननीय सदस्यांची एक समिती नेमण्यात यावी. जेणेकरुन ज्यांच्यासाठी आपण ही योजना राबवितो त्यांना त्याचा काहीतरी उपयोग होईल. नाही तर आपण ज्या उदात्त हेतूने सर्व सामान्य लोकांसाठी घरे बांधली त्या उदात्त हेतूला हरताळ फासल्यासारखे होईल. या शहरामध्ये सर्व सामान्य लोकांना घरे मिळणार नाहीत तर फक्त श्रीमंतांचीच ही मुंबई होईल असे मला वाटते. मी मांडलेला हा अशासकीय ठराव शासनाने संमत करावा अशी विनंती करुन माझे भाषण संपविते.

ठराव प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती अलकाताई देसाई यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावाच्या माध्यमातून महत्वाच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचे काम झाले आहे.

सभापती महोदय, या ठरावामध्ये दोन भाग अंतर्भूत आहेत. एक तर मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळांतर्गत असलेल्या वसाहती या शहराच्या वेगवेगळया भागात आहेत त्यांच्या दुरुस्तीचा, पुनर्बांधणीचा, विकासाचा प्रश्न आहे. त्याचप्रमाणे या ठरावाच्या दुसऱ्या भागाचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आलेला नाही. मुंबई घर दुरुस्ती व पुनर्रचना मंडळांतर्गत येणाऱ्या सेस प्रॉपर्टीच्या पुनर्बांधणी, दुरुस्तीचे वेगवेगळे प्रश्न त्या माध्यमातून निर्माण होतात त्याबाबत विचार करण्याची अत्यंत महत्वाची गरज निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, मुंबई शहराला माहीमपर्यंतचे बेट असलेले शहर असे म्हटले जाते. घर दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अंतर्गत ही मुंबई येते, त्यामध्ये जवळ जवळ 19 हजार इमारती या "अ" वर्गातील असून त्या घर दुरुस्तीच्या किंवा पुनर्बांधणीच्या प्रतिक्षेत आहेत. या "अ" वर्गातील इमारतीच्या पुनर्बांधणीसाठी 1940 हे वर्ष निश्चित करण्यात आले होते, ते नंतर वाढवून 1960 पर्यंत निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे 19 हजाराच्या संख्येमध्ये कदाचित वाढ होण्याची शक्यता आहे. आपण जर गिरगाव किंवा मुंबादेवीच्या परिसरातील भाग पाहिला तर तेथील अनेक इमारती आज अत्यंत दाटीवाटीने उभ्या आहेत. त्या ठिकाणी दोन इमारतींमधील अंतर अत्यंत तुटपुंजे असल्यामुळे हाऊस गल्लीच्या रुपाने घर गल्ल्या तयार झाल्या आहेत. त्या घर गल्ल्यांमध्ये कचरा टाकल्यामुळे अत्यंत बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. महानगरपालिकेच्या माध्यमातून, स्थानिक विकास निधीच्या माध्यमातून कोटयवधी रुपये त्या भागाची स्वच्छता करण्यासाठी खर्च केले जातात. त्या गल्ल्यांमध्ये कचरा टाकल्यामुळे व अस्वच्छता, दुर्गंधी निर्माण झाल्यामुळे उंदीर, घुशी यांच्या माध्यमातून त्या इमारतींचा पाया पोकळ करण्याचे काम होत असते.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे . . . .

जुन्या इमारतींच्या बाबतीत दुरुस्तीचा कायदा आहे. आपण सेस घेतो आणि त्या माध्यमातून या इमारती दुरुस्त करण्याचा प्रयत्न करीत असतो. मला असे वाटते पूर्वी 200 रुपये प्रति चौ.मी.घेत होतो, त्यानंतर त्यात वाढ होऊन तो 500 रुपये, नंतर 800 रुपये, नंतर 1200 रुपये झाला आणि आज हा सेस 2000 रुपये आहे. आपण नवीन इमारतींच्या पुनर्बांधणीचा मुद्दा घेतला तर कदाचित माझे चुकत असेल, परंतु ढोबळमानाने लक्षात घेतले तर पुनर्बांधणीसाठी होणारा 40 टक्के खर्च हा केवळ स्ट्रक्चरल मेंबर्स असतात त्यासाठी होतो. आज मुंबई शहरातील एखाद्या इमारतीची पुनर्बांधणी करावयाची असेल तर तेथे जवळजवळ 1200 ते 1300 रुपये चौ.मी. म्हणजे जवळजवळ 13 हजार, 14 हजार, 15 हजार चौ.मी. इतका दर असतो आणि आपण 40 टक्के कॉम्पोनन्ट लक्षात घेतले तर सुमारे 500 रुपये प्रति चौ.मी. म्हणजे 5000, 6000 प्रति चौ.मी. इतका दर फक्त स्ट्रक्चरल मेंबर्स्साठी असतो.आपण इमारतींच्या दुरुस्तीसाठी सेसबाबत 2000 रुपयांचे बंधन घातलेले आहे. जर आपण त्याचा हिशोब काढला तर प्रति चौ.मी.ला 2000 रुपये धरले तर प्रति चौ.फू.साठी जवळजवळ 186 रुपये दुरुस्तीसाठी खर्च येतो. घरदुरुस्ती मंडळाचा उद्देश असा आहे की, जुन्या इमारतींची स्ट्रक्चरल स्टेबिलिटी राहिली पाहिजे आणि त्या साठी हा फंड खर्च करावयाचा असतो. परंतु 186 रुपये प्रति चौ.फूट यानुसार दुरुस्तीचे काम चांगल्या प्रकारे होऊ शकेल की नाही याचाही विचार करणे गरजेचे आहे. जर एवढ्या तुटपूंज्या पैशामध्ये इमारतींची पुनर्बांधणी किंवा दुरुस्ती होणार नसेल तर आपल्यासमोर कोणता पर्याय आहे?

सभापती महोदय, मी माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री श्री.सचिन अहिर यांना सांगू इच्छितो की,या मुंबई शहरामधील अनेक छोटे प्लॉट, ज्याला नॉन बिल्डेबल प्लॉट म्हणतात,ज्याठिकाणी मुळातच नवीन डी.सी.आर.च्या नियमानुसार बांधकामच होऊ शकत नाही, अशा मुंबई शहरामध्ये शेकड्याने इमारती आहेत. त्यांचा तळमजला कायम आहे आणि वरच्या मजल्यावरील रहिवासी गेले 25-30 वर्षे ट्रान्झिट कॅम्पमध्ये खितपत पडलेले आहेत. अशा इमारतींची जागा अत्यंत छोटी असल्यामुळे त्याचे म्हाडाच्या अंतर्गत ॲक्वीझिशन करावयास पाहिजे, ते करीत नाही. असे अनंत प्रश्न आहेत. मुंबई शहरातील घर दुरुस्तीच्या संबंधातील महत्वचा प्रश्न आपण रोज वाचत असतो. परवा पायधुनी येथील एक इमारत पडली. या इमारती पडतच रहाणार आहेत. अशा इमारतींची दुरुस्ती हा तात्पुरता इलाज आहे.आज आपल्यासमोर 21 व्या शतकाचे जे चॅलेंजेस आहेत, त्यामध्ये शासनाने मुंबई शहराला आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर बनविण्याचा संकल्प सोडलेला आहे. ब्लॉक ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे . . . .

डेव्हल्पमेंटची संकल्पना यानिमित्तानेच आलेली आहे.मुंबई शहरातील ज्या इमारती आहेत, त्याबाबत डेव्हल्पमेंटच्या माध्यमातून आपण त्याचे ब्लॉक्स तयार केले पाहिजे आणि संपूर्ण या आयलँड सिटीसाठी मास्टर प्लॅन तयार करावयास पाहिजे.

सभापती महोदय,ज्याप्रमाणे चंदीगड शहराची रचना करण्यात आली,तशा पध्दतीने मुंबईच्या डी.सी.रेग्युलेशन असो, डेव्हल्पमेंटस् प्लॅन असो त्यामध्ये याचा अंतर्भाव केला नाहीत तर मला असे वाटते की, अनेक जुन्या इमारतींची पुनर्बांधणी होणार नाही आणि मग येथील गरीब रहिवाशी रस्त्यावर येणार आहेत. आपण पाहिले असेल की, मुंबई शहरातील गिरगावसारख्या भागामध्ये आपण इन्डिव्हिज्युअल इमारतींच्या पुनर्बांधणीसाठी परवानगी देतो.पण त्यावर आज कुठेतरी बंधन घालण्याची गरज आहे. त्याचा तांत्रिकदृष्ट्या अभ्यास करणे गरजेचे आहे. मी त्या बाबतीत जास्त सांगू शकत नाही. पण ज्या इमारतींचा प्लॉट एका विशिष्ट आकारमाना पेक्षा कमी असतील अशा इमारतींची पुनर्बांधणी करण्यासाठी आपण परवानगी द्यावयाची की नाही याचाही विचार करण्याची गरज निर्माण झालेली आहे. नाहीतर मग गिरगाव परिसरामध्ये दोन छोट्या प्लॉटस् वर दोन उत्तुंग इमारती उभ्या रहातात आणि त्यातील अंतर केवळ 10 फूट रहाते आणि मग या दोन इमारतींच्या मध्ये एखादी फळी टाकली तर एका इमारतीतून दुसऱ्या इमारतीमध्ये सहज जाऊ शकतो अशी अवस्था येईल. ही अवस्था एन्व्हायरमेंटच्या हिशोबाने अत्यंत चुकीची आहे. अशा ठिकाणी हवा नाही, पाणी नाही अशी भयानक अवस्था होणार आहे. जर या मुंबई शहराला अशा अवस्थेपासून वाचवावयाचे असेल तर .....

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत/शोधनासाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे....

माझे स्वत:चे प्रामाणिक मत असे आहे की, ब्लॉक डेव्हलपमेंट हा एकमेव पर्याय आपल्यासमोर राहतो. हा ब्लॉक डेव्हलपमेंट करावयाचा असेल तर त्याचा कायद्यातंर्गत विचार करावा लागेल. लिजचा प्लॉट असेल तर प्रश्न वेगळा आहे. पण मालकाला बंधन घालू शकतो. घटनेच्या माध्यमातून तो कोर्टात जाऊन त्याला स्थगिती आणू शकतो काय? या सगळयाचा कायदेशीर दृष्टया विचार करुन शासनाने भूमिका जाहीर करणे आवश्यक आहे. क्लस्टर डेव्हलपमेंट करायचे आहे परंतु त्यासाठी जे काम करायला पाहिजे, त्यासाठी ज्या पध्दतीने ब्लॉकची रचना करावयाला पाहिजे ती केली जात नाही. आज अनेक ब्लॉक असे आहेत की, या ब्लॉकच्या बाजूला हेरिटेज इमारती आहेत, त्यामुळे त्या ब्लॉकची डेव्हलपमेंट करते वेळी त्याचे बाहेरचे एलिशन कशा पध्दतीने असले पाहिजे, अशा पध्दतीची अभ्यासपूर्ण अशा प्रकारची बंधने घालून, ब्लॉक्स कसे डेव्हलप करता येतील, कशा पध्दतीने जास्तीत जास्त मोकळी जागा राहील, याचा विचार करणे अत्यंत गरजेचे आहे.

सभापती महोदय, शासन अनेक वेळा जुन्या इमारतींच्या पुनर्बांधणीचे किंवा जुन्या इमारतींच्या दुरुस्तीचे काम घेते. अनेक जुन्या इमारती नवीन डेव्हलपमेंट प्लॅन प्रमाणे रस्त्यामध्ये येतात. त्या इमारतींची दुरुस्ती केली तर, रस्त्याच्या रुंदीकरणाचा प्रश्न तसाच राहतो. मुंबई शहरामध्ये वाहतुकीच्या समस्या गंभीर बनत आहेत. वाहने रस्त्यामध्ये तासनतास उभी असतात. यामुळे जुन्या इमारतींची पुनर्बांधणी करणे हा एकमेव पर्याय आहे. यामुळे केवळ इमारतींची पुनर्बांधणी होणार नाही, केवळ इमारतीतील रहिवाशांचे पुनर्वसन होणार नाही तर खऱ्या अर्थाने या भागाची डेव्हलपमेंट होईल. रस्त्याचे रुंदीकरण होईल, इन्फ्रास्ट्रक्चरचे अपग्रेडेशन होईल. हे सर्व काम करावयाचे असेल तर मला वाटते या निमित्ताने शासनाने केवळ एक धोरण जाहीर करुन उपयोग होणार नाही तर त्या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, त्याचा सखोल अभ्यास करणे, कायद्यांतर्गत अभ्यास करणे, क्लस्टर्स कशा पध्दतीने तयार होतील ते जाहीर करणे, ते क्लस्टर्स कुणी घ्यावयाचे, कसे घ्यावयाचे, 70 टक्के रहिवाशांची ना हरकत घ्यावयाची की नाही आणि ती नाहरकत घ्यावयाची नसेल तर ते सर्व काम पारदर्शक कशा पध्दतीने होईल याचा विचार करण्यासाठी शासनाने त्या भागातील तज्ज्ञ, लिगल तज्ज्ञ, घटनेचे तज्ज्ञ, प्लॅनिंगचे तज्ज्ञ, स्ट्रक्चरल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे.....

इमारतींचे तज्ज्ञ, आर्किटेक्चरमधील तज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते ज्यांनी या भागामध्ये काम केलेले आहे, विधिमंडळाचे सदस्य, जे याचा अभ्यास करु इच्छितात, अशांचा एक अभ्यास गट नेमणे, ही काळाची गरज आहे. मुंबई शहरात 1940 मध्ये दाटीवाटीने इमारती उभ्या राहिल्या आहेत. त्या लाकडाच्या इमारती आहेत किंवा या इमारतींमध्ये लाकडाचा मोठया प्रमाणात वापर करण्यात आलेला आहे. त्या इमारतींना आग लागली आणि त्यावेळी जर हवा जोरात वाहत असेल तर एका लाईनीत सगळया इमारती जळू शकतील अशा प्रकारची परिस्थिती या ठिकाणी आहे. याच सभागृहात हायड्रन्ट या विषयावर सांगण्यात आले. पण या सगळया तुटपुंज्या व्यवस्था आहेत. या ठिकाणी ट्राफिकच्या समस्या आहेत. त्यामुळे सायन्टिफिक पध्दतीने मुंबई शहरातील इमारतींची पुनर्बांधणी कशी होईल, याचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे. केवळ धोरण जाहीर करुन हे साध्य होणार नाही, याची मला खात्री आहे.

सभापती महोदय, रिपेअर बोर्डाच्या इमारतीं व्यतिरिक्त हाऊसिंगच्या इमारतींचा प्रश्न मोठया प्रमाणात आहे. अभ्युदय नगर असेल, पत्राचाळ असेल, टिळक नगर असेल, विशेषत: टिळक नगर या भागात आपण गेलो तर त्याठिकाणी इन्डिव्हिज्युअल सोसायटयांच्या इमारती आणि टॉवर्स उभे राहिलेले दिसून येतात.अशा प्रकारे शासना मार्फत ओपन स्पेस कन्सेशन्स देण्यात येते, वेगवेळया प्रकारची कन्सेशन्स देण्यात येतात आणि त्यातून एक सिमेन्ट कॉंक्रीटचे जंगल उभे राहण्याची प्रक्रिया सुरु होते. त्यामुळे या बाबतीत धोरणात्मक विचार करणे गरजेचे आहे. प्लॅनिंगच्या दृष्टीने विचार करणे गरजेचे आहे. मुंबई शहराच्या पुढील वाटचालीच्या दृष्टिकोनातून याचा विचार करणे गरजेचे आहे. माझी शासनाला विनंती आहे की, या सर्व कामासाठी एक्सपर्टस् आणि विधिमंडळातील सदस्यांचा एक अभ्यास गट तयार करण्यात यावा, जेणे करुन लवकरात लवकर कायदेशीर पध्दतीने प्लॅन तयार करुन मुंबई शहरातील पुनर्बांधणीचे काम करता येईल.

अशुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. बरवड...

श्री. प्रकाश बिनसाळे ....

मुंबई शहरातील गरीब लोकांना कशा पध्दतीने घरे देऊ शकू याचा विचार व्हावयास पाहिजे.

आमच्या गिरगाव, ताडदेव, खेतवाडी, कुंभारवाडा भागात पाहिले तर त्या ठिकाणी कोकणातील, पश्चिम महाराष्ट्रातील मराठी भाषिक लोक मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यांना त्या भागातून स्थलांतरित होऊ द्यावयाचे नसेल आणि या मुंबई शहराचे मराठीपण वाचवावयाचे असल तर कोठे तरी अभ्यासपूर्ण पध्दतीने या बाबतीत निर्णय घेतले पाहिजेत. टिट-बिट पध्दतीने जर आपण निर्णय घेतले, तुकड्याने जर निर्णय घेतले तर येणाऱ्या काळामध्ये त्याच्या परिणामांना आपल्याला सामोरे जावे लागेल. त्याचे परिणाम अत्यंत भयंकर असणार आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करुन या ठरावाच्या माध्यमातून मी शासनाला विनंती करु इच्छितो की, आपण याकडे कृपया गांभीर्याने लक्ष द्यावे. केवळ बिल्डरांचा फायदा होईल अशा पध्दतीचे काही करु नये. फायदा झाल्याशिवाय कोणी काम करीत नाहीत. पण बिल्डरांचाही फायदा झाला पाहिजे आणि जे मूळ रहिवाशी आहेत ते सुध्दा त्या भागातून दुसरीकडे जाता कामा नये, याचा विचार केला गेला पाहिजे. या पध्दतीने जर आपण काम केले आणि व्यवस्थित समतोल जर राखण्याचा प्रयत्न केला गेला आणि मुंबई शहराचे पुढचे चित्र काय आहे त्या चित्राकडे लक्ष देऊन जर आपण काम केले तर येणाऱ्या काही दिवसांमध्ये मुंबई शहरासाठी आपण काही देऊ शकू. हे काम करण्यासाठी शासनाने अशा पध्दतीची समिती नेमावी अशी आग्रहाची विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी फार महत्वाचा विषय सभागृहामध्ये चर्चेसाठी आणलेला आहे. आपण मुंबई शहराचा विचार केला तर येथील लोकसंख्या फार मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. मुंबई शहरामध्ये 1 कोटी 30 लाख लोक दाटीवाटीने राहतात. मुंबईमध्ये ज्या जुन्या आणि मोडकळीस आलेल्या इमारती आहेत त्यांचा प्रश्न खूप मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेला आहे. दरवर्षी पावसाळा आल्यानंतर कोठे ना कोठे इमारत पडलेली आहे, अनेक लोक ढिगाऱ्याखाली दबले गेले आहेत, काही लोक मृत पावलेले आहेत, काही लोक जखमी झालेले आहेत अशा घटना घडल्याचे आपल्या लक्षात येते. म्हाडाकडून किंवा इतर संस्थेकडून इमारतीवर नोटीस लागल्यानंतर लोकांच्या पोटात गोळा येतो. आमची इमारत मोडकळीस आलेली आहे आणि आता आम्ही आता कोठे जावयाचे, असा प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण होतो. त्यांच्या मुलांच्या शाळांचा प्रश्न निर्माण होतो. कामाच्या ठिकाणाचा प्रश्न निर्माण होतो. सगळे प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण होतात. आता आपण काय केले पाहिजे याबाबत लोकांना काही समजत नाही. म्हणून मला असे वाटते की, या संदर्भात शासनाने काही तरी प्लॅनिंग केले पाहिजे.

सभापती महोदय, अनेक ठिकाणच्या इमारतीमधील लोकांना ट्रान्झिट कॅम्पमध्ये शिफ्ट केले जाते. 25-30 वर्षे लोक त्या ट्रान्झिट कॅम्पमध्ये राहतात. काही ठिकाणी तर म्हाडाच्या इमारतीच्या बाबतीत अधिकारी सांगतात की, या इमारती रिकाम्या आहेत. सायन-कोळीवाडा, ट्रक टर्मिनल, ॲन्टॉप हिल, प्रतिक्षानगर वगैरे ठिकाणी म्हाडाच्या इमारतींमध्ये अनेक घुसखोर राहतात. ज्यांच्यासाठी इमारती बांधलेल्या आहेत त्यांना घरे मिळतच नाहीत. या घुसखोरांना आता कोठे घालवावयाचे बाबतीत नवीन प्रश्न निर्माण झालेला आहे. घाटकोपरला पंतनगर येथे म्हाडाची फार मोठी कॉलनी आहे. त्या ठिकाणी जी बैठी घरे आहेत ती मोडकळीस आल्यामुळे आता आपण कोठे जावयाचे असा प्रश्न तेथील लोकांना पडतो. अशा प्रकारे मोडकळीस आलेल्या इमारती मोठ्या प्रमाणावर आहेत. जेव्हा आपण शहराचा विकास करतो तेव्हा शहराचा नवीन विकास कसा होईल एवढ्यापुरतेच आपण बघतो. पण पूर्वीच्या ज्या इमारती आहेत, ज्या ठिकाणी असंख्य कुटुंबे राहात आहेत, त्यांचा आपण विचार करत नाही आणि केला तर अगदी 1 टक्का किंवा 2 टक्के लोकांनाच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण .....

त्याचा फायदा मिळतो. जवळजवळ 90 टक्के लोकांना त्याचा फायदा मिळत नाही. हा एक मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. या ठिकाणी जी पुनर्बांधणी केली जाते त्यामध्ये महापालिकेच्या नियम 33(7) आणि 33(9) प्रमाणे चाळींच्या लोकांसाठी घरे बांधली जातात. परंतु हा कार्यक्रम अतिशय संथपणे चाललेला आहे. जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतीच्या बाबतीत या शहरामध्ये आपण काही प्लॅनिंग करीत नाही. मला अशी सूचना करावीशी वाटते की, मुंबई शहराचे जेव्हा आपण टाऊन प्लॅनिंग करतो तेव्हा याचा विचार केला पाहिजे. 1995 पूर्वीची जी अनधिकृत बांधकामे आहेत किंवा 100 वर्षापासून चाळीत राहणारे जे लोक आहेत, त्या चाळींची दुरुस्ती करण्याच्या बाबतीत आज म्हाडा सुध्दा खूश नाही आणि कोणीही खूश नाही. त्यांना असे वाटते की, एवढ्याच जागेमध्ये नवीन इमारती बांधाव्यात. ज्या ठिकाणी 2-3 मजल्यांच्या इमारती आहेत त्या ठिकाणी 25-30 मजल्यांचा किंवा 40-50 मजल्यांचा टॉवर बांधला तर त्यातून आपल्याला जास्त फायदा मिळू शकेल. अशा पध्दतीचा विचार सगळीकडे केला जातो.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विद्या चव्हाण.....

परंतु टॉवर बांधल्यानंतर महानगरपालिकेला जो कर द्यावा लागतो किंवा रहिवाशांना जो मासिक खर्च येतो तो परवडत नाही. सिंगापूर शहरामध्ये 25-30 वर्षे झालेल्या इमारती तोडल्या जातात. तेथे लोकांचा विचार केला जातो. परंतु आपल्याकडे केवळ विकास होत आहे. जुन्या इमारतींमध्ये व चाळींमध्ये राहणाऱ्या लोकांचा शासन विचार करीत नाही. तो विचार झाला पाहिजे एवढेच सांगून मी येथे थांबते.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्यांच्या अनुपस्थितीमुळे अशासकीय ठराव व्यपगत करण्याबाबत

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, या सभागृहामध्ये विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत. त्याचे कारण मी विचारणार नाही. परंतु सभागृहात आता अशासकीय ठरावावर चर्चा सुरु आहे. विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्यांचे अशासकीय ठराव आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविलेले आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांच्या ठरावावरील चर्चेला सुरुवात होण्यापूर्वी आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविलेल्या सन्माननीय सदस्यांकडून अशासकीय ठराव पुढे ढकलण्याबाबत माननीय सभापतींना पत्र आल्यामुळे त्यांचे अशासकीय ठराव पुढे ढकलण्यात येत असल्याचा उल्लेख केला आहे.

विधानपरिषदेच्या नियमाप्रमाणे ज्या सन्माननीय सदस्यांनी अशासकीय ठराव दिला असेल ते सदस्य जर सभागृहात उपस्थित नसतील तर त्यांचा ठराव व्यपगत होतो. आज ज्या सन्माननीय सदस्यांचे अशासकीय ठराव कामकाजपत्रिकेवर दाखविलेले आहेत ते सन्माननीय सदस्य विधानमंडळाच्या आवारात आहेत. त्यांनी उपस्थिती पत्रकावर सह्या केलेल्या आहेत. या आवारात उपस्थित रहावयाचे आणि सभागृहात उपस्थित रहावयाचे नाही, बाहेर आंदोलन करावयाचे आणि ठराव पुढे ढकलण्याबाबत माननीय सभापतींना पत्र द्यावयाचे. हे नियमाला धरुन नाही. त्यामुळे ज्या सन्माननीय सदस्यांनी त्यांचे अशासकीय ठराव पुढे ढकलण्याबाबत पत्रे दिलेली आहेत त्यांचे ठराव पुढे चर्चेसाठी येता कामा नये. ते ठराव लॅप्स झाले पाहिजेत.

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अशासकीय ठरावाबाबत आता जी सूचना केली आहे त्याला माझा पाठिंबा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

पृ.शी.: मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या कारभारात सुधारणा होणे

मु.शी.: मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या कारभारात सुधारणा होणे या विषयावरील श्रीमती अलका देसाई यांचा ठराव

(चर्चा पुढे सुरु....

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी मुंबईतील जुन्या इमारतींची जी अवस्था झालेली आहे त्यासंबंधी त्यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या ठरावाबद्दल प्रथम मी त्यांचे अभिनंदन करतो. या ठरावावर माझी मते मांडत असताना काही गोष्टींबाबत शासनाला नम्रपणे सांगेन की ज्या जुन्या इमारतींबाबत आम्ही बोलत आहोत त्यामध्ये दोन्ही विभागातील इमारतींचा समावेश आहे. मुंबई शहराला आयलण्ड सिटी म्हणतो, या शहरामध्ये सेसच्या इमारती आहेत. ज्याला आपण उपनगर म्हणतो त्या उपनगरामध्येही जुन्या इमारती आहेत. या आयलण्ड सिटीमधील जुन्या इमारतीची परिस्थिती भयानक व वाईट आहे. मागील टर्ममध्ये मी याच विभागाचे प्रतिनिधीत्व करीत होतो. 5 वर्षे काम करीत असताना जवळपास 90 टक्के फंड या इमारतींच्या दुरुस्तीवर खर्च होत होता. खर्च झाल्याबद्दल कसलेही दु:ख नाही. त्या भागात सेसच्या व नॉनसेसच्या इमारती आहेत त्यामध्ये 80 वर्षापूर्वीच्या इमारती आहेत. त्यामध्ये अलीकडील काळातील एकही इमारत दिसणार नाही. त्यामुळे त्या इमारतींची दुरुस्ती केली तरी त्यांची भयानक स्थिती समोर आलेली आहे.

गेल्या आठवड्यात एक इमारत पत्त्याप्रमाणे कोसळली आहे. त्या इमारतीच्या दोन्ही बाजूला इमारती असतानाही पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे ती इमारत कोसळली. मी ज्या भागाचे प्रतिनिधीत्व करीत होतो त्याच भागातील ती इमारत होती. त्यानंतर त्या इमारतीला मंत्री महोदयांनी भेट दिली होती. ही इमारत कोसळण्यापूर्वी मी स्वत: त्या इमारतीला भेट दिली होती. त्या इमारतीची सर्व लाकडे सर्व सडलेली होती. या सेसच्या इमारती दुरुस्तीच्या पलीकडे गेलेल्या आहेत. या संदर्भात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. आम्ही क्लस्टर डेव्हलपमेंटचा पर्याय आम्ही सूचित केला होता.

4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्री.भाई जगताप.....

त्यातील अडचणी दूर करण्यासाठी शासनाने काही पावले उचलली आहेत. तो विभाग सीआरझेड-2 मध्ये येतो, त्यामुळे त्या अडचणी होत्या. परंतु शासनाने सीआरझेड कायद्यात असलेल्या अटी शिथिल करण्यात यश मिळविले. त्याबाबत मी शासनाचे मनापासून अभिनंदन करीन. चौपाटीच्या आसपास हा परिसर आहे. तसे पाहिले तर मुंबई ही समुद्राच्या किनाऱ्यावरच आहे. पण जी अडचण होती, ती अडचण दूर झाली.

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

या ठरावाच्या माध्यमातून शासनाला ख-या अर्थाने काही कालबद्ध निर्णय घेण्याची गरज आहे. आता केवळ पावसाळ्यापुरते हे अपघात मर्यादित राहिलेले नाहीत. परवा झालेला अपघात फार भयानक होता. रात्री दीड वाजता अपघात झाला. त्यामध्ये 5 जण जागीच मृत्यूमुखी पडले आणि 2 जण अजूनही अत्यवस्थ असून आयसीयूमध्ये आहेत. हे अपघात होऊ नयेत म्हणून ठोस उपाययोजना करीत असताना सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी केलेल्या सूचनेचा विचार करण्याची आवश्यकता आह. त्यांनी दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांची एक समिती गठीत करावी असे सुचविलेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी ट्रँझिट कॅम्पचा उल्लेख केला. ट्रँझिट कॅम्प हा आता लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न झालेला आहे. लोकांच्या ज्या प्रतिक्रिया आहे त्या मी येथे सांगत आहे. लोक असे सांगतात की, कहीं भी भेजो लेकिन ट्रांझिट कॅम्प में मत भेजो. धारावी येथील ट्रँझिट कॅम्प अलीकडेच बांधलेला असल्यामुळे तो ट्रँझिट कॅम्प सोडला तर अन्य सर्व ट्रँझिट कॅम्पची अतिशय दूरवस्था झालेली आहे. गिरगावातील माणसाला मालवणी, मानखुर्द, गोवंडी येथील ट्रँझिट कॅम्पमध्ये पाठविले तर त्याच्या मुलांच्या शिक्षणाचे काय ? गोरेगावातील माणूस कामाला एकीकडे असतो आणि त्याला राहाण्यासाठी दुसरीकडे जागा दिली जाते. ह्या सर्व अडचणी लक्षात घेऊन ट्रँझिट कॅम्पमध्ये जाणा-या माणसाला असे सांगितले की, तुला पुन्हा 3-4 वर्षांनी नवीन इमारतीमध्ये जागा मिळेल, तर तो स्वत:ला कुठे तरी ॲडजस्ट करुन घेऊ शकेल. परंतु दुर्दैवाने असे घडत नाही. दोन-दोन पिढ्या ट्रँझिट कॅम्पमध्ये राहिल्या आहेत. माणूस ट्रँझिट कॅम्पमध्ये गेल्यानंतर त्याचा मुलगाही तेथे जातो, त्या मुलाचे लग्न होते, त्याला मुले होतात वगैरे. म्हणजे या महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळावरचा लोकांचा संपूर्ण विश्वासच उडालेला आहे. अनेक गोष्टी मला बोलायच्या आहेत. त्या मी आता येथे बोलणार नाही. अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळी त्याबाबतीत मी जरुर चर्चा करीन. परंतु जुन्या इमारतींच्या विकासासाठी जो काही विभाग शासनाने निर्माण केलेला आहे त्या विभागाने ज्या सक्षमपणे काम करायला पाहिजे त्या सक्षमतेने तो काम करत नाही असा माझा आरोप आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

सभापती महोदय, परवा मी एका इमारतीची पाहणी करण्यासाठी गेलो. त्या इमारती बाबत मी म्हाडाच्या अधिका-यांना विचारले. त्यांनी सांगितले की, ती महापालिकेची इमारत आहे. ती सेसची इमारत होती. सेसची इमारत महापालिकेची कशी काय असू शकेल ? म्हणजे आपली जबाबदारी दुस-यावर ढकलण्याचे काम अधिकारी करीत आहेत याची नोंद घेतली पाहिजे. मी अधिका-यांना विचारले की, ही इमारत धोकादायक म्हणून जाहीर केली आहे काय ? त्यांनी सांगितले की, इमारत धोकादायक असल्याचे जाहीर केलेले असून लोकांना नोटीस दिलेली आहे. मग जाहीर नोटीस काढून, दारावर नोटीस चिकटवून रहिवाशी घराबाहेर निघत नसतील तर त्यांना घराबाहेर काढण्याची प्रक्रिया का केली जात नाही ? उद्या माणसाचा जीव गेल्यानंतर सरकार काही मदत जाहीर करीत असेल तर ते योग्य होणार नाही. सभापती महोदय, गेल्या 5 वर्षात अशा प्रकारच्या अनेक अपघातांना आपण सामोरे गेलो आहोत हे आपणास माहीतच आहे. प्रत्येक अपघातात 5-7 माणसे दगावलेली आहेत. राहाण्यास अयोग्य असलेल्या धोकादायक इमारतींची यादी तयार केली जाते. त्या इमारतीमधील लोकांना सक्तीने खाली करुन संक्रमण शिबिरात आणले गेले पाहिजे. तशी कायद्यामध्ये तरतूद आहे. परंतु ती तरतूद सक्षमपणे राबविली जात नाही हे मी येथे निदर्शनास आणून देऊ इच्छितो. ट्रॅंझिट कॅम्पच्या संदर्भात या सदनामध्ये अनेक वेळा चर्चा इ ालेली आहे. या ट्रॅंझिट कॅम्पमध्ये कमीत कमी पायाभूत सुविधा द्यायला पाहिजे. आज तेथील पाण्याचा प्रश्न असेल, आरोग्याचा प्रश्न असेल, स्वच्छतेचा प्रश्न असेल, हे प्रश्न इतके भयानक होऊन बसले आहेत की तेथे जाण्याची लोकांची मानसिकताच राहिलेली नाही. म्हणून याबाबतीत शासन निश्चितपणे विचार करील अशी माझी अपेक्षा आहे.

सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी जो अशासकीय ठराव येथे आणलेला आहे त्याला पाठिंबा जाहीर करीत असताना या संदर्भातील समिती लवकरात लवकर गठीत करावी

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धित प्रत / शोधनासाठी नाही

श्री.भाई जगताप.....

आणि त्यासंबंधी कालबध्द कार्यक्रम तयार करुन द्यावा. ठराविक काळात त्यांनी अहवाल सादर करुन तो शासनापर्यंत यावा आणि त्या अहवालाची केवळ छाननी न करता त्यातील शिफारशींची अंमलबजावणी व्हावी आणि या प्रश्नाला वाचा फुटावी अशा प्रकारची विनंती करतो. मी मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्थेचा प्रतिनिधी असल्यामुळे मला या प्रश्नाबाबत विचार मांडण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावाला पाठिंबा देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मुंबई शहरात अनेक वर्षापासून स्थायिक असलेल्या रहिवाशांच्या संदर्भात आणि त्यांची जी निवासस्थाने आहेत त्या संदर्भातील एक महत्वाचा आणि गंभीर विषय या निमित्ताने चर्चेसाठी सभागृहासमोर आलेला आहे. ज्या काही प्राथमिक गरजा आहेत, त्यामध्ये एखादा समाज ज्यावेळी एकत्रितपणे पुढे जायचा प्रयत्न करीत असतो, विकासाच्या वाटेवर चालायचा प्रयत्न करीत असतो त्यावेळेला त्याच्या प्राथमिक गरजा जोपर्यंत योग्य रितीने भागविल्या जात नाहीत तोपर्यंत त्या समाजामध्ये एक प्रकारे विषमतेची बीजे आपोआप रोवली जातात. फक्त राहण्याचा प्रश्न नाही. राहण्याची जागा निश्चित नसताना ज्या शहराबद्दल बोलले जाते की, किमान 30 टक्क्याहून अधिक लोकसंख्या ही रस्त्यावरच राहते. काही सिनेमे पूर्वी आले होते. त्यामध्ये तर ज्या पाईपलाईन्स अजून जमिनीमध्ये टाकलेल्या नाहीत त्या पाईपलाईन्समध्ये वस्ती करणाऱ्या लोकांच्या समस्या दाखविण्यात आल्या होत्या. हा बकालपणा, हे विदारक दृश्य आपल्याला मुंबईमध्ये ठिकठिकाणी पहावयास मिळते. राहण्याचे ठिकाण एका बाजूला, नोकरीचे ठिकाण दुस-या बाजूला, शाळा भलत्याच ठिकाणी असते. याचे सामाजिक परिणाम होत असतात. कुटुंब म्हणून जी काही एकत्रित राहण्याची प्राथमिक पध्दत असते त्याप्रमाणे कुटुंब एकत्रित राहील की नाही अशी अवस्था निर्माण झालेली आहे. ही अवस्था निर्माण झाल्यानंतर शिक्षणाचा अधिकार मिळालेल्या मुलांना शिक्षण देणार आहोत. शिक्षण योग्य पध्दतीने मिळाले नाही तर त्यांना पुढे आयुष्यात काय करायचे आहे यादृष्टीने त्यांची आयुष्याच्या रस्त्यावर चुकीच्या मार्गाने वाटचाल होत राहणार आहे. हा सगळा भाग आपण तपासून पाहतो त्यावेळेला ज्या पध्दतीने या शहराचे परिवर्तन करण्यासाठी आपल्याला प्रयत्न करावयाचे आहेत त्या प्रयत्नामध्ये एक तर यासाठी ज्या यंत्रणा नेमलेल्या आहेत त्या यंत्रणा योग्य पध्दतीने काम करीत नाहीत. त्या यंत्रणांमध्ये भ्रष्टाचार होतो. याठिकाणी ट्रान्झिट कॅम्पचा उल्लेख केला गेला. 25-30 वर्षापूवी ट्रान्झिट कॅम्पमध्ये रहावयास गेलेल्या कुटुंबाला आपल्या मूळच्या भागाची ओळख तरी राहणार आहे का? या स्वप्नवत वाटणाऱ्या गोष्टी आहेत, ज्या कधीच पूर्ण होणार नाहीत. त्यामुळे या ज्या प्राथमिक गरजा आहेत या गरजांकडे लक्ष द्यायचे असेल तर आपण सगळ्या मराठी लोकांनी खूप वर्षापूर्वी "बटाट्याची चाळ" हे पु.ल.देशपांडे यांनी लिहिलेल्या पुस्तकामध्ये चाळीतील जीवनाबद्दलचे वर्णन वाचले आहे. पूर्वी समाज या पध्दतीने रहात होता. एकत्रितपणे रहात होता. त्यावेळच्या अडचणींना हा समाज तोंड देत होता.

नंतर 2 के.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

ते लोक सहनशील होते. मुंबईमध्ये रोजगारांसाठी मोठया प्रमाणात लोंढे येत असतात व त्यामुळे मुंबईचे मूळचे लोक कमी होणार असतील व त्यामधून निर्माण होणारे प्रश्न, सामाजिक समस्या पुढील काळात अतिशय गुंतागुंतीच्या व समाजाच्या दृष्टीने अतिशय घातक पातळीपर्यंत जाऊन पोहचतील. त्यामुळे या प्रश्नावर नियंत्रण आणण्याची आवश्यकता आहे. या समस्यांवर देखरेख ठेवण्याची आवश्यकता असून यामधील भ्रष्टाचाराचे मुद्दे पुन्हा पुन्हा डोके वर काढणार नाहीत व त्यासाठी एक कालबध्द कार्यक्रम तयार करुन किती वर्षात, किती इमारतींच्या दुरुस्त्या होतील, ज्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत त्या नव्या कशा बांधता येतील व नव्या बांधलेल्या इमारतींचे आयुष्यमान किती राहणार आहे व नंतरचा प्लॅन काय राहणार आहे याची निश्चितपणे माहिती पुढे येण्याची आवश्यकता आहे. यावर्षी बोलत असतांना प्रत्येक दशकानंतरची स्थित्यंतरे व गरजा लक्षात घेऊन त्या प्रमाणे नियोजन करावयाचे असेल तर या विषयाचा अतिशय गांभीर्याने विचार व्हावयास पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी जो अशासकीय ठराव मांडलेला आहे त्यावर विचार करण्यासाठी दोन्ही सभागृहाच्या सदस्यांची एक समिती नेमून त्यासंदर्भात विचार व्हावा अशी विनंती करुन मी आपली रजा घेतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. मुंबईमध्ये ज्याला जशी पाहिजे तशा रीतीने घरे बांधली जात आहेत. रिडेव्हलपमेंटच्या संदर्भात या सभागृहात नेहमीच चर्चा होत असते. गोरेगाव येथील मोतीलाल नगर येथे गरीब समाजाच्या लोकांसाठी तयार करण्यात आलेली एक वस्ती आहे. या ठिकाणीही आता बिल्डरांनी हात घातलेला आहे. परवानगी नसतांनाही त्या ठिकाणच्या लोकांना घराबाहेर काढण्याचा प्रकार येथे चालला आहे. पोलीस, हौसिंग बोर्डाचे अधिकारी, रजिस्ट्रार या सर्वांना बिल्डरंनी विकत घेऊन मुंबईमध्ये धुमाकूळ घातलेला आहे. त्यामुळे याला पायबंद घालणे अतिशय आवश्यक आहे.

सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी जो विचार व्यक्त केलेला आहे त्याच्याशी मी सहमत आहे. आपण क्लस्टर डेव्हलपमेंटची कल्पना स्वीकारलेली आहे. परंतु प्रत्यक्षात काहीही काम होत नाही अशी परिस्थिती आहे. मुंबईचा विकास कशा प्रकारे व्हावा यासंदर्भात काही आर्किटेक्टने विचार मांडलेले आहेत. इतर शहरामध्ये गेल्यानंतर त्या त्या ठिकाणची वस्ती वेगळी असते, घरे एका प्रकारची असतात, रंग एका प्रकारचे असतात, फुटपाथ चांगले असतात परंतु हे सर्व मुंबईमध्ये करायचेच नाही आपण ठरवले आहे की काय ? मुंबईमध्ये आता सिमेंटच्या झोपडपट्टया निर्माण होत आहेत. एसआरएच्या नावाने ज्या वस्त्या तयार केलेल्या असतात त्या ठिकाणी आता ज्या समितीचा उल्लेख केलेला आहे त्या समितीने तेथे जाऊन पाहणी करावी व त्या ठिकाणी नेमकी काय अवस्था आहे याचा रिपोर्ट द्यावा अशी माझी सूचना आहे. त्या ठिकाणच्या लिफ्टची, रुम्सची तसेच पाण्याची काय अवस्था आहे हे सर्व पाहण्याची आवश्यकता आहे. एसआरएच्या इमारती अतिशय ढिसाळ बांधलेल्या असतात. भिंतीला खिळा मारावयाचा म्हटला तर खिळा मारता येत नाही तर संपूर्ण भिंतच कोसळते अशी अवस्था आहे. त्यामुळे यासंदर्भात गांभीर्याने विचार होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, कामगारांसाठी घरे बांधण्याच्या संदर्भात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आदरणीय श्री. खेर यांच्या नावाने वांद्रे येथे एक वसाहत बांधण्यात आली होती. परंतु नंतर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई .....

कामगारांच्या घरासाठी काहीही प्रयत्न झाले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. हौसिंग बोर्डाने गरिबांसाठी घरे बांधण्याचे सोडूनच दिलेले आहे. हौसिंग बोर्डाच्या विकासाचे काम बिल्डरांना दिले जाते व ते बिल्डर लोकांना कशा प्रकारे त्रास देतात याची आपल्या सर्वांना कल्पना आहे. वांद्रे येथे दिवाण आणि आरएनए यांनी मोठया प्रमाणात धुमाकूळ घातलेला आहे. सिव्हरेजची काय व्यवस्था राहणार आहे, पिण्याच्या पाण्याची काय परिस्थिती राहणार आहे हे काहीही सांगितले जात नाही उलट त्या भागात अगोदर जे रहिवासी राहत होते त्यांचे पाणी कमी करुन नवीन इमारतींना दिले जात आहे. त्यामुळे या सर्व प्रकाराला बंधन घालण्याची वेळ आलेली आहे असे मला वाटते.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई....

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी आहे की, आज मुंबईचा विकास कशा प्रकारे केला जाणार आहे, याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. मुंबई शहरामध्ये सतत नवीन प्रकल्प सुरु होत असतात. मुंबईचा विकास कसा केला जाणार आहे, याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी आपल्या भाषणात केला. मुंबईमध्ये जे अधिकृतपणे लोक राहतात, त्यांची अवस्था अत्यंत वाईट आहे व जे लोक मुंबई शहरामध्ये अनधिकृतरीत्या राहतात त्यांना शासनाकडून घरे मिळतात. मी या ठिकाणी प्रांतीय व अप्रांतीय असा वाद निर्माण करणार नाही. मात्र वर्षानुवर्षे मुंबईमध्ये गिरणी कामगार राहत आहेत. मात्र त्यांची आजची बदललेली परिस्थिती पाहिली की, आपल्याला अतिशय वाईट वाटते. या ठिकाणी मोठया प्रमाणात कोकणी कामगार राहत होते. मात्र आज त्यांना संपूर्णपणे देशोधडीला लावले जात आहे. त्यांना आता मुंबई पासून लांब वसई सारख्या ठिकाणी स्थलांतर करावे लागत आहे. मात्र जे लोक मुंबईमध्ये अनधिकृतरीत्या राहतात, त्यांना शासनाकडून तेथेच घरे बांधून दिली जातात. अशा प्रकारांमुळे हे शासन मराठी लोकांच्या विरोधात आहे की काय, असा संदेश लोकांमध्ये जात आहे. हे बरोबर नाही राज्यात असे प्रकार घडणे योग्य नाही. खरे तर मुंबईमध्ये अधिकृतपणे राहणाऱ्यांना शासनाकडून संरक्षण दिले गेले पाहिजे. मात्र दुर्दैवाने आज असे होताना आपल्याला दिसून येत नाही. गिरणी कामगारांच्या संदर्भात हेच घडलेले आहे.

सभापती महोदय, गिरणी मालकांना शासनाने सवलतीच्या दराने सरकारी जमिनी दिलेल्या आहेत. आता या जमिनीवर कोणाला घरे मिळणार आहेत ? मी आपणास सांगू इच्छितो की, येथे कोणालाच उद्योगधंदे चालवायचे नाहीत. शहरातील अनेक उद्योगधंदे बाहेर जात आहेत. कोणी म्हणते उद्योगधंद्याच्या दृष्टीने गुजरात राज्य चांगले आहे, तर कोणी म्हणते अमुक राज्य चांगले आहे. त्यामुळे सदर जमिनीवर इमारती बांधणे व पैसे उकळणे असे प्रकार सध्या सुरु आहेत. ते थांबविण्याची आवश्यकता आहे व त्याचा साकल्याने विचार केला पाहिजे.सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी आपल्या भाषणात समितीचा उल्लेख केला. त्यांनी सांगितल्या प्रमाणे एखादी समिती तयार करावी. या समितीमध्ये या सर्व बाबींचा साकल्याने विचारविनिमय करावा. आराखडा ठरवावा व त्या नंतर इमारतींना परवानगी द्यावी, अशी माझी विनंती आहे.एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी अतिशय महत्वाच्या विषयावर ठरावाच्या माध्यमातून चर्चा उपस्थित केली आहे. याच ठरावावरील चर्चेच्या वेळी सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण, सन्माननीय सदस्य सर्वश्री भाई जगताप, हेमंत टकले, हुसेन दलवाई या सर्वांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच त्यांनी या ठरावाच्या माध्यमातून अनेक सूचना देखील केलेल्या आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी दोन भागामध्ये आपले विचार मांडले आहेत. जुन्या इमारतीच्या प्रश्नाबाबत शासन नेमके काय करीत आहे, व शासनाने काय केले पाहिजे या बाबत त्यांनी आपले विचार मांडले. मुंबई शहरामध्ये म्हाडाच्या एकूण 56 वसाहती आहेत. भविष्य काळात या वसाहती कशा विकसित करता येतील व या करिता कोणत्या दिशेने विकास केला पाहिजे, हे त्यांनी या ठिकाणी सांगितले आहे. आपले विचार मांडत असताना काही विकासकांच्या संदर्भातील तक्रारींचा उल्लेख देखील त्यांनी केला आहे. तसेच टागोर नगर, कन्नमवार नगरच्या संदर्भात देखील त्यांनी काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी देखील दोन विषयाबाबत चर्चा केली आहे. मूलभूत दुरुस्तीच्या बाबतीत काही आक्षेप घेत असताना या इमारतींचा विचार केवळ दुरुस्तीपुरता करता येणार नाही, असे त्यांनी सांगितले आहे. तसेच इमारतींची पुनर्बांधणी क्लस्टर डेव्हलपमेंट व ब्लॉक डेव्हलपमेंट नुसार करण्याबाबत त्यांनी सूचना केली. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी जुन्या इमारतीच्या संदर्भात विचार मांडताना लोक ट्रान्झिट कॅम्पमध्ये का जात नाहीत, हे सांगितले. यामुळे काही वेळा घुसखोरांचा प्रश्न निर्माण होतो. पुनर्रचनेच्या बाबतीत देखील काही प्रश्न मांडण्यात आले. मुंबई शहरामध्ये मोठमोठया इमारती बांधल्या जातात. मात्र काही कालावधी नंतर इमारतीच्या मेंटेनन्सचा प्रश्न निर्माण होतो. सिंगापूरच्या धर्तीवर पुनर्बांधणीच्या संदर्भातही त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले होते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सीआरझेडचे बंधन उठविल्याबद्दल आभार व्यक्त केले. तसेच ट्रान्झीट कँपमधील लोकांच्या नाराजीबाबत त्यांनी सांगितले. आता जुन्या इमारतींचा प्रश्न केवळ शहरापुरता मर्यादित राहिला नसून उपनगरात

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देखील त्याची व्याप्ती वाढलेली आहे. त्या बाबतीत त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले आहे. पूर्वी चाळ म्हणजे एका अर्थाने एक नाते होते, या माध्यमातून एक सामाजिक चळवळ उभी राहत होती. मात्र आज हे नाते दूर होत चालले आहे, सामाजिक दृष्टीकोनातून सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी या ठिकाणी खंत व्यक्त केली. एकत्रित विकासासाठी लोकांनी पुढे आले पाहिजे या संदर्भात त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले आहे.

यानंतर श्री. सरफरे..

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर.....

माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी देखील 56 कॉलनी असलेल्या मोतीलाल नेहरु नगरमध्ये नेमके काय चालले आहे याबाबत आपले मत मांडले. तसेच, माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी मांडलेल्या मताशी सहमत होतांना त्या ठिकाणी क्लस्टर डेव्हलपमेंट व्हावयास पाहिजे, "खेर" या नावाने कामगारांची वस्ती निर्माण झाली, परंतु त्या ठिकाणी खऱ्या अर्थाने गिरणी कामगारांना न्याय मिळत आहे की नाही याचा त्यांनी या ठिकाणी उल्लेख केला आहे.

सभापती महोदय, मुंबई शहरातील या प्रश्नाकडे आपण पहाण्याचे काम केले असले तरी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामध्ये काम करीत असताना निश्चितपणे काही उणिवा राहू शकतात ही गोष्ट आपण नाकारु शकत नाही. परंतु या मुंबई शहरातील जुन्या इमारतींच्या दुरुस्तीच्या माध्यमातून आवर्जून सांगावे लागेल की, जगाच्या स्तरावर, भारताच्या स्तरावर किंवा महाराष्ट्रामध्ये स्वत:च्या मालकी हक्काच्या असलेल्या इमारतीमध्ये राहणाऱ्या भाडेकरुच्या सुरक्षिततेचा दृष्टीकोन समोर ठेऊन त्या इमारतींची दुरुस्ती किंवा इमारत पुनर्रचित करण्याचे काम करणारे जगाच्या पाठीवर एकही बोर्ड आपल्याला पहावयास मिळत नाही. त्यामुळे शासनाने 1994 साली या मंडळाची निर्मिती करण्याचे काम केले. त्या काळात 19 हजार उपकर प्राप्त इमारती उभ्या होत्या. त्यावेळी असे आवाहन करण्यात आले की, ज्यांना इमारती उपकर प्राप्त करुन घ्यावयाचा असतील त्यांनी आपल्या इमारती उपकर प्राप्त करुन घ्याव्यात, राज्य शासन म्हणून त्यांना काहीतरी हिस्सा देऊ. विशेष करुन ज्या भाडेकरुंनी कर भरला असेल त्या माध्यमातून घर मालकांना उपकराची रक्कम देण्याचे काम केले जाईल. त्यामधून मालकांनी सदर उपकराची रक्कम महानगरपालिकेमध्ये भरल्यानंतर सर्व संबंधित लोकांचे शेअर एकत्र करुन हे बोर्ड निर्माण करण्याचे काम केले. अशाप्रकारे वर्षाला 100 कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध करुन देण्याची भूमिका राज्य शासनाने घेतली आहे. त्यानंतरच्या काळात ही 19 हजार इमारतीची संख्या हळूहळू कमी होऊन आज ती 14 हजार 995 इतकी झाली आहे. मला याठिकाणी आवर्जून उल्लेख करावासा वाटतो की, म्हाडाच्या माध्यमातून इमारतींची दुरुस्ती करण्याचा आम्ही प्रयत्न केला. या इमारती पुनर्रचित करीत असतांना त्यामध्ये आम्हाला फार मोठे यश मिळाले असे म्हणता येणार नाही. याचे कारण आम्ही जे उद्दिष्ट ठरविले ते पूर्ण झाले नाही. त्यामुळे त्या मंडळाची मुदत वाढवून देण्यात आली आणि आजही ती मुदत वाढत असलेली दिसत आहे. आजही या मंडळाबद्दल लोकांच्या मनामध्ये प्रश्न निर्माण होत असतांना दिसत आहेत. त्यामुळे सन 2010 पर्यंत 389

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KGS/ KTG/ KTG/

श्री. सचिन अहिर.....

इमारती आपण पुनर्रचित करु शकलो. मध्यंतरीच्या काळात माननीय पंतप्रधानांनी दिलेल्या अनुदानामधून राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत 239 इमारती आपण बांधू शकलो. त्यामधील 66 इमारतींची पुर्नबांधणी करुन 6 हजार 305 गाळे बांधण्यात म्हाडाला यश प्राप्त झाले आहे. हे करीत असतांना एका बाजूला म्हाडाने इमारतीची पुनर्बांधणी करण्याची भूमिका घेतली आणि दुसऱ्या बाजूला इमारतीच्या दुरुस्तीचे काम करण्याची भूमिका घेतली. त्यामुळे 31 मार्च 2010 पर्यंत 24 हजार 837 इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीचे काम, ज्याला आपण पार्ट पोर्शन म्हणतो किंबहुना, संपूर्ण दुरुस्ती म्हणतो आणि वेळ प्रसंगी संपूर्ण इमारत आहे त्याच स्थितीत ठेवून तिची पुनर्बांधणी करण्याचे काम म्हाडाच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न केला आहे.

सभापती महोदय, या चर्चेच्या माध्यमातून माननीय सदस्यांनी दोन-तीन विषयांना स्पर्श करण्याचे काम केले आहे. त्यामुळे या चर्चेचे मी दोन-तीन भाग करु इच्छितो. ज्यावेळी आपण एकंदरीत जुन्या इमारतींचा विचार करतो त्यावेळी सर्व प्रथम आहे त्याच स्थितीमध्ये आपण इमारती कशा ठेवू शकतो याची चर्चा करणे गरजेचे आहे. मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे 25 हजारपेक्षा जास्त ठिकाणी इमारत दुरुस्तीचे काम आपण करु शकलो. एवढेच नव्हे तर माननीय सदस्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे या दुरुस्तीची असलेली मर्यादा वेळोवेळी वाढविण्याचे काम आपण केले आहे. सुरुवातीला ही मर्यादा 800 रुपये चौ.मी. होती त्यानंतर ती वाढवून 1200 रुपये चौ.मी. केली. त्यानंतर एक मोठी झेप घेऊन 2 हजार रुपये चौ.मीटर पर्यंत दुरुस्तीसाठी तरतूद करण्याचे काम केले. या इमारती आहेत त्याच स्थितीत कशाप्रकारे मजबूत ठेवू शकतो हे पाहण्याची आपण भूमिका घेतली. शासनाच्या माध्यमातून अनेक प्रश्न सोडविण्याची भूमिका आपण नेहमी घेत असतो. जुन्या इमारतींच्या दुरुस्तीचा एक नवीन धोरणात्मक दृष्टीकोन समोर ठेवून तातडीने निर्णय घेणे गरजेचे राहणार आहे हे आपण नाकारु शकणार नाही.

पर्यावरणाच्या दृष्टीने आज जगामध्ये निर्माण झालेली परिस्थिती आपण पहात आहोत, त्यामध्ये काही ठिकाणी सुनामी आली असेल...

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

किंवा मोठया प्रमाणात भूकंप झाला असेल अर्थात त्याचा स्पर्श इकडे होईल अशी भीती जरी आपल्या मनामध्ये नसली तरी देखील काही छोटे-मोठे भूकंप झाले किंवा वेळप्रसंगी सुनामी सारखी स्थिती निर्माण झाली तर या इमारतींच्या बाबतीत नेमकी काय परिस्थिती होणार आहे या प्रश्नाच्या बाबतीत निश्चितपणे विचार-विनिमय करावा लागणार आहे. म्हणून हे विचार करीत असताना पुढील काळा तील धोका लक्षात घेऊन याबाबत काही ना काही निश्चितपणे धोरणात्मक निर्णय घेण्याच्यादृष्टीने भूमिका घ्यावी लागेल. अशावेळी या इमारतींची जी स्थिती आहे त्यामध्ये दुरुस्ती करणे हे क्रमप्राप्तच आहे. पण त्यामध्ये काही अडचणी येत असतात. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे मुळामध्ये एखाद्या इमारतीची दुरुस्ती करीत असताना 2000 ची लिमिट ओलांडल्यानंतर, ज्याला आपण बिऑंड इकॉनॉमिक रिपेअर असे म्हणतो. मग आपण सेक्शन 88 (3) खाली नोटीस देऊन संबंधितांना विनंती करतो की, आता या इमारतीची पुनर्बांधणी करण्याची गरज आहे. या इमारतीच्या दुरुस्तीसाठी लागणारा निधी संपूर्णपणे संपलेला आहे आणि पुढच्या काळासाठी आपल्याकडे निधी नसल्यामुळे सदरहू काम करता येणार नाही. मग अशा वेळी सन्माननीय लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून दुरुस्तीची कामे होत असतात. परंतु सन्माननीय सदस्यांनी दुरुस्तीसाठी दिलेला निधी देखील कमी पडला तर मग आपण अशा इमारतींना धोकादायक इमारतींच्या यादीमध्ये ठेवले जाते.

सभापती महोदय, एक गोष्ट निश्चित आहे की, गेल्या आठवड्यात एक इमारत कोसळली. तेव्हा आता निव्वळ पावसाळ्यामध्येच इमारती कोसळतात ही आपल्या मनातील एक भावना होती, ती आपल्याला दूर करावी लागेल असे मला वाटते. या दृष्टीकोनातून नव्याने विचार करावा लागेल आणि यासाठी कन्टीन्युअस प्रोसेस करावी लागणार आहे. आपण "प्री-मान्सून, मिड-मान्सून आणि आफ्टर-मान्सून अशा प्रकारे इमारतींच्या बाबतीत तीन वेळा सर्व्हे होतात आणि आपण त्याबाबतीत यादी जाहीर करतो. परंतु आता पुढच्या काळामध्ये प्री-मान्सून सर्व्हे न करता, भविष्य काळामध्ये जो सर्व्हे होईल त्यावेळी तीन-तीन महिन्याचा सर्व्हे करण्याची भूमिका राज्य शासनाच्या माध्यमातून घेतली जाईल. तसेच हा सर्व्हे करीत असताना नेमके कोणते मेकॅनिझम वापरले पाहिजे. आज मला आवर्जून सांगावे लागले की, सर्व्हे करीत असताना आपण काही वेळेला अधिकाऱ्यांना दोषी ठरवितो किंवा त्यांच्यावर टीका करीत असतो. परंतु जोपर्यंत आपण त्यांच्याकडे यंत्रणा उपलब्ध करुन देणार नाही किंवा त्यांनी नेमके कशाप्रकारे सर्व्हे करावयाचा आहे हे सांगणार नाही, तोपर्यंत आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर . . . .

त्यांच्या बाबतीत निष्कर्षापर्यंत येणे बरोबर होणार नाही.म्हणून इमारतींच्या सर्व्हेच्या बाबतीत आपला मापदंड कसा असला पाहिजे आणि ते करीत असताना आपल्याला हे काम आय.आय.टी.सारख्या संस्थेच्या माध्यमातून करता येईल काय ? हा प्रश्न आहे. कारण आज सर्व्हे करीत असताना इमारतीची किती दुरुस्ती केलेली आहे, एकूण किती खर्च झालेला आहे? हे पहाणे आवश्यक आहे. परंतु यासाठी खर्च करीत असताना आपण ही बाब फिजीकली बाहेरुन पहातो. म्हाडाची माणसे सर्व्हेसाठी येत आहेत म्हणून तेथील एखाद्या मंडळाची मुले असतील किंवा चाळीतील रहिवाशी असतील ते इमारतीच्या खाली आरती घेऊन त्यांच्या जोरदार स्वागताला असतात जेणेकरुन संबंधितांना आतच येऊ द्यावयाचे नाही वगैरे. अशा अनेक अडचणी असतात. या सर्व गोष्टी केल्यानंतर मग त्यांना कागदावर लिहावे लागते की, यासाठी एवढा-एवढा निधी वापरलेला आहे आणि आता तो जास्त काळ चालणार नाही. मग ती इमारत धोकादायक होते.

सभापती महोदय, आज मला या चर्चेच्या माध्यमातून सांगावे लागेल की, 19 हजार इमारतीं पैकी 14 हजार इमारती या सर्वच धोकादायक आहेत असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. म्हणून मी कधी-कधी असे म्हणतो की, या सर्व इमारती एका टाईम बॉम्बवर उभ्या आहेत की काय? हा टाईम बॉम्ब कधीही फुटला तर या शहराची काय परिस्थिती होईल अशी भीती मनामध्ये ठेऊन आपल्याला धोरणात्मक निर्णय घेण्याचा प्रयत्न करावा लागेल. याबाबत मेकॅनिझम करीत असताना आज आपल्याकडे सर्व इंजिनिअर्स् आहे, टेक्नीकल स्टाफ आहे. परंतु इमारतीची दुरुस्ती झाल्यानंतर सुध्दा नेमकी ती कुठे खराब झालेली आहे हे शोधण्यासाठी त्याचा मूळापर्यंत जाण्याची योजना आज आपल्याकडे नाही. मग त्याच्या पायलींगची व्यवस्था काय आहे किंबहुना त्याठिकाणी असलेले लाकडी भाल आहेत, त्यामध्ये काय इरोशन्स् होत आहेत. मी नेहमीच सांगत असतो की, अनेक वेळा तेथील इमारतींची स्थिती बदलत असताना तेथील लोकांचे लिव्हींग स्टॅण्डर्डही वाढत गेले आहे. पूर्वी लोक चाळीमध्ये कोबा असलेल्या घरामध्ये रहात होते. पण परिस्थितीत सुधारणा झाल्यावर तेथे मार्बल टाईल्स्चा वापर करण्यात आला, आता ग्रेनाईट लावण्यात आले. ज्यावेळी लोकांची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती तेव्हा त्यांच्याकडे छोटा टी.व्ही. होता. आज त्यांच्याकडे टी.व्ही. आहे, कपाट आहे, फ्रीज आणि इतर वस्तू आल्या. परंतु लोकांच्या घरात या सर्व वस्तू आल्या तरी त्या इमारतीची स्ट्रेन्थ आहे तशीच आहे.अशा प्रकारे सर्व लोड वाढल्यानंतर इमारतींच्या लोड बेअरींगवर फार मोठया प्रमाणात ताण आलेला आहे. त्यातून इमारतींच्या भविष्याचा प्रश्न ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निर्माण झालेला आहे. म्हणून आपण आय.आय.टी.च्या माध्यमातून निकष ठरवून घेऊन पुढच्या काळामध्ये इमारतींचा सर्व्हे करण्याचा प्रयत्न करणार आहोत. आपण दोन वर्षापूर्वी काही इन्डिव्हिज्युअल आर्किटेक्टची नेमणूक करुन 14 हजार इमारतींचे सर्वेक्षण करु शकतो काय, यादृष्टीने प्रयत्न केला.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर.....

पण त्याला फार मोठा प्रतिसाद मिळाला नाही. सामाजिक दृष्टिकोनातून काम करणारे लोक फार कमी असतात. आर्किटेक्चर्सना नवीन सूचना दिल्या जातील. म्हाडाच्या पॅनेलवर जे आर्किटेक्चर्स असतील त्यांना या पुढच्या काळात म्हाडाचे काम घ्यावयाचे असेल किंबहुना खाजगी विकासकाचे काम घ्यावयाचे असेल तर सामाजिक बांधिलकी म्हणून सर्व्हे करणे बंधनकारक करण्यात येईल. हा एकंदर सर्व्हे आय.आय.टी पध्दतीने झाल्या नंतर नेमकी स्थिती बघण्याचे काम या निमित्ताने होईल. एक गोष्ट निश्चित आहे की, निव्वळ दुरुस्ती झाली म्हणजे विषय संपला अशातला भाग नाही. या सर्व इमारतींची पुनर्बांधणी करावी लागणार आहे. ही पुनर्बांधणी करण्याची राज्य शासनाची तयारी आहे. म्हणून 33(7) मध्ये बदल करण्याचे काम राज्य शासनाने केलेले आहे. नवीन धोरणानुसार माननीय मुख्यमंत्री त्याबाबतीतील घोषणा लवकरात लवकर करणार आहेत.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितले की, काल झोपडपट्टीत रहावयास आलेल्या माणसाला आज 270 स्क्वेअर फुटाचे घर दिले. पण मुंबई शहराच्या विकासामध्ये ज्यांनी घाम गाळण्याचे आणि रक्त आटवण्याचे काम केले, अशा जुन्या इमारतीत राहणाऱ्या भाडेकरुंना शासन न्याय देऊ शकत नाही. अशाच प्रकारची भावना सन्माननीय लोकप्रतिनीधींच्या मनामध्ये आणि व्यक्तिश: माझ्या मनामध्ये देखील होती. त्या दृष्टिकोनातून माननीय मुख्यमंत्र्यांकडे जो प्रस्ताव प्रलंबित होता, त्याबाबतीत लवकरात लवकर निर्णय घेऊन 2.5 च्या एफएसआय मध्ये वाढ करुन तो 3 करण्यात येईल आणि जुन्या इमारतींमध्ये राहणाऱ्या लोकांना 225 चौ. फुटाचे गाळे देण्यात येत होते त्याऐवजी या पुढच्या काळात 300 चौ.फुटाचे गाळे देण्याचे काम करण्यात येणार आहे. 1974 साली 19000 जुन्या इमारती होत्या आज तो आकडा 15000 वर आलेला आहे. म्हणजे एवढामोठा कालावधी मिळूनही शासन याबाबतीत फार मोठे काम करु शकले नाही. म्हणून क्लस्टर डेव्हलपमेंटच्या बाबतीत राज्य शासनाने एक भूमिका घेतली आहे. क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून लोक पुढे यावेत, त्यासाठी राज्य शासनाने काही सवलती देण्याचे काम केलले आहे. 4000 चौ. मीटरपेक्षा जास्त मोठे प्लॉट असतील आणि 70 टक्के रहिवाशांनी एकत्रित येण्याची भूमिका घेतली तर अशा विकासकांना 4 एफएसआय देण्याची

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर.....

एक महत्वाकांक्षी भूमिका राज्य शासनाने घेतली आहे. परंतु यामध्ये काही अडचणी आहेत. क्लस्टर डेव्हलपमेंट करत असताना, आपल्या सर्वांना लक्षात घ्यावे लागेल की, जुन्या इमारतीमध्ये राहणारे भाडेकरु रेंट ॲक्टमध्ये प्रोटेक्टेड आहेत. रेंट ॲक्टचे त्यांना संरक्षण मिळते.पण त्याच बरोबर दुर्दैवाने असे म्हणावे लागेल की, या रेंट ॲक्टचे संरक्षण हे घर मालकांकडून देखील आहे. म्हणून कुठलीही पुनर्बांधणी करावयाची असेल तर या घर मालकांची ना हरकत प्रमाणपत्र घेतल्या शिवाय पुनर्बांधणी करता येत नाही. या बाबतीत दुसरा पर्याय असा आहे की, आपण त्यांचे संपूर्ण मालकी हक्क काढून घेण्याचा प्रयत्न करतो. पण याबाबतीत अनुभव असा आहे की, एक-एक ॲक्विझिशन हस्तांतरित करण्याचे काम केले तर त्याला अनेक वर्षे लागतात. या अनेक वर्षामध्ये अनेक लोक न्यायालयीन प्रकरणे करतात. न्यायालयीन प्रकरण केल्यानंतर त्याना लागणाऱ्या विलंबामुळे लोकांचा प्रतिसाद पाहिजे तसा मिळत नाही. एसएलओ ची प्रक्रिया शॉर्ट करता येईल काय, एकंदरितच या कायद्यामध्ये काही सुधारणा करता येतील काय आणि हे करत असताना सुप्रीम कोर्टाने दिलेल्या स्थगिती पाहून आणि त्या कायद्याचा अभ्यास करुन या प्रश्नाकडे लक्ष वेधण्याचा प्रयन सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. त्या दृष्टिकोनातून निश्चितपणे शासन प्रयत्न करील.

सभापती महोदय, नेहमीच टीका होत असते की, राज्य शासन निव्वळ विकासकांना मदत करण्याची भूमिका घेत असते, विकासकांच्या बाजूने असते, म्हणून शासनाने 103 (ब) खाली नवीन तरतूद आणली आहे. सर्व भाडेकरुनी एकत्र येऊन शंभर महिन्याचे भाडे भरण्याची भूमिका घेतली तर मालकांकडून ती संपूर्ण प्रॉपर्टी ताब्यात घेऊन भाडेकरुंच्या असोसिएशन किंवा सोसायटयांना देण्याची भूमिका राज्य शासनाने घेतलेली आहे. परंतु त्याबद्दलचा अनुभव देखील वाईट आहे. राज्य शासनाने 103 (ब) खाली अशा प्रॉपर्टीज ॲक्वायर करुन घेऊन सोसायटयांना देण्याचे काम केले परंतु आता त्याला सुप्रीम कोटाची स्थगिती आहे.

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. बरवड....

श्री. सचिन अहिर .....

परंतु या अगोदर ज्यांना ज्यांना प्रॉपर्टी देण्याचे काम केले त्या बाबतीत आज सुध्दा अशी परिस्थिती आहे की, आता आम्हाला या सोसायटीकडून ही घरे बांधणे परवडणार नाही म्हणून हे काम सोसायटीकडून न करता आमचे ॲक्विझिशन रद्द करा आणि आम्हाला घरमालक किंवा खाजगी विकासकाकडून घरे बांधून द्या अशी तेथील लोकांची मागणी आहे. काही अटींमुळे किंवा कोर्टाच्या काही निर्णयांमुळे अशी निराशेची भावना निर्माण झालेली आहे. ते करीत असताना आपण सोसायटीला प्राधान्य देण्याची भूमिका स्वीकारली. एवढेच नव्हे तर सोसायटी जर पुढे आली तर त्यांना इन्सेंटिव देण्याची सुध्दा भूमिका घेण्याचा प्रयत्न आपण केलेला आहे. म्हणून मला असे वाटते की, निव्वळ विकासकांना मदत करण्याची राज्य शासनाची भूमिका नाही तर पुढच्या काळात ज्या सहकारी संस्था असतील, मुंबई शहरात जुन्या इमारतींमध्ये असो किंवा म्हाडाचे कोणतेही लेआऊटमध्ये असो, ज्याला आपण सेल्फ डेव्हलपमेंट म्हणतो त्या पध्दतीने स्वत: विकास करण्यासाठी तेथील लोक पुढे येत असतील तर अशा सेल्फ डेव्हलपमेंट करणाऱ्या लोकांना देखील पुढच्या काळामध्ये राज्य शासनाची इन्सेंटिव देण्याची भूमिका राहणार आहे. यामध्ये पुढच्या काळामध्ये त्यांना मदत करण्याची भूमिका राहणार आहे.

सभापती महोदय, एखादी इमारत धोकादायक झाली तर ती इमारत रिकामी करण्याचे काम आपण करतो. मुंबई शहरामध्ये वेगवेगळ्या अनेक संस्था आहेत. म्हाडाच्या अंतर्गत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ ही संस्था आहे. मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी बांधलेल्या अनेक वसाहती आहेत. एमएमआरडीए ही संस्था मुंबईमध्ये पुनर्विकासाचे काम करीत आहे म्हणून त्या संस्थेच्या सुध्दा वसाहती आहेत. या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वसाहती असू शकतात, डेअरीची वसाहत असू शकते किंवा इतर संस्थेच्या वसाहती असू शकतात. अशा अनेक वसाहती आहेत. त्यांच्या बाबतीत असे सांगावे लागेल की, त्या संस्थेच्या इमारती जर धोकादायक झाल्या तर तेथील लोकांना स्थलांतरित करण्यासाठी कोणतीही संस्था त्यांना ट्रान्झिट कॅम्पमध्ये पर्यायी जागा देत नाहीत. रिपेअर बोर्ड ही एकमेव संस्था अशी आहे की, जी ट्रान्झिट कॅम्पमध्ये पर्यायी जागा देण्याचे काम करते. ही सस्था लोकांना नोटीस देऊन विनंती करते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर ...

किंबहुना 95(6) अंतर्गत कायदेशीर नोटीस दिली जाते आणि त्यांना सांगितले जाते की, आपली इमारत जुनी झालेली आहे, धोकादायक झालेली आहे, अशा धोकादायक परिस्थितीमध्ये न राहता ट्रान्झिट कॅम्पमध्ये स्थलांतरित व्हा. आपण इतर संस्थांच्या बाबतीत पाहिले तर त्या संस्था त्यांना स्वत:ची व्यवस्था स्वत:च करा नाही तर तुम्हाला बळजबरीने बाहेर काढले जाईल अशी नोटीस देतात. परंतु शासनाच्या वतीने ज्या वेळी आपण अशा लोकांना बाहेर काढण्याची भूमिका घेतो त्या वेळी आपण त्यांना ट्रान्झिट कॅम्पमध्ये जागा देण्याचे काम करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट सुध्दा खरी आहे की, एकेकाळी ट्रान्झिट कॅम्पमध्ये जाणाऱ्या लोकांची संख्या कमी होती. कारण मुंबईमध्ये राहणाऱ्या माणसाला जर आपण सांगितले की, तुम्हाला दहिसरच्या ट्रान्झिट कॅम्पमध्ये जावे लागेल, मालवणीच्या ट्रान्झिट कॅम्पमध्ये जावे लागेल तर निश्चितपणे त्यांच्या मनामध्ये काही प्रश्न निर्माण व्हावयाचे. त्यामुळे लोक त्या ठिकाणी जाण्यासाठी तयार होत नव्हते. म्हणून आता आपण एक नवीन भूमिका घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. पुढच्या काळामध्ये दहिसर असेल, मालवणी असेल तेथील सर्व ट्रान्झिट कॅम्प म्हाडाकडे किंवा मुंबई बोर्डाकडे हस्तांतरित करुन पुढच्या काळात हे सर्व ट्रान्झिट कॅम्प पाडून त्या ठिकाणी पुनर्रचित इमारत बांधून सर्वसामान्य लोकांना परवडणारी घरे बांधावयाची, ते काम कोणत्याही खाजगी विकासकाकडून न करता म्हाडाकडूनच करुन सर्वसामान्य लोकांना परवडणारी घरे त्या ठिकाणी तयार करावीत, या पध्दतीने ते ट्रान्झिट कॅम्प तोडून नव्याने बांधण्याचे काम आपण करीत आहोत. एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल की, त्या ठिकाणी काही उणिवा आहेत. 1974 साली जेव्हा बोर्डाची स्थापना झाली त्यावेळी असा विचार होता की, येत्या दहा पंधरा वर्षात हे संपूर्ण काम बोर्डाच्या माध्यमातून पूर्ण होईल. त्या दृष्टीकोनातून ते ट्रान्झिट कॅम्प बांधले गेले होते. त्याला आपण टेम्परेरी अकोमोडेशन म्हणतो. त्या ठिकाणी काही उणिवा आहेत. त्या ठिकाणी दुरुस्ती होत नाही. त्या ठिकाणी गटारे व्यवस्थित नाहीत. अनेक ठिकाणी वर डांबरीकरण होत नाही. म्हणून पहिल्यांदा आपण एक नवीन भूमिका घेतली की, हे ट्रान्झिट कॅम्प तोडून म्हाडाच्या माध्यमातून त्यांची पुनर्बांधणी करावयाची आणि ते करुन जास्तीत जास्त ट्रान्झिट कॅम्प उपलब्ध

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. सचिन अहिर .....

करुन देण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत.

तीन चार वर्षे अगोदर आम्ही म्हाडाच्या माध्यमातून ही भूमिका घेतल्यानंतर सायन प्रतीक्षानगरमध्ये लोक जाण्यासाठी तयार नव्हते. लोकांच्या मनामध्ये भीती होती की एकदा जर मी सायन प्रतिक्षानगरमध्ये गेलो आयुष्यभर मला माझ्या घरासाठी प्रतीक्षा करावी लागेल. आज मला सांगायला आनंद होतो की, काही सन्माननीय सदस्य, लोकप्रतिनिधी किंबहुना न्यायालयातील लोक असतील, पत्रकार असतील ते माझे घर व्हावे तर प्रतीक्षा नगरमध्ये व्हावे अशी विनंती करावयास लागले आहेत. त्याचे स्वरुप बदलण्याचे काम आपण केलेले आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर....

घाटकोपर येथे तसेच काम करण्याची शासनाने भूमिका घेतली. धारावीत पाणी कमी उपलब्ध होते, यासारख्या छोट्या गोष्टींमध्ये शासन सुधारणा करणार आहे. पुढील काळामध्ये संक्रमण शिबिरामध्ये घर मिळत असल्यामुळे आम्ही जाणार नाही असे कोण बोलणार नाही. याबाबत सरकारवर आरोप होऊ नये म्हणून हे सर्व संक्रमण शिबिरे तोडून त्याठिकाणी लोकांना चांगली घरे बांधून देण्याचा शासन प्रयत्न करीत आहे.

गिरण्यांची जी अतिरिक्त जमीन उपलब्ध झाली आहे त्या जमिनीबाबत शासनाने काय केले असा सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी प्रश्न विचारला होता. त्यांना मला सांगावयाचे आहे की, याच गिरणी कामगारांसाठी या अतिरिक्त जमिनीवर 7 हजार घरे बांधण्याचे काम शासनाने केलेले आहे. राहिलेल्या जागेवर मुंबई शहरातील जुन्या इमारतीतील भाडेकरुंसाठी 4 हजार घरांचे संक्रमण शिबिर बांधण्यात येणार आहे. त्यामुळे मुंबई शहरातील जुन्या इमारतीतील भाडेकरुंना मुंबईबाहेर हद्दपार होण्याची वेळ येणार नाही. त्यांना अन्य ठिकाणच्या संक्रमण शिबिरामध्ये पाठविणार नाही. याच गिरण्यांच्या जमिनीवर 225 चौ.फूटांची 4 हजार घरे असलेले संक्रमण शिबिर तयार आहे. त्याचे वितरण पुढील वर्षी करण्याची भूमिका शासन घेणार आहे. हे मला या चर्चेच्या निमित्ताने आवर्जून सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यासाठी शासनाने तज्ज्ञांची समिती नेमावी, थोडे एक्सपिडाईट व्हावे, वन विंडो सिस्टिम निर्माण करावी असे सांगण्यात आले. त्यामुळे शासनाने नियम 33/9 मध्ये सुधारणा करण्याचे ठरविले. मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती नेमण्यात आली. जेणे करुन या सर्व गोष्टींचा त्यात समावेश होईल. त्यांच्याकडे एकदा प्रस्ताव दिल्यावर शासनाकडे येण्याची गरज पडणार नाही, कोणत्याही मंडळाकडे जाण्याची गरज पडणार नाही. या कामामध्ये पारदर्शकता राहण्यासाठी त्यांनी उच्चाधिकार समितीकडे जावे. त्या समितीकडे प्रस्ताव द्यावा, त्या समितीने प्रस्ताव मान्य केल्यानंतर त्यांना इतर विंडोजकडे जाण्याची आवश्यकता राहणार नाही. ते काम निश्चितपणे केले जाईल. मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त नवीन आहेत, त्यामुळे त्यांना वेळ लागला. परंतु मी सन्माननीय सदस्यांना आश्वासित करु इच्छितो

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.सचिन अहिर....

की, आयुक्तांकडे जेवढे प्रस्ताव प्रलंबित आहेत त्याबाबत त्यांनी महिना किंवा दोन महिन्यात विशेष बैठक घ्यावी व 33/9 च्या प्रस्तावांना चालना व गती देण्याचे काम करावे अशा सूचना दिल्या जातील.

मुंबई शहरातील जुन्या इमारतींचा प्रश्न आहे. 1992 साली सीआरझेड कायदा आला. या कायद्यामुळे गिरगावसारख्या भागातील जुन्या इमारतींची पुनर्बांधणी करता येत नव्हती. त्या भागाजवळ एका बाजूला चौपाटी आहे, दुसऱ्या बाजूला रस्ता आहे, रस्त्याच्या मागे किती तरी अंतरावर जुन्या इमारती असून सुध्दा त्या इमारतींना सीआरझेडचा कायदा लागू होत होता. राज्याच्या सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नासंबंधी पुढाकार घेतला, या खात्याचा राज्यमंत्री म्हणून मी केंद्र सरकारला विनंती केली. मुंबईतील या जुन्या इमारतीतील लोकांना न्याय देण्यासाठी दिल्लीपर्यंत जाण्याची भूमिका घेतली. त्यामुळे या सर्व इमारती सीआरझेडमधून वगळण्यात शासनाला यश मिळाले. सीआरझेडच्या कायद्यामुळे 4 हजार जुन्या इमारतींची पुनर्रचना करु शकत नव्हतो, परंतु आता या कामाला चालना देण्याची शासनाने भूमिका घेतली आहे.

सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितल्या प्रमाणे या प्रश्नाची व्याप्ती मुंबई शहरापुरती नाही. त्यामुळे याची व्याप्ती वाढवावी लागेल. हा विचार करीत असताना या शहरामध्ये निर्माण झालेल्या धोक्यांकडे सावधगिरीने पहावे लागेल. म्हणून पुढील काळामध्ये ए, बी व सी या तिन्ही कॅटेगरींना एकत्रित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. 1940 साली बांधलेल्या इमारतीला न्याय दिला जातो. परंतु 1950 साली बांधलेल्या इमारतीला वेगळा न्याय दिला जातो. अशी भूमिका न घेता पुढील काळात अशा इमारतींसाठी एकत्र विचार करण्यात येईल. या तिन्ही कॅटेगरीतील लोकांना समान क्षेत्रफळ देण्याचे काम केले जाईल.

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. सचिन अहिर....

अनेक ठिकाणी पोटमाळे होते. पोटमाळयावर राहाणा-या लोकांना घर मिळत नव्हते. घरमालकाने त्याला भाडेपावती दिली. परंतु त्याच्याकडे वेगळे लाईट बिल, वेगळे रेशनकार्ड, असे कोणतेही पुरावे नसल्यामुळे त्याला वंचित ठेवले जात होते. आता त्याबाबतीत नव्याने निर्णय घेतलेल असून या पुढच्या काळामध्ये अशा सर्व लोकांना न्याय देण्याची भूमिका शासन घेणार आहे.

सभापती महोदय, विधानसभेमध्ये राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी या घुसखोरांच्या बाबतीत एक राजकीय इच्छाशक्ती तयार करण्याच्या दृष्टीने चर्चा घडवून आणली होती. त्यावेळी त्यांनी हे स्पष्ट केले होते की, राजकीय इच्छाशक्ती असेल तरच आपण हा प्रश्न सोडवू शकतो. घुसखोर दोन-तीन प्रकारचे आहेत. मुंबई शहरामध्ये ज्या जुन्या इमारती आहेत त्या कोसळतात म्हणून त्या इमारतीमध्ये राहाणा-या जुन्या भाडेकरुंची राहाण्याची सोय व्हावी म्हणून हे ट्रॅंझिट कॅम्प उभारलेले आहेत. परंतु काही लोकांनी अधिका-यांबरोबर हातमिळवणी करुन 1 लाख रुपयास, 2 लाख रुपयास खोट्या भाडेपावती बनवून घेऊन ते तेथे राहाण्याचे काम करीत आहेत. काहींचे वास्तव्य 5 वर्षे झालेले आहे, काहींचे 10 वर्षे झालेले आहे तर काहींचे 20 वर्षे झालेले आहे. घुसखोरांचा हा एक प्रकार आहे. दुसरा घुसखोर असा आहे की, त्याने दलालाला पैसे दिले आणि दलालाने आपल्या ताकदीवर त्याला डी.पी. बनवून देऊन सांगितले की, तू इकडे रहा, तुला कोण काही बोलणार नाही. दलालामुळे असे लोक घुसखोर झाले. घुसखोरांचा तिसरा वर्ग असा आहे की, जे जुन्या चाळीमध्ये राहाणारे लोक आहेत, त्यांची व्हेकेशन नोटीस विकत घेऊन काही लोक ट्रांझिट कॅम्पमध्ये राहाण्याचे काम करीत आहेत.

सभापती महोदय, पहिल्या दोन घुसखोरांबाबत शासन कोणत्याही प्रकारे सहानभूतीने विचार करु शकणार नाही. जुन्या इमारतीमधील लोकांना न्याय द्यायचा असेल तर अशा घुसखोरांवर कारवाई होण्याची गरज आहे. विधानसभेमध्ये यासंबंधीची चर्चा झाल्यानंतर याठिकाणी तशा प्रकारची इच्छाशक्ती व्यक्त केलेली आहे. याबाबतीत सन्माननीय सदस्यांना आम्हाला सहकार्य करावे अशी माझी त्यांना विनंती आहे. अशा या दोन्ही घुसखोर घटकांवर कारवाई करण्याचे काम केले जाईल. मात्र ज्यानी व्हेकेशन नोटीस विकत घेतलेली आहे त्यांच्या बाबतीत आपल्याला विचार केला पाहिजे. या संदर्भात आपण का विचार करीत आहोत ? कारण जुन्या चाळीत राहाणा-या माणसाला आम्ही ट्रॅंझिट कॅम्पमध्ये पाठवले. अपेक्षा अशी होती की, त्याला ट्रॅंझिट कॅम्पमध्ये

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर...

पाठविल्यानंतर वर्षभरामध्ये किंबहुना 5 वर्षामध्ये किंवा फार तर 10 वर्षामध्ये त्याला त्याच्या नवीन घरामध्ये आपण परत आणू. परंतु काही कारणास्तव हे काम होऊ शकले नाही. मग ते न्यायालयीन अडचणीमुळे असेल, एकमेकांच्या असहकार्यामुळे असेल, घरमालकाच्या असहकार्यामुळे असेल, शासनाच्या यंत्रणेमुळे असेल, एसएलओ कडून होणारी भूसंपादनाची कारवाई असेल, रोड वायडनिंगमुळे इमारत होऊ न शकल्यामुळे असेल, अशा काही ना काही कारणास्तव त्याची इमारत होऊ शकली नाही. म्हणून या बाबतीत नवनवीन भूमिका घेण्याचे काम आपण केले. आपण नवीन घरामध्ये येऊ अशा प्रकारची अपेक्षा असणारे जे लोक ट्रँझिट कॅम्पमध्ये राहात आहेत, ज्यांनी इन्क्रोचमेण्ट केलेले नाही, जे घुसखोर नाहीत, अशा लोकांना त्यांचा मालकी हक्क विकण्याचा अधिकार आहे या धर्तीवर ज्या ज्या लोकांनी व्हेकेशन नोटीसेस विकत घेतलेल्या आहेत अशा लोकांच्या खोल्या काही दंडात्मक आकारणी करुन अधिकृतरीत्या हस्तांतरित करण्याचे काम आपण म्हाडाच्या माध्यमातून करणार आहोत. असा जो तिसरा घटक आहे, त्याला न्याय देण्याची भूमिका आपण घेतलेली आहे.

सभापती महोदय, मी आपणास सांगितले की, संपूर्ण ट्रँझिट कॅम्प तोडून तेथे नवीन इमारती बांधण्याची भूमिका आपण घेतली. उदाहरण द्यायचे झाले तर दहिसर, मालाड, अंधेरी, वर्सोवा, गोरेगाव येथील जयकोच ट्रँझिट कॅम्पमध्ये राहाणा-या लोकांची आता तिसरी पिढी तेथे राहात आहे. मी म्हाडाचा अध्यक्ष असल्यामुळे अशा लोकांच्या भेटी घेण्याचा प्रयत्न केला. त्यांनी मला असे सांगितले की, "आम्ही कोठून आलो हे आम्हाला माहीत नाही. आमची दुसरी पिढी कधी तरी भायखळा येथे राहात होती, परळ येथे राहात होती. परंतु आता आम्हाला तिकडचे आकर्षण राहिले नाही. कारण आम्ही या उपनगरामध्येच लहानाचे मोठे झालो आहोत." म्हणून आपण अशी भूमिका घेतलेली आहे की, हे ट्रँझिट कॅम्प तोडून तेथे ज्या नवीन पुनर्रचित इमारती होतील त्या ठिकाणी हे भाडेकरु आपला मूळचा मालकी हक्क सोडायला तयार असतील तर त्यांना त्या इमारतीमध्ये 300 चौ.फूटाचे घर मिळेल आणि त्याला आपला मालकी हक्क ठेवून मूळच्या ठिकाणी जायचे असेल तर तेथे 225 चौ.फूटाचे घर मिळेल. जे आपला मूळ मालकी हक्क सोडून नवीन पुनर्रचित इमारतीमध्ये राहाण्यास तयार असतील त्यांना हक्काचे धर देण्याचे काम आपण करीत आहोत जेणेकरुन त्याचा 10-20 वर्षाचा वनवास संपुष्टात येईल.

...नंतर श्री. भोगले....

अशुद्धित प्रत / मुद्रणासाठी नाही

श्री.सचिन अहिर.....

सभापती महोदय, याठिकाणी असे सांगण्यात आले की, सरकार निव्वळ विकासकाची बाजू घेत आहे. अशी भूमिका घेणे योग्य नाही. निश्चितपणे विकासकांनी काही गैर केले असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्याची शासनाची भूमिका आहे. विकासकाला बाजूला ठेवून काम करु शकतो हा जो समज आहे तो लक्षात घेऊन काही धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतात. झोपडपट्टींबरोबरच 56 कॉलनींचा उल्लेख केला. राज्य शासनाची मानसिकता ही आहे की, या सर्व इमारतीतील 70 टक्केपेक्षा जास्त रहिवासी स्वत:हून पाठबळ देत असतील तर आम्ही म्हाडामार्फत विकास करावयास तयार आहोत. माननीय सदस्यांनी सांगितले की, 70 टक्के रहिवाशांची संमती कशासाठी हवी आहे? म्हाडाने 56 कॉलनी उभ्या करुन त्यांच्याकडून पैसे घेऊन त्यांना जागा दिल्या आहेत. टिळक नगर असेल, सुभाष नगर असेल, कन्नमवार नगर असेल. तेथील भाडेकरुंची मर्जी नसेल तोपर्यंत म्हाडा डायरेक्ट विकास करु शकत नाही. मी एक प्रयोग केला होता. सहा महिन्यात संबंधित सोसायटीने ले-आऊट तयार करावा, कन्व्हेयन्स करावे. परंतु फार मोठी टीका झाली. सोसायटीने आपली प्रतिक्रिया व्यक्त करीत असताना राज्य शासन आमच्यावर विकास लादू शकणार नाही अशी भूमिका मांडली. आमचा विकास आम्ही ठरविणार आहोत, निव्वळ प्रिमियम ठरविण्याचा तुम्हाला अधिकार आहे हे सांगण्याचे काम केले. यापुढच्या काळात 33 (5) नुसार 56 कॉलनींचा ले-आऊट तयार करीत असताना यापूर्वी पैसे घेत होतो. आता शासनाने मंडळाला स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. प्रिमियम घेऊन चालणार नाही. प्रिमियम ऐवजी काही एरिया घेऊ शकलो तर त्या एरियाचा ॲफोर्डेबल हाऊसिंगसाठी उपयोग करु शकतो आणि त्यातून चांगले काम होऊ शकते. 33(5) अंतर्गत प्रिमियम न घेता आहे त्या जागेवर विकास शक्य झाला तर निश्चितपणे आपण तो केला पाहिजे. प्लॉटवर शक्य नसेल तर त्याच वॉर्डमध्ये इक्विटेबल रेडी रेकनर रेटनुसार संबंधित एरियावर प्रिमियम न घेता हे काम करणार आहोत. जेणेकरुन या निमित्ताने लोकांना परवडणारी घरे देण्याचे काम करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न राहणार आहे.

सभापती महोदय, अनेक विषयांना स्पर्श करण्यासारखे आहे. मी सभागृहाचा अधिक वेळ घेऊ इच्छित नाही. परंतु एका गोष्टीचा मला आवर्जून उल्लेख करावा लागेल. राज्य शासन याबाबत गांभीर्याने विचार करीत आहे. माझे स्पष्ट म्हणणे आहे. झोपडपट्टी पुनर्रचित झाली नाही

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर.....

तरी नागरी सुविधा देऊन कुठे ना कुठे तरी त्यांना जगवू शकतो. तेथील रहिवाशांचे जीवनमान वाढवू शकतो. परंतु जून्या इमारतींच्या बाबतीत न टाळता येणारी समस्या असल्यामुळे निर्णय घ्यावा लागेल. या इमारती पुनर्रचित झाल्या नाहीत, त्या अशाच ठेवण्याचे काम केले आणि त्या उद्या पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळल्या तर फार मोठया जीवितहानीला सामोरे जावे लागेल. ती शासनाची तयारी आहे की नाही हा या निमित्ताने प्रश्न उपस्थित होत आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी जॉईंट व्हेंचरचा उल्लेख केला. एचडीआयएल कंपनीचे नाव घेतले. कन्नमवार नगर, टागोर नगरबद्दल सांगितले आहे. ज्या ज्या ठिकाणी परवानगी दिली त्याबाबत आता काही करता येणार नाही. परंतु सिध्दार्थनगर येथील पत्रा चाळीबद्दल शासनाने जॉईंट व्हेंचर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या माध्यमातून 1.11 लाख चौ.मी.जागा म्हाडाला मिळणार आहे. तेथे ग्राऊंड बिल्ड आहे. तेथे इमारती नाहीत. तेथील भाडेकरुंची एकत्रितपणे सोसायटी तयार करणे, ले-आऊट करणे व इतर गोष्टी सांभाळून हे करण्यामध्ये राज्य शासनाच्या माध्यमातून इच्छाशक्ती असली तरी मर्यादा आहेत. या पुढच्या काळात निश्चितपणे परवानगी दिली नसली तरी अनधिकृतपणे काही लोकांकडून हॅण्डबिल देतात, चर्चा करतात. टागोर नगर, कन्नमवार नगर येथील जॉईंट व्हेंचरबाबत उल्लेख केला गेला. या 56 कॉलनीमध्ये जेथे परवानगी दिली नाही तेथे सुस्पष्टपणे म्हाडाकडून सर्वांना दिसेल असा बोर्ड लावला जाईल. त्या बोर्डावर परवानगी दिली की नाही, जॉईंट व्हेंचर आहे की नाही, ज्याठिकाणी जॉईंट व्हेंचर असेल तेथे स्पष्टपणे लिहिले जाईल, जॉईंट व्हेंचर नसेल तर कोणतीही परवानगी दिलेली नाही हा देखील उल्लेख करण्याचे काम केले जाईल.

नंतर 2 टी.1...

अशुधारित प्रत/शोधासाठी नाही

श्री. सचिन अहिर ...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी मोतीलाल नेहरु नगरचा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, यासंदर्भात माहिती घेऊन त्यांची जी काही तक्रार आहे तिचे निवारण केले जाईल. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी मेन्टेनंसच्या बाबतीत उल्लेख केलेला आहे. इमारतींचा पुनर्विकास करीत असताना मूळ रहिवाशांना हद्दपार करण्याची शासनाची भूमिका नाही. यासंदर्भातील चिंता सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी व्यक्त केलेली आहे. त्यांनी जी चिंता व्यक्त केलेली आहे ती चिंता आमची सुध्दा आहे. मुंबई शहरातील मूळचा जो नागरिक आहे तो हद्दपार होता कामा नये अशी आमची भूमिका आहे. विशेष करुन मराठी माणसाला हद्दपार होऊ द्यावयाचे नसेल तर त्याला आहे त्या जागेवर पुनर्स्थापित करण्याची भूमिका राज्य शासनाची असून त्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे हे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. सन्माननीय सदस्यांनी समितीच्या बाबतीत सूचना केलेली आहे परंतु यासंदर्भात मी सभागृहाला सांगू इच्छितो की, समिती करण्यापेक्षा ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी या चर्चेत भाग घेतलेला आहे, ज्यांनी या विषयावर आपल्या सूचना मांडलेल्या आहेत, ज्यांनी अभ्यास केलेला आहे त्यांनी यांसदर्भातील सूचना माझ्याकडे दिल्या तर त्यासंदर्भात वरिष्ठ स्तरावर, मुख्य अधिका-यांच्या स्तरावर बैठक घेऊन हा प्रश्न सोडविण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी हा ठराव मागे घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, आमची विनंती आहे की, या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी ज्या समितीचा उल्लेख केलेला आहे ती समिती गठीत करण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी आश्वासन दिले तर आम्ही आमचा अशासकीय ठराव एका मिनिटात मागे घेऊ.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, या ठिकाणी मी केवळ दोनच मुद्यांचा उल्लेख करु इच्छितो. या ठिकाणी सन्माननीय मंत्री महोदयांनी 103(ब) चा उल्लेख केलेला आहे. 103 (ब) करण्यासाठी सुप्रीम कोर्टाने स्थगिती दिली नसून हँडींगओव्हरसाठीच तो नियम आहे त्यामुळे आपण आजही 103 (ब) करु शकतो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे....

दुसरा मुद्दा असा आहे की, सामोपचाराने आपण सोसायटी तयार करतो एकदा सोसायटी तयार झाली की, तिला मग एफएसआयचा फायदा मिळत नाही. त्यामुळे यासंदर्भात देखील सुधारणा करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी मंत्री महोदयांनी 300 चौरस फूटांची घरे देण्याचा मनोदय जाहीर केलेला आहे. आज अनेक प्लॉट इतके छोटे आहेत की, फायर फायटींग आणि इतर गोष्टीचा विचार केला तर त्या ठिकाणी आपण 300 चौरस फूटाचा कार्पेट एरिया आपण देऊच शकत नाही. आपण देतो म्हणतो परंतु नियमानुसार देता येत नाही अशी परिस्थिती आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मी काही गोष्टींचा पुन्हा खुलासा करणार आहे. सरकारने विकासक नेमावा असे मी म्हणाले होते. ज्या इमारतींच्या विकासकाचे काम मंडळी करीत आहेत त्या ठिकाणचे म्हणजे 10 वर्षापूर्वीचे भाडोत्री कोठे गेले आहेत याची माहिती विचारली तर ती त्यांना देता येत नाही. तसेच 10 वर्ष होऊन सुध्दा या इमारती व्यवस्थितपणे बांधल्या गेल्या नाहीत. त्याचे कारण असे आहे की, कधी शासन या इमारतींसाठी 2.5 एफएसआय तर कधी 3 एफएसआय देणार आहे असे जाहीर करीत असते व त्यामुळे त्या ठिकाणच्या रहिवाशांमध्ये संभ्रम निर्माण होत असतो व त्याचा काही मंडळी फायदा घेऊन त्यांना भडकवण्याचे काम करीत असते त्यामुळेही इमारतींचे काम व्यवस्थितपणे पूर्ण होऊ शकत नाही. मी माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांना या विषयाच्या संदर्भात पत्र दिले असून या विषयावर त्यांच्याशी बोलले आहे. आमच्या येथील इमारतींचे काम 10-10 वर्षापासून सुरु आहे त्यामुळे हे काम विकासक नेमून तरी व्यवस्थित होईल का? तेव्हा त्यांनी मला असे सांगितले की, "आपण विकासक नेमतो म्हणजे नेमके काय करतो ? तर लोकांना अधिक चांगल्या प्रकारची घरे कशी देता येतील हे काम मला करावयाचे असून त्यासाठीच मी हे सर्व करीत आहे". विकासक नेमत असताना लोकांवर अन्याय होणार नाही याची दक्षता घेण्याची आवश्यकता आहे. विकासक म्हणून कोणाची नियुक्ती करावी हा शासनाचा प्रश्न आहे. सामान्य जनतेला घरे मिळण्याच्या संदर्भात राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिलेले आहे त्या आश्वासनाला सरकार स्टीकअप राहील काय ? एवढेच मला या निमित्ताने विचारावयाचे आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

अशोधित प्रत / शोधनासाठी नाही

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे कोणी संशय व्यक्त करीत नाही आणि त्याबाबतीत खुलासा करण्याचीही काही आवश्यकता नाही. सन्माननीय सदस्यांची भूमिका अत्यंत प्रामाणिक असून त्या संदर्भात राज्य शासनाची भूमिका स्पष्ट करीत असताना मी सांगितलेले आहे की, या 56 लेआऊटमध्ये पुढाकार घेऊन म्हाडा मार्फत पुनर्विकास करण्याची शासनाची इच्छा आहे.परंतु त्या लेआऊटमधील इमारतीमध्ये राहणारे भाडेकरु त्या सोसायटीचे सदस्य असून त्यांच्यावर ही योजना शासन लादू शकत नाही.सन्माननीय सदस्या लोकप्रतिनिधी असल्यामुळे त्यांनी याबाबातीत पुढाकार घ्यावा शासन म्हणून मी देखील आपल्याला मदत करण्यास तयार आहे. ज्या ठिकाणी लोक स्वत: होऊन पुढे येतील त्या लोकांना निश्चितपणे मदत द्यावी लागणार आहे.

सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी कलम 103 ब चा या ठिकाणी उल्लेख केला होता. सुप्रीम कोर्टाने सांगितल्याप्रमाणे हॅन्डओव्हर करण्यास बंदी आहे. मी अगोदरच त्या बाबतीत उल्लेख केला होता आणि 103 ब चा कोणताही प्रस्ताव आपण थांबवत नाही. गेल्या आठवडयात माझ्याकडे दोन प्रस्ताव आले होते त्याला मी मंजुरी दिली होती.सोसायटी डि-सेस होते हे जरी खरे असले तरी त्याला 2 एफएसआय आपण देऊ शकतो. हा इन्सेटीव्हचा एफएसआय मात्र बाहेर विकता येत नाही, हा एफएसआय त्यांनीच वापरावयाचा असतो .यामध्ये ही अडचण असल्यामुळे सेक्शन 103 ब खालील सोसायटयांना न्याय मिळत नाही .सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी 300 चौरस फुटाच्या घराचा या ठिकाणी उल्लेख केला होता.सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे आणि त्यांच्या बाजूला बसलेले सन्माननीय सदस्य श्री.चरणसिंग सप्रा हे दोघे सदस्य असतांना आपण अशी भूमिका घेतली होती की लॅन्ड ॲक्विझीशन करीत असतांना आपण म्हाडाला फक्त पैसे देऊन चालणार नाही तर त्यांना त्या ठिकाणी 10 टक्के किंबहुना त्यावेळी 225 चौरस फुट एरियाची सदनिका देण्याची राज्य शासनाची भूमिका होती आजही राज्य शासनाची तीच भूमिका आहे. घर मालकांनी या कामाच्या संदर्भात पुढे यावे म्हणून त्यांना प्रोत्साहन देण्याचा शासन प्रयत्न करीत आहे.300 चौरस फुटाचे घर ज्या ठिकाणी होऊ शकणार नाही, ज्या ठिकाणी ही योजना होऊ शकणार नाही अशा लोकांना म्हाडा स्वत: आपल्या मास्टरलिस्टवर घेऊन त्यांना पुनर्रचित गाळा देण्याची भूमिका राज्य सरकारची आहे .येथून पुढे कोंणतीही योजना झाली तरी त्याला 300 चौरस फुटाचा गाळा देणे बंधनकारक राहणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई : दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांची समिती नेमावी असा माझा आग्रह आहे. सन्माननीय मंत्र्यांचे उत्तर ऐकल्यानंतर ही समिती होणे आवश्यक आहे.असे माझे मत आहे.

श्री.सचिन अहिर : सर्व सन्माननीय सदस्यांचे मनोगत ऐकल्यानंतर त्यासंबंधी मी उत्तर देण्याची भूमिका घेतली आहे.त्यामुळे जर सन्माननीय सदस्यांचे समाधान झालेले नसेल तर तसे त्यांनी मला सांगावे. समिती नेमण्या पेक्षा सर्वाचे निवेदन घेण्याचे काम आपण करु.यासाठी आवश्यकता भासल्यास बैठक घेऊ तेव्हा माननीय सदस्यांनी आपला अशासकीय ठराव मागे घ्यावा अशी मी त्यांना पुन्हा एकदा विनंती करतो.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, सन्माननीय मंत्र्यांनी या ठिकाणी जे निवेदन केलेले आहे त्यातील सर्वच गोष्टींशी मी सहमत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी मघाशी सभागृहात घोषणा केली आहे त्याचा आदर करुन आणि माननीय मंत्र्यांनी केलेली विनंती विचारात घेऊन मी हा अशासकीय ठराव मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागते.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला

अशासकीय ठराव क्रमांक 31 पुढे ढकलण्या बाबत

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दाखविलेल्या अशासकीय ठराव क्रमांक 31 संबंधी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आज सकाळी माननीय उप सभापतींच्या दालनात त्यांना भेटून माझी तब्येत बरी नसल्यामुळे मला दुपारी वैद्यकीय तपासणीसाठी व उपचारासाठी रुग्णालयात जावयाचे आहे तरी माझा ठराव पुढे ढकलण्यात यावा अशी विनंती केली होती. सदर विनंती माननीय उप सभापतींनी मान्य केली असल्यामुळे हा अशासकीय ठराव पुढे ढकलण्यात येत आहे.

यानंतर अशासकीय ठराव क्रमांक 74 घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कोकणातील जमिनीत फळाची व वृक्षांची लागवड करण्यासाठी धडक कार्यक्रम हाती घेणे

मु.शी. कोकणातील जमिनीत फळांची व वृक्षांची लागवड करण्यासाठी धडक कार्यक्रम हाती घेणे या विषयावरील श्री सुभाष चव्हाण, वि.प.स. यांचा ठराव

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो. :-

" कोकणातील भूभागा पैकी सुमारे 53.45 टक्के पडीत असलेल्या जमिनीत आंबा,काजू, सुपारी,कोकम, इत्यादी फळांची लागवड आणि साग,शिसम,आईन,किंजळ,खैर,इत्यादी वृक्षांची वनराईची पध्दतशीर लागवड करण्याच्या दृष्टीने धडक कार्यक्रम हाती घेऊन या कार्यक्रमासाठी आर्थिक तरतूद व अन्य उपाययोजना करण्यात यावी अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. "

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ...

सभापती महोदय, ठराव क्रमांक 74 वर मी माझे संक्षिप्त स्वरुपामध्ये माझे विचार या ठिकाणी मांडणार आहे. या महाराष्ट्र राज्याची स्थापना 1 मे 1960 रोजी झाली असून या राज्याला 50 वर्षे झाल्यामुळे आपण या राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत आहोत. कोकणाला अप्रतिम, सुंदर, विपुल असे निसर्ग सौदर्य लाभले आहे. परवाच्या दिवशी नामदार श्री. नारायण राणे साहेबांनी आमच्या धामापूर तलावाजवळ एक कार्यक्रम आयोजित केला होता त्यावेळी केलेल्या प्रास्ताविक भाषणामध्ये मी आवर्जून उल्लेख केला होता. सभापती महोदय, माझ्या धामापूर या गावामध्ये हा तलावाचा परिसर अत्यंत सुंदर व रमणीय असा आहे. धामापूर गाव हे स्वर्गीय पु. ल. देशपांडे यांचे आजोळ आहे, ते नेहमी या तलावाजवळ यायचे. त्यावेळी त्यांनी काढलेले महत्वाचे उद्गार असे होते की, हा धामापूर तलाव म्हणजे "निसर्गाला पडलेले सुंदर स्वप्न". सभापती महोदय, कोकणचा कॅलिफोर्निया बनविण्यासाठी राजकीय नेते नेहमी दिवा स्वप्न पहात आले आहेत. आदरणीय श्री.ए.आर. अंतुले साहेब हे कोकणातून मुख्यमंत्री झाले होते, युती सरकारच्या काळात माननीय श्री. नारायण राणे साहेब हे मुख्यमंत्री झाले होते.

(सभापती स्थानी तालिका सभापती ॲड. उषाताई दराडे)

मी सभागृहामध्ये नेहमी म्हणत असतो आणि यापूर्वी देखील म्हणालो होतो की, ज्या विभागाचे नेते पॉवरफुल,आक्रमक आणि धाडशी असतात त्या विभागाकडे सर्व निधी जातो. आमच्या कोकणातील आमदारांची संख्या कमी असल्यामुळे या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये पर्यटन विभागासाठी आम्हाला निधी मिळाला नाही तर आम्ही काय करणार? कोकणातील प्रमुख आमदार मंडळी याठिकाणी बसली आहेत. त्यामध्ये माननीय सदस्य सर्वश्री. भाई जगताप, हुसेन दलवाई, राजन तेली या सर्वांना कोकणचा कॅलिफोर्निया व्हावा असे दिवा स्वप्न वाटत आहे असे मी या ठिकाणी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, कोकणामध्ये रायगड म्हणजे पूर्वीचा कुलाबा जिल्हा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग,ठाणे आणि बृहन्मुंबईचे बेट या जिल्हयांचा समावेश होतो. रायगड जिल्ह्याचे क्षेत्र 7 हजार 112 चौरस मीटर असून त्याठिकाणी 300 ते 350 मि.मी. इतका पाऊस पडतो. त्या जिल्ह्यामध्ये भात, नाचणी, वरी, तूर दाळ, नारळ, पोफळी, आंबा, कोकम, काजू, कलिंगड, चिकू, फणस, पेरु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

श्री. सुभाष चव्हाण ...

इत्यादी फळे पिकतात. त्याचप्रमाणे रत्नागिरी जिल्हयाचे क्षेत्रफळ 8 हजार 208 चौ.मीटर असून तेथील पर्जन्यमान 330 मि.मी. इतके आहे. त्या जिल्ह्यात सुध्दा भात, नाचणी, तूर, चवळी, उडीद, नारळ, आंबा, फणस, पोफळी, केळी, पपई, अननस, चिंच, आवळे, चिकू, रामफळ, बोर, करवंदे, लिंबू, जांभूळ इत्यादी फळे पिकतात. त्यानंतर सिंधुदुर्ग जिल्ह्याचे क्षेत्रफळ 5 हजार 207 चौ.मी. असून तेथील पर्जन्यमान 300 ते 350 मि.मीटर इतके आहे. त्या जिल्ह्यामध्ये भरपूर वनसंपदा असून चांगल्या प्रकारचा साग,ऐन, चिंच, किंजळ, खैर, शिसव, सोनचाफा,सुरंगी आणि मोठ मोठी वृक्षे आहेत, अभयारण्ये आहेत. त्याठिकाणी जास्तीत जास्त तांदूळ पिकतो, त्याचप्रमाणे नाचणी होते, माडाची झाडे मोठया प्रमाणात आहेत, आंबा, काजू, फणस, रातांबे, कोकम, केळी, सुपारी, जांभूळ इत्यादी पिके होतात. या जिल्ह्याचे हवामान उष्ण व दमट आहे. कोकणचे भौगोलिक क्षेत्रफळ 30 लाख 74 हजार हेक्टर असून शेती लायक क्षेत्रफळ 12 लाख 64 हजार हेक्टर इतके आहे. कोकणातील एकूण भूगर्भापैकी सुमारे 53.45 टक्के जमीन पडीक आहे. या पडीक जमिनीमध्ये सर्व फळझाडांची लागवड करण्यात यावी अशी या ठरावाव्दारे मी मागणी केली आहे.

कोकणामध्ये 3500 ते 4 हजार मि.मी. पर्यंत भरपूर पाऊस पडतो. कोकणाची वैशिष्टयपूर्ण भौगोलिक रचना असल्यामुळे जमिनीच्या भू गर्भामध्ये पावसाच्या पाण्याचा साठा टिकून रहात नाही.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भूगर्भातून पाणी समुद्रामध्ये जाते. त्यामुळे आपल्याला जेवढे पाणी मिळणे आवश्यक आहे, तेवढे मिळत नाही. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी संपूर्ण देशातील भू-क्षेत्रापैकी किमान 33 टक्के क्षेत्र वनामुळे आच्छादलेले आहे. ही बाब अनिवार्य असली तरी अमेरिका, जपान, रशिया, फ्रान्स, जर्मनी इ.औद्योगिकदृष्ट्या प्रगत देशातील एकूण जमिनीपैकी 33 टक्क्याहून अधिक क्षेत्र हे वनाने व्यापलेले आहे. सिंधुदूर्ग जिल्हयात वन संज्ञेमध्ये 42 हजार हेक्टर क्षेत्र गेलेले आहे. वनसंज्ञेमध्ये महाराष्ट्राचे एकूण क्षेत्रफळ 62 हजार आहे आणि त्यापैकी 42 हजार हेक्टर क्षेत्र सिंधुदूर्ग मध्येच व्यापलेले आहे.कोकणातील जिल्हानिहाय वनक्षेत्र जमिनीच्या वर्गीकरणाबाबत माझ्याकडे आकडेवारी उपलब्ध आहे आणि ती फार मोठी आहे. पण मी थोडक्यात काही माहिती देतो. त्यानुसार जंगल क्षेत्र मुंबईमध्ये 1500 हेक्टर, ठाणे मध्ये 1 लाख 68 हजार हेक्टर, रायगडमध्ये 1 लाख 61 हजार हेक्टर, सिंधुदूर्ग मध्ये 34,200 हेक्टर म्हणजे जंगलातील एकूण क्षेत्रफळ 5 लाख 71 हजार 200 आहे आणि हे प्रमाण 19.27 आहे. तसेच ओसाड भागाच्या बाबतीत मी सगळी आकडेवारी वाचत नाही. पण संपूर्ण कोकणातील जो ओसाड भाग आहे, त्याचे एकूण क्षेत्रफळ 5 लाख 50 हजार 100 हेक्टर आहे.याठिकाणी माहितीमध्ये असे म्हटलेले आहे की,"वरील वर्गीकरणावरुन कोकणा- तील एकूण भू-क्षेत्रा पैकी 53.45 टक्के क्षेत्र हे पडीक असून, वन क्षेत्र हे 19.57 इतके असल्याचे या चार्टवरुन आपल्याला दिसून येते. त्यामुळे निसर्गाचा ढासळलेला तोल वनीकरणाने सावरण्याचा प्रयत्न शासकीय पातळीवर होणे अत्यंत आवश्यक आहे म्हणून मी आवर्जून हा अशासकीय ठराव मांडत आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये आंब्याची एकूण लागवड 4 लाख 35 हजार हेक्टर क्षेत्रामध्ये होते. त्यापैकी कोकणामध्ये 1 लाख 64 हजार हेक्टरमध्ये आंब्याची लागवड होते. रत्नागिरीमध्ये 65 हजार हेक्टरमध्ये आंब्याची लागवड होते. तसेच 80 हजार हेक्टरमध्ये काजूची लागवड होते. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये आंब्याची 28 हजार हेक्टरमध्ये लागवड होते आणि काजूची लागवड 90 हजार हेक्टरमध्ये होते. येथील एकूण बागायत क्षेत्र पाहिले तर 2 लाख 63 हजार हेक्टर आहे. तसेच आंबा हा फळांचा राजा आहे.आमचे सगळे नेते आंब्याची पेटी भरुन झाल्याबरोबर दिल्लीपासून सगळीकडे वाटतात. ज्यांच्याकडे आंब्याचे उत्पादन नाही असे लोक देखील आंब्याच्या पेट्या घेऊन जातात आणि असे सांगतात की, हे माझ्या शेतातील आहेत. मग तो कदाचित परप्रांतीय असेल. अशा प्रकारे सर्वांना आंब्याचे मोठे आकर्षण आहे. येथील आंब्याची चवच वेगळी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण . . . .

आहे आणि आंबा कुठे होतो तर कोकणामध्ये. त्यामुळे आंब्याला विशिष्ट प्रकारचे महत्व प्राप्त झालेले आहे. संपूर्ण भारत देशात 56 टक्के आंबा पिकविला जातो आणि त्यापैकी जवळजवळ 10 ते 15 लाख टन आंबा कोकणात पिकवला जातो. आपण मुंबईमध्ये आंब्याची पेटी घेतली तरी काही मोठे पुढारी सांगतात की, हा देवगडचा आंबा आहे आणि तो माझ्या शेतातील आहे वगैरे.

सभापती महोदय, मी स्वत: देखील एक हजार आंब्याची बाग बांधलेली आहे. मला फार वाईट वाटते. मी याठिकाणी नोंद करु इच्छितो की, ही बाग बांधून सहा वर्षे झाली, संपूर्ण जिल्ह्यातील सर्वात सुंदर अशी ही बाग होती. पण दोन महिन्यापूर्वी तेथील 500 झाडांना कोणीतरी आग लावली.त्यावेळी माझी पत्नी ओक्साबोक्सी रडली म्हणजे स्वत:च्या मुलाचा मृत्यू झाल्यावर जसे वातावरण निर्माण होईल, तशा प्रकारचे वातावरण निर्माण झाले. पण काही कारणास्तव कोकणी माणसाची ही जी मानसिकता आहे.....पण मी त्याबाबत जास्त चौकशी केली नाही. म्हणून या विविध फळांचे, आंब्याच्या पिकाचे जतन केले पाहिजे. मी सदनाचा जास्त वेळ घेणार नाही. पण जमिनीची धूप रोखणे, जंगलतोड थांबविणे, पर्यावरणापासून आपली सुटका करणे आणि 53.45 टक्के एवढी जी पडीक जमिन आहे, त्याचा विकास करण्यासाठी माननीय श्री.गुलाबराव देवकर साहेब आपल्याकडे कृषी विभाग आहे. आपण यासाठी एक विशिष्ट कार्यकम आखावा. यासाठी एका अभ्यासगटाची स्थापना करावी आणि जे प्रश्न आहेत, त्याची सोडवणूक करावी एवढेच भाष्य करतो आणि मला बोलण्याची परवानगी दिल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

ठराव प्रस्तुत झाला.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत/ शीघ्रलेखाची नाही

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, श्री. सुभाष चव्हाण यांनी कोकणाच्या संदर्भात एक अतिशय चांगला ठराव याठिकाणी आणलेला आहे. मी त्या ठरावाचे समर्थन करतो. या ठरावावर या सभागृहात अनेक वेळा चर्चा झालली आहे. कोकणातील विशेषत: आंबा, काजू, जांभूळ, करवंद व फणस ही फळे मोठया प्रमाणात घेतली जातात. कोकणातील पडीक क्षेत्राचा विकास व्हावा, अशा प्रकारची भूमिका सन्माननीय सदस्य श्री. चव्हाण यांची आहे आणि ही वस्तुस्थिती आहे. यापूर्वी माननीय श्री. शरद पवार यांच्या माध्यमातून कोकणात फलोद्यानचा कार्यक्रम घेण्यात आला आणि संपूर्ण कोकणात आंबा, काजू या फळांची लागवड मोठया प्रमाणात झाली. राज्यातील एकूण क्षेत्रापैकी जे प्रमाण सन्माननीय सदस्य श्री. चव्हाण यांनी सांगितले आहे, ती वस्तुस्थिती खरी आहे. जवळपास 4 लाख 35 हजार हेक्टर क्षेत्रापैकी जवळ जवळ 1 लाख 64 हजार हेक्टर इतके क्षेत्र आंबा लागवडीखाली आहे. सिंधुदुर्ग जिल्हयात एकूण बागायती खालील क्षेत्र 2 लाख 63 हजार हेक्टर इतके आहे. त्यापैकी काजू लागवडी खालील क्षेत्र 90 हजार हेक्टर आहे. आंब्याच्या लागवडी खालील क्षेत्र 28 हजार हेक्टर इतके आहे आणि दिवसेंदिवस ते वाढत आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड या तिन्ही जिल्हयात फार मोठया प्रमाणात फलोद्यानाची लागवड झालेली आहे. परंतु आंबा, काजू या फळांवर कुठल्याही प्रकारचे प्रोसेसिंग या जिल्ह्यामध्ये होत नाही. कोकणातील या फळांची दलाली करणारे दलाल सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत पैसे पोहचू देत नाहीत, ही या ठिकाणची वस्तुस्थिती आहे. आज अमेरिका, फ्रान्स, मलेशिया किंवा अन्य कुठल्याही परदेशात, त्या देशात तयार होणाऱ्या फळांपैकी किमान 70 टक्के फळांवर प्रक्रिया केली जाते. परंतु दुर्दैवाने भारतात जी फळे तयार होतात, त्यापैकी दोन टक्के फळांवर सुध्दा प्रोसेसिंग करण्यात येत नाही. कोकणात फळांवरील प्रोसेसिंगचे प्रमाण साधारणत: दीड टक्के आहे. कोकणासाठी या बजेटमध्ये काय दिले, या विषयावर सभागृहात चर्चा होईलच. पण या ठिकाणी एका गोष्टीचा विचार करण्याची आवश्यकता आहे. कोकणासाठी परमेश्वराने जेवढे भरभरुन दिलेले आहे, त्याला आपल्या प्रयत्नांची साथ देणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, दापोली कृषी विद्यापीठाची करवंदाच्या संदर्भातील एक लक्षवेधी सूचना सभागृहाल चर्चेसाठी आली होती. त्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना माननीय मंत्र्यांनी जी माहिती दिली होती ती माहिती माझ्याजवळ आहे. त्या माहितीच्या आधारे मला या ठिकाणी अशी सूचना

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली.....

करावयची आहे की, कोकणातील आंबा, काजू, फणस, करवंद, जांभूळ या फळांवर 25 टक्के प्रोसेसिंग केले तरी किंमान दीड ते दोन हजार कोटी रुपये सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या घरापर्यंत पोहचतील, एवढी आर्थिक नाडी कोकणातील बागायतीमध्ये आहे. याबाबतीत शासन विचार करणार आहे काय? दर वर्षी या ठिकाणी अंदाजपत्रक मांडण्यात येते. या अंदाजपत्रकामध्ये कोकणासाठी वेगळे धोरण जाहीर करण्यात येणार आहे काय? रोजगार निर्मितीच्या बाबतीत किंवा दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत कोकण आता सांगली, साताऱ्याच्या बरोबर गेला आहे. फक्त पुणे, मुंबई या मोठया शहरांच्या तुलनेत कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हा चौथ्या ते पाचव्या क्रमांकावर आलेला आहे. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, कोकणातील फळांवरील प्रोसेसिंगच्या बाबतीत वेगळे धोरण जाहीर करण्यात यावे आणि या योजनांमध्ये कोकणातील शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात यावे, अशा प्रकारची अट घालण्यात यावी. पण दुर्दैवाने या ठिकाणी असे नमूद करावे लागते की, केंद्र सरकारच्या योजना ज्यावेळी कोकणामध्ये विशेषत: या दोन्ही जिल्ह्यामध्ये येतात, त्यावेळी त्याच्यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील लोकांचे प्रमाण जास्त असते हे या ठिकाणी कबूल करावे लागेल. याचा अर्थ असा नाही की, कोकणातील लोकांना समजत नाही.

...यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. राजन तेली .....

मी मघाशी माननीय राज्यमंत्र्यांना सांगत होतो की, काही स्थानिक पातळीवरचे अधिकारी त्रास देतात. फलोद्यान म्हणजे काय हे ज्यांना माहीत नसते, ज्यांना आंबा फक्त खाण्यापुरताच माहीत असतो, असे लोक त्या ठिकाणी फार मोठ्या अडचणी निर्माण करतात आणि या योजना कशा होणार नाहीत हे कागदोपत्री समजावून सांगतात. त्यांना ज्या भाषेत समजावयाचे ती भाषा कोकणातील लोकांना न समजल्यामुळे इतर जी काही मंडळी काम करतात त्यांना या योजनेचा जास्तीत जास्त फायदा मिळवून देण्याचा प्रयत्न हे लोक करीत असतात. आमच्याकडे 11 ते 12 काजू युनिट आहेत पण त्यामध्ये स्थानिक लोकांचे एकही युनिट नाही. या माध्यमातून माझी शासनाला विनंती आहे की, आपण जे धोरण तयार कराल त्यामध्ये स्थानिक लोकांना, स्थानिक शेतकऱ्यांना प्राधान्य दिले गेले पाहिजे. तशा प्रकारच्या अटी त्या ठिकाणी घातल्या गेल्या पाहिजेत. तशा प्रकारचे काम त्या ठिकाणी करावे.

सभापती महोदय, मध्यंतरी या सभागृहामध्ये वाईनचा विषय चर्चेला आला होता. ती चर्चा होत असताना धान्यापासून वाईन किंवा धान्यापासून दारु तयार करण्याच्या संदर्भात फार मोठा गदारोळ झाला होता. कोकणामध्ये होणारी जी फळफळावळ आहे, कोकणात होणारा काजू असेल, कोकणात मोठ्या प्रमाणावर येणारी करवंदे असतील, त्यापासून चांगल्या प्रकारची वाईन तयार करण्याचे प्रात्यक्षिक कृषी विद्यापीठाने करुन दाखविले आहे. कोकणात सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यामध्ये काजू पिकतो परंतु काजूची बोंडे मात्र गोव्यामध्ये जातात. त्यावर गोव्यामध्ये प्रोसेसिंग केले जाते. आमच्या काही तरुण मित्रांनी करवंदापासून, जांभळापासून वाईन तयार करण्याचा प्रयत्न केला पण त्यावरची एक्साईज ड्युटी आणि इतर बाकीच्या प्रक्रिया कठीण असल्यामुळे त्यांना ते जमले नाही. या संदर्भात राज्य शासन काय धोरण घेणार आहे ? हा प्रश्न इतर भागासारखा नाही. धान्यापासून वाईन बनविण्याच्या बाबतीत टीका झाली. परंतु ही जी उत्पादने आहेत ती नंतर फुकट जातात. काजूची बोंडे टाकून दिली जातात. गोव्यामध्ये काही बोंडे उचलली जातात. काजू बोंडावर या ठिकाणी काही प्रोसेसिंग होत नाही. करवंदाच्या बाबतीत सुध्दा तशीच परिस्थिती आहे. करवंद जंगलात उत्पादित होतात. करवंदाची कोणत्याही प्रकारची लागवड केली जात नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली ....

करवंदावर आपल्याला चांगल्या प्रकारे प्रक्रिया करता येईल्. करवंद असतील, आंबा असेल, काजू असतील, फणस असतील, या सगळ्या फळांच्या बाबतीत आपल्याला नेमके काय करता येईल अशा प्रकारचे मार्गदर्शन शासनाने करण्याची गरज आहे.

या वर्षी आंब्याला आलेला मोहोर पाहिल्यानंतर मोठ्या प्रमाणावर आंब्याचे उत्पादन येईल असे वाटले होते. चालू वर्षासारखे पीक कधीही येणार नाही असे शेतकऱ्यांना वाटले होते. परंतु निसर्गाच्या अवकृपेमुळे त्या ठिकाणी बरेच शेतकरी अडचणीत आलेले आहेत. या वर्षी आंब्याचे 25 ते 30 टक्के सुध्दा पीक हातामध्ये येणार नाही अशी भीती सर्वसामान्य शेतकऱ्यांमध्ये आणि बागायतदारांमध्ये पसरलेली आहे. या सर्व गोष्टींचा सर्व्हे करण्याची विनंती मी या ठिकाणी करतो. त्या ठिकाणचा आंबा असेल, काजू असेल त्याबाबत सर्व्हे करावा. कोकणातील आणि आमच्या जिल्ह्यातील शेतकरी सातत्याने काही मागत नाहीत. ऊस जास्त झाला तर त्या शेतकऱ्यांना शासन पैसे देते. कापूस जास्त झाला तर त्या शेतकऱ्यांना शासन पैसे देते. कापूस फुकट गेला, ऊस फुकट गेला तर शासन त्यांना पैसे देते. आपण दरवेळचे बजेट पाहिले तर त्यासाठी पैसे दिले जातात. या निमित्ताने माझी शासनाला विनंती आहे. आपण सर्वांना न्याय द्यावा. आपण कापसाला न्याय द्यावा, ऊसाला न्याय द्यावा पण त्याचबरोबर कोकणातील जे सर्वसामान्य शेतकरी आहेत, जे आपल्याकडे कधी काही मागत नाहीत, त्या लोकांना दिलासा देण्याचे काम शासन करणार आहे की नाही ? शासन काहीच देत नाही असा दावा मी करणार नाही. गेल्या वर्षी नुकसानभरपाई दिली पण ती तुटपुंजी दिली. गेल्या दहा पंधरा वर्षात आपण नुकसानभरपाई दिली हे मी मान्य करतो. पण या वर्षी सुध्दा आंब्याला शासन काय मदत करु शकणार आहे ? आंब्याला या वर्षी किमान हेक्टरी 50 हजार रुपये द्यावेत अशी विनंती मी या या चर्चेच्या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, कीटकनाशकाच्या फवारणीकरिता तसेच पॉवर स्प्रेसाठी लागणारा जो रॉकेलचा कोटा आहे तो त्या ठिकाणी सर्वसामान्य शेतकऱ्यांना आणि बागायतदारांना मिळाला पाहिजे अशी मागणी मी या निमित्ताने करतो. आंबा पिकाच्या बाबतीत यावेळी लोक फार अडचणीत आले आहेत. आंब्याच्या संदर्भात ज्यांनी कर्ज काढले आहे त्यांना कर्जमाफी नको पण निदान या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. राजन तेली ....

वर्षी व्याज माफ करता येईल का यासाठी शासनाने प्रयत्न करावा. आंबा पिकास पीक विमा योजना लागू करता येईल का या दृष्टीकोनातून सुध्दा शासनाने प्रयत्न करावा. आंबा नुकसानीच्या बाबतीत सर्वेक्षण करीत असताना ज्या पध्दतीने आपण ऊसाला आणि कापसाला हमी भाव देतो त्या पध्दतीने आंब्याला हमीभाव देण्याच्या संदर्भात शासनाने सूचना द्यावी अशा प्रकारची विनंती मी या ठिकाणी करणार आहे. कारण सध्याची आंबा पिकाची परिस्थिती जर बघितली तर ही शेती करणे तेवढे फायदेशीर ठरत नाही.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली....

कारण मिळणारे उत्पन्न व येणारा खर्च याचा कधीच मेळ बसत नाही. कीटकनाशकांचे दर चौपट झालेले आहेत. परंतु आंब्याचे 10 रुपये किंवा 20 रुपये प्रति किलो या दराने कॅनिंग होते. म्हणून आंब्याचे दर निश्चित करुन उत्पादन खर्चापेक्षा कमी दराने आंबा विकण्याची उत्पादकांवर वेळ येणार नाही याची शासनाने काळजी घ्यावी. कोकणातील आंबा उत्पादकांना हमी भाव देत असताना आंबा प्रक्रिया युनिटसाठी तसेच एनडीडीबी यांच्यामार्फत प्रक्रियेसाठी खरेदी करण्यात येणाऱ्या आंब्याला प्रति किलो 40 रुपये दर मिळाला पाहिजे अशी मी या ठरावाच्या माध्यमातून मागणी करणार आहे.

सभापती महोदय, जाता जाता मी एका गोष्टीचा उल्लेख करणार आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी त्यांच्या बागेला आग लागल्याचा उल्लेख केला होता. परंतु ग्रामीण भागात सातत्याने मोठया प्रमाणात वणवे लागतात. त्यामुळे गोरगरीब लोकांना त्याचा प्रचंड त्रास होतो. त्याबाबत आम्ही सातत्याने प्रश्न मांडत असतो. हे वणवे न लागण्यासाठी शेतकऱ्यांना काही संरक्षण देता येईल काय, यासाठी काही करता येईल का, पीक विमा योजनेमध्ये त्याचा समावेश करता येईल का यावर शासनाने विचार करावा असे सांगत असतो.

तसेच कोकणामध्ये मोठया प्रमाणावर पडीक जमीन आहे. केंद्र सरकारच्या पडीक जमीन विकासाच्या अनेक योजना आहेत. पण दुर्दैवाने ह्या योजनांकडे पाहण्यासाठी राज्यातील अधिकाऱ्यांना वेळ नाही. पडीक विकास योजना, हरियाली योजना या योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविल्या जातात. या योजनांच्या माध्यमातून जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली येण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत.

कोकणातील ओलिताखाली येत नसलेल्या जमिनीचा प्रश्न आहे. त्याबाबत आपण सर्वजण मिळून शासनाकडे एक प्रस्ताव देऊ. कोकणातील ओलिताखाली असलेल्या जमिनीची परिस्थिती वाईट आहे. इरिगेशनच्या प्रकल्पांचे 90 टक्के काम झालेले आहे, घळ भरणी झालेली आहे परंतु उर्वरित कामांसाठी पैसे मिळत नाहीत. ज्या प्रकल्पांचे 90 टक्के काम पूर्ण झालेले आहे त्या

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.राजन तेली...

प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना अद्याप भूसंपादनाचे पैसे मिळालेले नाहीत. संपूर्ण देशाचा विचार केला तर महाराष्ट्र राज्यात पाटबंधारेसाठी अधिक खर्च केला जातो. राज्यामध्ये 17.5 टक्के इरिगेशन झालेले आहे व कोकणामध्ये केवळ 5 टक्के इरिगेशन झालेले आहे. कोकणातील लोकांना दिलासा द्यावयाचा असेल तर या सर्व गोष्टींचा विचार करुन आंबा प्रक्रिया बाबत एक धोरण अवलंबिले पाहिजे. कोकणातील बागायतदार शेतकऱ्यांना भरीव मदत करावी अशी मी विनंती करतो आणि याठिकाणी थांबतो.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी या ठरावाच्या माध्यमातून कोकणातील आजच्या वस्तुस्थितीचा आरसा सरकारला दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कोकणातील वस्तुस्थिती सरकारला माहीत नाही असा मी दावा करणार नाही. पण हा आरसा आम्ही किती वेळा शासनाला दाखवावयाचा, त्यामध्ये कधी सुधारणा होईल का, हा आमच्यासमोर प्रश्न आहे. सरकारच्या वतीने भाषणे केली जातात, मग अर्थसंकल्पीय भाषण असो, राज्यपालांचे भाषण असो, कसलेही भाषण असो. त्या भाषणांमध्ये कोकणाचा कॅलिफोर्निया बनविण्याचे वाक्य असते. शासनाने कॅलिफोर्निया बनवू नये, पण निदान समृध्द कोकण तरी बनवावे. आम्हाला कोकणाचा कॅलिफोर्निया बनवावयाचा नाही, या कोकणामध्ये सगळे काही आहे. आम्हाला बारामती नको, आम्हाला कोकणच पाहिजे. या कोकणाचे आज आपल्यासमोर जे चित्र दिसत आहे. त्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी सुंदर वाक्य वापरले आहे. कोकणाचा कॅलिफोर्निया हा विषय बाजूला ठेवू. आज कोकणाची जी भौगोलिक परिस्थिती आहे, ती निसर्गाने दिलेली आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप....

शासनाने गेल्या 60-62 वर्षामध्ये काय दिले हे येथे सांगण्याची आवश्यकता नाही. निसर्गाने मात्र कोकणाला भरपूर दिलेले आहे. पाण्याचा प्रश्न राज्यभराचा आहे. हा प्रश्न कोण निपटू शकतो? देशात चेरापुंजी नंतर सर्वात जास्त पाऊस कोकणात पडतो. देशामध्ये दोन नंबरचा पाऊस ज्या भागात पडतो त्या भागात पाणलोटाखालील क्षेत्र फक्त 5 टक्के आहे. इरिगेशनची परिस्थिती तर अतिशय भयानक अशी आहे. आज त्या भागामध्ये पडणा-या पाण्याची क्षमता एवढी आहे की, जर आपण ते पाणी योग्य पध्दतीने अडवले तर संपूर्ण राज्याचा पाण्याचा प्रश्न सुटू शकेल. कोकणामध्ये छोट्या छोट्या बंधा-याची 90 टक्के कामे घेतलेली आहेत. परंतु ती कामे पूर्णत्वास जात नाहीत. त्यासाठी आपण काय करणार आहात ? म्हणून मी म्हणालो की, आमचा आरसा आपण एकदा पहा. आम्हाला मेकअप नको. कोकणातील लोकांना मेकअप लागत नाही. परंतु जे काही देऊ कराल ते व्यवस्थित द्या. आज जवळ जवळ 53.56 टक्के जमीन पडीक आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर जमीन पडीक असणे ही कोणत्या विकसनशील राज्याला अभिमानास्पद अशी गोष्ट असू शकेल ? असे असतानाही आपल्या राज्याचे दरडोई उत्पन्न 64 हजार रुपये आहे. या भागाला शासनाने थोडीशी जरी मदत केली तरी आख्ख्या देशाला अभिमान वाटेल अशा प्रकारची प्रगती या विभागामध्ये होईल आणि पर्यायाने त्याचा उपयोग राज्याला होईल. केवळ कोकणापुरतीच पाण्याची व्यवस्था करा असे आम्ही कधीच म्हटलेले नाही. आमचे म्हणणे असे आहे की, कोकणात पडणारे सर्व पाणी अडवा आणि संपूर्ण राज्याला पुरवा. कोकणामध्ये पाणी जिरवण्याचे काम आम्ही करु. आपल्या राज्यामध्ये मार्च, एप्रिल आणि मे या तीन महिन्यामध्ये पाण्याच्या टँकरवर हजारो कोटी रुपये खर्च करीत असतो. सगळीकडे पाण्यासाठी लोक वणवण फिरत असतात. तेव्हा कोकणाला निसर्गाने जे काही दान दिलेले आहे त्याचे नियोजन आणि विनियोजन आपण करणार की नाही हा खरा प्रश्न असून हेच आमचे दु:ख आणि वेदना आम्ही राज्यासमोर ठेवत आहोत.

सभापती महोदय, या ठिकाणी आंबा, काजू, नारळ आणि अन्य फळफळावळचा उल्लेख करण्यात आला. करवंदाचाही उल्लेख या ठिकाणी करण्यात आला. अशा प्रकारची जंगली फळफळावळ कोकणामध्ये आपोआप होते. ह्या गोष्टी निसर्गच तयार करीत असतो, निसर्गच त्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप....

आपणाला देत असतो. परंतु त्यांचा योग्य तो उपयोग आपण करु शकत नाही. कोकणामध्ये असंख्य वनौषधी आहे. आज बायोडाव्हर्सिटीच्या बाबतीतील अहवाल हेच सांगत आहे की, कोकण हा बायोडाव्हर्सिटीमध्ये अतिशय संपन्न असा विभाग आहे. आपण पश्चिम घाट आणि अन्य परिसराचा उल्लेख करीत असताना कोकणामध्ये आपल्याला मिळालेली निसर्गाची जी देण आहे तिचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी आपण काही उपाययोजना करणार आहात की नाही हा प्रश्न आहे.

या अशासकीय ठरावावर बोलत असताना माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी अशा पडीक जमिनीवर सागाची लागवड करण्याची सूचना केली. मी त्यांच्या या मताशी सहमत होऊ इच्छित नाही. याचे कारण असे की, शासना तर्फे एखाद्या ठिकाणी सागाच्या लागवडीचा कार्यक्रम हाती घेतला जाईल आणि तो भाग उद्या वनक्षेत्र म्हणून घोषित करुन तेथे तुम्हा आम्हाला पाऊल ठेवायला देखील दिले जाणार नाही. अशा प्रकारच्या घटना अनेक ठिकाणी घडलेल्या आहेत. अशी शंभर उदाहरणे मी या ठिकाणी देऊ शकेन. पनवेल मधील अभयारण्याच्या पुढील भागामध्ये एका शेतक-याच्या जमिनीचा भाग हरित दिसला म्हणून तो भाग हरित पट्टा म्हणून जाहीर करण्यात आला. आश्चर्यच आहे. असे काही होत असेल तर त्याचाही पुनर्विचार करण्याची गरज आहे. एखादा चांगला परिसर असेल तर त्याला आम्ही जंगल म्हणण्याचे कारणच नाही, कारण जे काही जंगल राहिलेले आहे ते आमच्या कोकण विभागातच राहिलेले आहे. बाकीच्या ठिकाणी काय झालेले आहे हे सांगण्याची आवश्यकता नाही. मी असे सांगेन की, ही जी काही 53.45 टक्के पडीक जमीन आहे तिचा विनियोग आणि उपयोग राज्याच्या आणि कोकणाच्या दृष्टीने आपल्याला अनेक प्रकारे करता येऊ शकेल. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी कोकणामध्ये फळप्रक्रिया उद्योग निर्माण झाले पाहिजे असे सांगितले. फळप्रक्रिया उद्योगाचा विषय आम्ही या सभागृहामध्ये लक्षवेधी सूचना, अल्पकालीन चर्चा अशा विविध आयुधांच्या माध्यमातून मांडलेला आहे. त्याबाबतीत शासनाकडून सकारात्मक उत्तरे आलेली आहेत. आपण राज्यकर्ते आहात, शासनकर्ते आहात म्हणून मी आपणाला दोष देत नाही. पण त्याबाबतीत काहीच कार्यवाही होत नाही. या ठिकाणी करवंद आणि काजूच्या बोंडाबाबत सांगण्यात आले.

...नंतर श्री. भोगले...

अशासकीय ठराव/प्रश्नोत्तरासाठी नाही

श्री.भाई जगताप.....

आंबा पीक हे नगदी पीक आहे. यावर्षी 20 टक्क्यापेक्षा कमी उत्पादन होणार आहे. त्यात पाऊस झाला तर काय परिस्थिती होते हे तुम्हा आम्हाला माहिती आहे. केवळ दिसायला पीक दिसते. परंतु आंबा बागामध्ये आगी लागतात, वणवा पेटतो. माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी आंबा बागेतील वणव्याचा मुद्दा मांडला आहे. ज्याप्रमाणे पिकांना विमा योजना लागू केली जाते, त्याच धर्तीवर कोकणातील फळफळावळांना पीक विमा योजना लागू करावी. कोकणामध्ये फळफळावळापेक्षा इतर कोणतेही उत्पादन होत नाही. काही प्रमाणात भात शेती व नागली पीक घेतले जाते. परंतु ज्या पिकांवर आमचा उदरनिर्वाह अवलंबून आहे त्या फळ पिकांना पीक विमा योजना लागू करण्याचा शासनाने आवर्जून विचार करावा आणि तसे धोरण जाहीर करावे अशी नम्रतेची विनंती करतो.

मध्यंतरी शासनाने एक योजना तयार केली होती, ती कितपत अंमलात आणली मला माहिती नाही. 1:9 प्रमाणात फळ प्रक्रिया उद्योगाचे धोरण जाहीर केले होते. त्यामध्ये किती यश आले याचा एकदा आढावा घ्यावा. केंद्र शासनाने ही योजना आणलेली होती. केंद्राकडून आलेला निधी वापरला जात नाही. तेथील अधिकाऱ्यांचा देखील विषय आहे. दापोली येथील कृषी विद्यापीठाकडून अतिशय चांगल्याप्रकारे संशोधन केले जाते. त्या संशोधनाचा फायदा संपूर्ण देशाला होत आहे, याचा आम्हाला अभिमान आहे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे या संशोधनाचा कोकणाला किती फायदा होतो? संशोधन हे कोकणातील माती आणि पिकांवर आधारित असले तरी त्या संशोधनातून किती प्रगती झाली याचे चित्र राज्यातील आणि कोकणातील जनतेसमोर मांडले पाहिजे. दापोली कृषी विद्यापीठाने करवंदावर प्रक्रिया करण्याबाबत संशोधन केले आहे. आंब्याचे साठे तयार करण्याबाबत संशोधन केले आहे. हे संशोधन लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समितीमार्फत कितपत प्रयत्न झाले हा एक संशोधनाचा विषय आहे. कोकणातील विशिष्ट आंब्याचा उल्लेख होतो तेव्हा डोळ्यासमोर सिंधुदुर्ग, विशेषत: देवगडचा भाग येतो. परंतु बाणकोट पट्टयामध्ये आंबा पीक मे महिन्यात येते. दापोली, रायगड जिल्हयात मार्च-एप्रिलमध्ये आंबा पीक येते. या भागात पूर्णपणे आंबा मे महिन्याच्या शेवटी बहराला येतो. त्यावेळी पाऊस पडत असल्यामुळे या आंब्याला काही भाव मिळत नाही. चिपळूण येथील श्री.पुरंदरे यांनी याबाबत 20 वर्षे संशोधन करुन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले आहे. यासाठी कोणत्याही निधीची

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.....

आवश्यकता नाही. काही मूलभूत गोष्टी त्यांनी सुचविल्या आहेत. त्यांनी एक तंत्रज्ञान विकसित केले आहे. आंबा कलमाचे संगोपन करीत असताना जी काळजी घेतली जाते त्यामध्ये प्रामुख्याने केमिकल व कल्टारची फवारणी केली जाते. ही फवारणी करण्याची गरज नाही. नैसर्गिकरित्या कलमांची वाढ होऊ शकते हे त्यांनी सिध्द केले आहे. फवारणी केल्यामुळे फळधारणा दोन महिने विलंबाने होते. फवारणी न केल्यास मार्च- एप्रिल महिन्यात फळधारणा होऊ शकते अशा प्रकारचे यशस्वी संशोधन श्री.पुरंदरे यांनी केले आहे.

नंतर 3 सी 1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ....

सभापती महोदया, या विषयाच्या बाबतीतील तंत्रज्ञानाच्या संदर्भात माझा आग्रह कायम राहणार आहे. आपले जे कृषी अधिकारी आहेत त्यांना कोकणात संशोधन करण्यासाठी पाठविले आहे. परंतु अधिका-यांनी कोकणात संशोधन न करता त्यांनी कोकणात जागा घेऊन बागा व बंगले बनवले आहेत. हे सर्व करीत असतांना भ्रष्टाचार करुन ही कामे करु नका, तर स्वत:च्या पगारावर बागा व घरे बांधा एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, कोकणातील फळबागाच्या संदर्भात एक तर संशोधन केले जात नाही. जे काही संशोधन झालेले आहे ते लोकांपर्यंत पोहचविण्याचे काम व्यवस्थित केले जात नाही. जे कोणी नवीन संशोधन करीत आहेत त्यांना प्रोत्साहन दिले जात नाही. त्यामुळे कोकणाच्या फळबागाच्या संदर्भात शासनाने लक्ष घालावे अशी मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो. आपण मला विचार मांडण्यासाठी वेळ वाढवून दिल्याबद्दल आपले आभार मानतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र, जय कोकण...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, कोकणाच्या एकंदर विकासाला हातभार लागावा अशा प्रकारचा अशासकीय ठराव सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी मांडला असून या ठरावावर तीन सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या अतिशय चांगल्या आहेत. त्यामुळे या सूचनेच्या संदर्भात शासनाने गंभीर विचार करुन आराखडा तयार करण्याची आवश्यक आहे.

सभापती महोदया, मी सभागृहाला आठवण करुन देतो की, ज्यावेळेला माननीय अंतुले साहेब मुख्यमंत्री होते त्यावेळेस त्यांनी कोकणाच्या डोंगर द-यांचा महाराष्ट्र बँकेमार्फत सर्व्हे केला होता. त्यांनी केलेला सर्व्हे कोठे गेला हे कळलेलेच नाही. माननीय अंतुले साहेब मुख्यमंत्री पदावरुन गेले आणि त्यांच्या बरोबर सर्व्हेही गेला. पाणी कोठे कोठे साठविता येईल व त्यासाठी काय काय करता येईल यासाठी हेलिकॉप्टरमध्ये बसून हा सर्व्हे करण्यात आला होता. तो सर्व्हे मिळाला तर त्याचा आपल्याला चांगला उपयोग होऊ शकेल, त्यामुळे या सर्व्हेचा माननीय मंत्री महोदयांनी शोध घ्यावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, कोकणाच्या विकासाच्या संदर्भात बोलत असतांना मी एका गोष्टीचा उल्लेख करतो की, कोकणात उद्योग यावेत या मताचे आम्ही देखील आहोत परंतु कोकणात आता केमिकल उद्योग येत असून कोकण मारण्याचा धंदा आता सुरु झालेला आहे. कोकणामध्ये औष्णिक विद्युत प्रकल्प मोठया प्रमाणात येत आहेत. परंतु कोकणामध्ये बागायती पिके मोठया प्रमाणात होऊ शकतात, फळबागायती मोठया प्रमाणात होऊ शकते, पर्यटन मोठया प्रमाणात होऊ शकते व कोकणाचा विकास ज्या मार्गाने करावयास पाहिजे त्या मार्गाने करण्याच्या संदर्भात विचार प्रामुख्याने केला जात नाही याची आम्हाला खंत आहे.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी आंब्याच्या संदर्भातील जो उल्लेख केलेला आहे तो अगदी बरोबर आहे. कोकण वासीयांना आता केवळ आंब्यांवर अवलंबून राहून चालणार नाही. कोकणी माणूस जसा सेन्सीटीव्ह आहे तसेच आंब्याचे पीक सुध्दा सेन्सेटीव्ह आहे. आंबा हा फार काळ टिकत नाही तसेच आंब्याचे पीक कधी येते तर कधी येत नाही अशी परिस्थिती आहे. आंब्याचे पीक बेभरवशाचे आहे. कोकणी माणसाची जशी मर्जी आहे तशीच मर्जी आंब्याची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई ....

सुध्दा आहे. त्यामुळे कोकणी माणसाला आता आंब्यावर अवलंबून राहून चालणार नाही. मंडणगड येथील पलवणी गावामध्ये एका व्यक्तीने 130 एकर जमीन डोंगराळ भागात घेतली असून त्यांना त्या जमिनीवर रॅम्सी नावाची वनस्पती लावावयाची आहे. खरे म्हणजे मंत्री महोदयांनी त्यांना मदत करण्याची गरज आहे. रॅम्सी ही वनस्पती तागासारखी असून त्यामधून चांगल्या प्रकारचा दोरा निघू शकतो व नंतर त्यातून फॉडरही निघू शकते. या पिकावर रोग येत नसल्यामुळे या पिकापासून कोकणी माणसाला सातत्याने पीक मिळू शकते.

या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी करवंदाचा उल्लेख केलेला आहे. करवंद गोळा करण्याचे काम आदिवासी माणूस मोठया प्रमाणात करीत असतो. करवंदाच्या बागाही करता येतात. करवंदापासून वाईन, लोणचे, जॅम तयार करता येतात. करवंदापासून पदार्थ बनवण्याचे काम घरगुती पध्दतीने सुरु झालेले आहे त्यामुळे करवंदाच्या उद्योगाला शासनाने चालना देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, जांभूळ हे अतिशय चांगले पीक असून जांभळाच्या बी चा सुध्दा उपयोग होऊ शकतो. त्यामुळे जांभळाची लागवड मोठया प्रमाणात करण्याची आवश्यकता आहे. कोकणामध्ये बेसॉल्ट रॉक असल्यामुळे त्यामध्ये पाणी साचून राहत नाही.

यानंतर श्री. गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई ...

डोंगर माथ्यावर पाणी कसे टिकेल हे पाहिले पाहिजे. कोकणामध्ये दरवर्षी पाऊस भरपूर पडतो परंतु हे सर्व पाणी समुद्राला जाऊन मिळते. हे पाणी मोठया प्रमाणावर अडविण्यात न आल्यामुळे मार्च महिन्यापासूनच कोकणामध्ये पाण्याची टंचाई जाणवू लागते. एप्रिल मे महिन्यात मुंबईहून अनेक कुटुंबे कोकणामध्ये जात असत परतु आता तेथे पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. कोकणामध्ये शौचालयाची सोय नाही तसेच पाणी देखील पुरेसे नाही त्यामुळे कपडे धुण्यासाठी नदीवर जावे लागत असल्यामुळे कोणीही कोकणामध्ये जाण्यास तयार होत नाहीत.

श्री.राजन तेली : सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आता अशी परिस्थिती कोकणामध्ये नाही. तेथे पाण्याची व्यवस्था असून आमचा जिल्हा आता टॅन्कर मुक्त झाला आहे.

श्री.हुसेन दलवाई :पावसाचे जे पाणी पडते ते पाणी मोठया प्रमाणावर डोंगर माथ्यावर अडविले पाहिजे आणि नंतर हे पाणी डोंगराच्या खाली कसे आणता येईल याचा विचार केला पाहिजे. या पाण्यापासून सगळे डोंगर कसे भिजू शकतील याचा देखील विचार केला पाहिजे. कोकणामध्ये जांभुळ,करवंदे,कोकम,आवळा,चिंच इत्यादी मोठया प्रमाणावर होत असते. गोव्याला ज्याप्रमाणे मोठया प्रमाणावर अननस होतात त्याप्रमाणे कोकणामध्ये सुध्दा होऊ शकते त्या दृष्टीने काही लोकांनी प्रयत्न सुध्दा केला होता परंतु अननसाच्या बागेमध्ये साप येतात म्हणून काही लोकांनी या बागा काढून टाकल्या आहेत. तेव्हा या बागेमध्ये साप येणार नाहीत या दृष्टीने संशोधन करण्यात आले पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये भुईमुग होईल असे वाटले नव्हते परंतु आज त्या ठिकाणी मोठयाप्रमाणावर हे पीक घेतले जाते तेव्हा अशा शेतक-यांना शासनाकडून मदत दिली गेली पाहिजे.

सभापती महोदय, वशिष्ठी नदीचे सर्व पाणी समुद्राला जाऊन मिळते तेव्हा लिफट इरिगेशनची योजना केल्यास कोकणातील सर्व डोंगर भिजून हिरवेगार होऊ शकतील तसेच कोकणातील अनेक खेडयातील पाण्याचा प्रश्नही सुटू शकेल. केरळ राज्यात गेल्यानंतर असे निदर्शनास येते की, कोकण आणि केरळ मध्ये काहीही फरक नाही परंतु दुर्दैवाने कोकणाकडे ज्या पध्दतीने लक्ष द्यावयास पाहिजे त्या पध्दतीने लक्ष दिले गेले नाही. वनौषधी सबंधीचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री भाई जगताप यांनी या ठिकाणी केला होता. औषधी वनस्पती राज्यात मोठया

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रमाणावर उपलब्ध आहेत . त्याची लागवड व्यवस्थितपणे व्हावयास पाहिजे परंतु दुर्देवाने तसे होत नाही.

सभापती महोदय, धरणाच्या बाबतीत अनेकदा उल्लेख करण्यात येतो. काही ठिकाणी धरणाची कामे पूर्ण झाली आहेत परंतु कालवे बाधण्यात आलेले नाहीत.त्यामुळे धरणातील पाणी शेतापर्यंत जाण्यासाठी कोणतीही व्यवस्था करण्यात न आल्यामुळे शेतीला पाणी मिळत नाही. दहा पंधरा वर्षापासून हीच अवस्था असून यामध्ये सुधारणा करण्यात आली पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.असे करण्यात आल्यामुळे 53.45 टक्के जमीन जी पडीत आहे ती लागवडी खाली येईल त्यामुळे कोकणातील लोकांचे उत्पन्न वाढेल. केवळ भात आणि नाचणीवर कोकणातील शेतक-याला अवलंबून न ठेवता इतर पिकासाठी देखील प्रोत्साहन दिले पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.कोकणामध्ये फणसाच्या बागा अधिक कशा वाढतील यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत.

सभापती महोदय, कोंकणामध्ये दोन तीन ठिकाणी प्रोसेस युनिट आहेत. कोकणामध्ये 17 ते 18 टक्के काजूवर प्रोसस होते बाकीचा सर्व काजू केरळ आणि कर्नाटक राज्यामध्ये जातो.तेव्हा काजूवर प्रोसेस करणारे युनिटस उभी करण्यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. ज्याप्रमाणे साखर कारखान्याला मदत दिली जाते तशाच प्रकारची मदत शासनाने या युनिटला दिली पाहिजे असे मला सांगावयाचे आहे. मी जेव्हा मंत्री होतो तेव्हा रत्नागिरीच्या कॅबिनेटच्या बैठकीमध्ये असा निर्णय घेण्यात आला होता की कोकणामध्ये बागायती करण्यासाठी 9 : 1 तत्व मान्य केले जाईल परंतु त्याप्रमाणे पैसे दिले गेले नाहीत, तेव्हा हे पैसे देण्यात आले तर कोकणातील पडीत जमिनी लागवडी खाली येतील आणि ख-या अर्थाने कोकणचा कॅलिफोर्निया होईल. सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी जो अशासकीय ठराव मांडला आहे त्याला माझा पाठिंबा आहे.हा अशासकीय ठराव असल्यामुळे तो ठराव सन्माननीय सदस्यांना मागे घ्यावा लागतो हे मला माहीत आहे परंतु माननीय मंत्र्यांनी उत्तर देत असतांना याबाबतीत गंभीरपणे विचार केला जाईल आणि कोकणासाठी वेगळया प्रकारचे नियोजन केले जाईल असे आश्वासन द्यावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो. जयहिंद जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नाम नियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी अत्यंत महत्वाच्या विषयावरील अशासकीय ठराव मांडला आहे. कोकणामध्ये 53.45 टक्के जमीन पडीक आहे. कोकणातील जमीन खरोखर खूप चांगली असून अनेक फळबागा लावण्यात आल्या तर तेथील लोकांना रोजगाराची नवीन संधी उपलब्ध होईल.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण...

आपण दापोली कोकण कृषी विद्यापीठाला निर्देश देऊन अशाप्रकारचे संशोधन करण्यास सांगितले पाहिजे. आपण मुंबईहून रत्नागिरी, सिंधुदुर्ग, गोव्यापर्यंत रस्त्याने गेलो तर सर्वत्र काजूची जंगले पहावयास मिळतात. तेथील अनेक गरीब महिला त्या जंगलामध्ये जाऊन काजूच्या बिया गोळा करुन, आंबे-फणस बाजारात विकून त्यावर आपले घर चालवितात. कोकणातील हापूस आंबा जगप्रसिध्द आहे. आंब्याच्या हंगामात इंग्लंडच्या राणीला ब्रेकफास्टकरिता टेबलावर आंबा लागतो. अशाप्रकारे हा जगभर प्रसिध्द असणारा आंबा आपल्याला मुंबईमध्ये महागडया दराने विकत घ्यावा लागतो. असे असले तरी कोकणातील आंबा बागायतदार शेतकऱ्यांना मात्र चांगला भाव मिळत नाही हे तेथील शेतकऱ्यांचे दु:ख आहे.

सभापती महोदय, मी कोकणामध्ये काही महिन्यापूर्वी गेले असतांना तेथील आंब्याची झाडे सर्वत्र मोहराने बहरलेली पाहिली. त्यामुळे यावर्षी आंब्याचे भरपूर पीक येणार आहे असे मला वाटले. परंतु त्या झाडांना आलेला संपूर्ण मोहर गळून गेल्यामुळे आणि तेथील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाल्यामुळे तो चिंताग्रस्त झाला आहे. आज तेथील आंबा बागायतदार शेतकऱ्यांना दहा ते पंधरा टक्के सुध्दा आंब्याचे उत्पन्न मिळणार नाही अशी परिस्थिती आहे. त्याचप्रमाणे कोकणातील काजूच्या गरांना सुध्दा योग्य किंमत मिळत नाही ही देखील एक चिंतेची बाब आहे. कोकणातील पडीक जमिनीवर मोठया प्रमाणात फळ झाडांची लागवड केली पाहिजे अशी आपण या ठरावाव्दारे मागणी करीत आहोत. परंतु आज कोकणामध्ये रेल्वे आली तरी कोकणच्या रस्त्यांचे चौपदरीकरण मात्र झाले नाही ते होण्याची फार मोठया प्रमाणात गरज आहे. अनेक लोक रत्नागिरी,सिंधुदुर्ग ते गोव्यापर्यंत रस्त्याने प्रवास करीत असतात . तेथील रस्ते वळणदार घाटातील असल्यामुळे अपघाताचे प्रमाण देखील जास्त आहे. वळणदार रस्त्यांवरुन एका बाजूने जात असतांना समोरुन येणारी वाहने चालकाला दिसत नाहीत याकरिता रस्त्याचे चौपदरीकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. कोकणामध्ये सुपीक मेवा पिकत असतांना त्यावर प्रक्रिया करणारे उद्योग नाहीत.

कोकणामध्ये राजापूरसारख्या तालुक्यामध्ये धरणांची कामे पूर्ण झाली आहेत, परंतु त्याठिकाणी अजूनपर्यंत कालवे तयार करण्यात आले नाहीत ते कधी होणार आहेत हा प्रश्न आहे. आपण शेतीला पाणी उपलब्ध करुन दिले तर मोठया प्रमाणात फळबागा उभ्या रहातील आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्रीमती विद्या चव्हाण....

तेथील शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न सुटतील. कोकणामध्ये फलोत्पादनाची योजना मोठया प्रमाणावर अंमलात आणल्यानंतर त्या फलोत्पादनावर प्रक्रिया करणारे उद्योग देखील सुरु झाले पाहिजेत. मुंबईमध्ये आंब्याच्या रसाचे कॅन खूप कमी प्रमाणात उपलब्ध होतात. उन्हाळा प्रचंड वाढत असल्यामुळे कोल्ड ड्रींक, पेप्सी, कोका-कोलापेक्षा आपण कोकम सरबत, कैरीचे पन्हे यावर संशोधन केले तर कोका-कोलाच्या बरोबरीचे कोल्ड ड्रींक आपण देऊ शकतो. तसेच बचत गटाच्या माध्यमातून महिलांना देखील रोजगार मिळवून देऊ शकतो यासाठी आपण संशोधन केले पाहिजे. याकरिता कोकण कृषी विद्यापीठाकडून आपल्याला जास्त अपेक्षा आहेत. त्यांच्याकडे असलेल्या तज्ज्ञ लोकांकडून आपल्याला चांगले मार्गदर्शन मिळू शकेल. खास करुन यामध्ये अधिक लक्ष केंद्रीत करुन आणि कोकणातील जमिनीचा जास्तीत जास्त वापर करुन कोकणचा विकास आपल्याला करता येईल, यादृष्टीने आपण विचार करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेशदादा देशमुख (परभणी तथा हिंगोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी सभागृहामध्ये मांडलेल्या ठरावाचे समर्थन करीत असतांना शासनाने कोकणातील आंबा, काजू, नारळ इत्यादी पिकांना अनुदान दिले पाहिजे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, शासनामार्फत गेल्या वर्षी शेतकऱ्यांसाठी ठिबक सिंचन योजना राबविण्यात आली परंतु त्याचे पैसे अजूनपर्यंत शेतकऱ्यांना देण्यात आले नाहीत. तसेच, त्याकरिता यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये अपूरी तरतूद करण्यात आली आहे. या निमित्ताने मंत्री महोदयांना एवढीच विनंती करतो की, आपण शेतकऱ्यांसाठी कोणतेही धोरण राबवितांना शेतकऱ्यांना द्यावयाचा पैसा देखील त्यांना वेळेवर मिळेल हे लक्षात ठेवले पाहिजे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेशदादा देशमुख . . . .

मला माननीय मंत्री महोदयांना फक्त एवढीच विनंती करावयाची आहे की, आपण शेतकऱ्यांसाठी धोरण राबवित असताना शेतकऱ्यांना जो पैसा द्यावयाचा आहे, ती बाब सुध्दा लक्षात ठेवली पाहिजे तो निधी शासनाकडून ताबडतोब मिळावा अशी सदनामार्फत विनंती करतो. याठिकाणी तालिका सभापती म्हणून उपस्थित असलेल्या ॲड.उषाताई दराडे यांनी त्यांच्या शेतामध्ये अनेक खाद निर्मिती करण्याचा प्रयोग राबविला आणि तो प्रयोग मी देखील माझ्या शेतामध्ये राबविला. हे अतिशय चांगले काम आहे. त्यामुळे मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की,शेतकऱ्यांना ठिबक सिंचन योजनेसाठी मिळणारी जी सबसिडी आहे, ती सबसिडी वाढवून देण्यात यावी. धन्यवाद.

. . . .3 एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर (कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदय, कोकणातील जो भूभाग आहे, तेथील पडीक जमिनीचा जास्तीतजास्त उपयोग हा फळबागा तयार करण्यासाठी, वृक्षारोपण करण्यासाठी व्हावा. त्याबाबत ठोस उपाययोजना करण्यात यावी. तसेच याकरता आर्थिक तरतूद करावी अशा प्रकारचा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण साहेब यांनी मांडलेला आहे. या ठरावाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य सर्वश्री सुभाष चव्हाण साहेब, राजन तेली साहेब, भाई जगताप साहेब, श्रीमती विद्याताई चव्हाण, सन्माननीय सदस्य सर्वश्री सुरेशदादा देशमुख, हुसेन दलवाई या सर्वांनी याठिकाणी या विषयाच्या संबंधात अतिशय चांगली, सविस्तर चर्चा केली आणि त्यामध्ये चांगल्या सूचनाही केल्या आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण साहेब यांनी प्रामुख्याने सांगितले की, कोकणाचा कॅलिफोर्निया बनविण्यासाठी अनेक नेत्यांनी वर्षानुवर्षापासून स्वप्न पाहिलेले आहे आणि त्या अनुषंगाने भाषणेही केलेली आहेत आणि त्या मधून पडीक जमिनीमध्ये फळबागांची लागवड करावी, वृक्षांची मोठ्या प्रमाणात लागवड व्हावी असेही सांगितलेले आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, संपूर्ण देशामध्ये आंब्याचे जे उत्पादन होते, त्यापैकी 56 टक्के आंबा कोकणामध्ये पिकविला जातो. म्हणून कोकणामध्ये विविध सुधारणा झाल्या पाहिजेत. कोकणातील जी जमीन आहे तेथे मोठया प्रमाणात फळबागांची तसेच वृक्षांची लागवड झाली पाहिजे. अशा प्रकारच्या चांगल्या सूचना केलेल्या आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली साहेबांनी सांगितले की, काजूवर प्रक्रिया करणारे उद्योग कोकणामध्ये नाहीत. त्यामुळे बराचसा काजू बाहेर पाठविला जातो. इतर देशांमध्ये त्या-त्या ठिकाणी 70 टक्के फळांवर प्रक्रिया होते आणि कोकणामध्ये फक्त 2 टक्के फळांवर प्रक्रिया केली जाते. त्यामुळे कोकणामधील फळांवर 25 टक्के तरी प्रक्रिया झाली पाहिजे. जेणेकरुन या माध्यमातून आपल्याला कोकणातील आर्थिक नाडी मजबूत करता येईल. तसेच शासकीय योजनांमध्ये कोकणातील जनतेला प्राधान्य दिले पाहिजे.त्याचप्रमाणे कोकणातील सर्व फळांच्या पिकांबाबत किंवा तेथील इतर पिकांबाबत देखील सर्व्हे करण्यात यावा. तसेच आंब्याच्या पिकासाठी पीक विमा योजना लागू करता येईल काय ? यादृष्टीने विचार करावा अशा प्रकारची येथे एक चांगली सूचना केलेली आहे.आंब्याला हमी भाव मिळावा. तसेच एम.डी.डी.बी. तर्फे आंबा पिकाला 40 रुपये हमी भाव मिळावा अशा प्रकारची देखील सूचना करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई साहेबांनी सांगितले की, ज्या फळ...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

बागा आहेत, जेथे वृक्षारोपण केलेले आहे त्या बाबतीत सर्व्हे करण्याची आवश्यकता आहे. कोकणामध्ये फक्त केमिकल उद्योग मोठया प्रमाणात येतात, त्याचप्रमाणे तेथे फळांवर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांची सुध्दा फार आवश्यकता आहे, मग आंबा, करवंद किंवा जांभूळ अशा अनेक फळांच्या बाबतीत संशोधन करुन तेथील लोकांना या फळांचे उत्पादन करण्यासाठी कसे प्रोत्साहन देता येईल आणि त्या माध्यमातून आर्थिक उत्पन्न कसे वाढविता येईल या दृष्टीकोनातून सूचना करण्यात आल्या आहेत. त्याठिकाणी औषधी वनस्पतींची लागवड देखील व्हावयास पाहिजे. तसेच तेथे धरणे बांधलेली आहेत, पण अजूनही कालव्यांची कामे पूर्ण करावयाची आहेत. कोकणामध्ये काजूच जे उत्पादन होते, त्यापैकी केवळ 17 ते 18 टक्केच काजूवर प्रक्रिया होते आणि बाकीचा काजू मोठ्या प्रमाणात बाहेर पाठविला जातो अशी स्थिती आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी सूचना केली की, कोकणामध्ये फळबागा लावल्या तर रोजगार निर्मिती होऊ शकते. मग तेथे हापूस आंब्याचे उत्पादन मोठया प्रमाणात वाढविता येईल. तसेच सन्माननीय सदस्यांनी कोकण रेल्वेच्या चौपदरीकरणाबाबत आणि तेथील रस्त्यांच्या चौपदरीकरणाबाबत योजना सुचविल्या आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर .....

सभापती महोदय, कालव्यांची कामे अद्याप पूर्ण करावयाची राहिलेली आहेत. कोकणातील काजू मोठया प्रमाणात परदेशात जातो. तरी देखील जवळपास 17 ते 18 टक्के काजूवर या ठिकाणी प्रक्रिया केली जाते. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी कोकण कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून मोठया अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. तसेच कोकण कृषी विद्यापीठाने या क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त संशोधनाची कामे करावीत, फळांवर प्रक्रिया झाली पाहिजे, फळबागा लावल्यानंतर रोजगार निर्मिती होऊ शकते, अशा प्रकारच्या सूचना केल्या आहेत. या बाबतीत हापूस आंब्याच्या माध्यमातून मोठया प्रमाणात उत्पादन वाढविता येईल. कोकण रेल्वेच्या संदर्भातील चौपदरीकरणाची आणि रस्त्याच्या चौपदरीकरणाची योजना त्यांनी या ठिकाणी सुचविलेली आहे.

सन्माननीय सदस्य श्री. सुरेश देशमुख यांनी शेतकऱ्यांचे मागच्या वर्षीचे राहिलेले ठिबक सिंचनाचे पैसे मिळाले पाहिजेत तसेच चालू वर्षासाठी ठिबक सिंचनासाठी तरतूद झाली पाहिजे, अशा प्रकारच्या सूचना केल्या आहेत. सभापती महोदय, या ठिकाणी मांडण्यात आलेल्या सर्व मुद्यांचा मी निश्चितपणे खुलासा करु इच्छितो. या ठिकाणी उल्लेख करण्यात आला की, कोकणच्या भू-भागापैकी 53.45 टक्के पडीक जमीन आहे. शासनाकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार कोकणातील जमिनीचे एकूण क्षेत्रफळ जवळपास 30.12 लाख हेक्टर इतके आहे, त्यापैकी 8.03 लाख हेक्टर इतके क्षेत्र पडीत आहे. म्हणजे जवळपास 26.65 टक्के इतके पडीक क्षेत्र आहे. या क्षेत्रावर फळ झाडांची लागवड करण्याचा कार्यक्रम फलोत्पादन विभागाच्या माध्यमातून 1990-91 पासून सुरु केला आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून कोकणमध्ये प्रामुख्याने 1990-91 ते 2010-2011 पर्यंत जवळपास एकूण 3.39 लाख हेक्टर क्षेत्रावर फळबागांची लागवड करण्यात आलेली आहे. 4.56 लाख शेतकऱ्यांना फळबाग योजनेमध्ये समाविष्ट केले आहे. जवळपास 360.67 कोटी रुपये इतका खर्च शासनाने या योजनेवर केलेला आहे. फळबाग योजनेवर बऱ्यापैकी खर्च करण्याचा प्रयत्न झालेला आहे. या ठरावामध्ये सामाजिक वनीकरणाच्या बाबतीत उल्लेख करण्यात आलेला आहे. पडीक जमिनीमध्ये फळबागांची लागवड करण्यात येत असताना झाडांची लागवड सुध्दा झाली पाहिजे. त्या बाबतीत सामाजिक वनीकरणाच्या माध्यमातून सन 1982 पासून विविध वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. त्यामध्ये बांबू, साग, सिसम, आईन, खैर, किंजळ, सुरु, वड, पिंपळ, चिंच, लिंब, आवळा इत्यादी झाडांची लागवड मोठया प्रमाणात करण्यात आली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर.....

कोकण विभागात 1982 ते 2010 पर्यंत एकूण 53881.34 हेक्टर क्षेत्रावर वृक्षांची लागवड केली आहे. त्या दहा वर्षांमध्ये जवळपास 30 कोटी रुपये खर्च या लागवडीसाठी केलेला आहे. या माध्यमातून कोकणातील पडीक क्षेत्र फळबाग आणि वृक्ष लागवडीखाली कसे आणता येईल याबाबतीतील एक चांगला प्रयत्न करण्यात आलेला आहे. फळांची विक्री आणि फळांवरील प्रक्रिया याबाबत या ठिकाणी उल्लेख करण्यात आलेला आहे. स्थानिक लोकांना सहभागी करुन निश्चितपणे पुढच्या काळात याबाबत विचार करावा लागेल. काजू, करवंद या पासून वाईन तयार करण्याच्या बाबतीत तसेच आंब्याचे उत्पादन कसे वाढविता येईल, याबाबतीत प्रयत्न करावे लागतील. या वर्षी आंब्याला मोठया प्रमाणात मोहर आला होता, पण तो वादळामुळे किंवा गारपिटीमुळे कमी झालेला आहे. त्यामुळे निश्चितपणे आंब्याच्या उत्पन्नावर परिणाम झालेला दिसत आहे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर....

यासाठी निश्चितपणे कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून भविष्यामध्ये काय करता येईल ते करण्याची आवश्यकता राहील. कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून आज कोकणामध्ये जे काही संशोधन होते त्यामध्ये एक गोष्ट निश्चित आहे की, आंबा असेल किंवा काजू असेल त्यासंदर्भात संशोधन करीत असताना त्या ठिकाणी आपल्याला जास्तीत जास्त प्रक्रिया उद्योग कसे आणता येतील या दृष्टीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. आज चर्चा करतो की, पश्चिम महाराष्ट्रातील लोक कोकणामध्ये जाऊन त्या ठिकाणी प्रक्रिया उद्योग थाटण्याचा प्रयत्न करतात. त्या पध्दतीचे धाडस त्यांच्याकडे आहे. त्या पध्दतीने कोकणातील लोकांनी सुध्दा त्या ठिकाणी सहभागी व्हावे. कोकणातील लोकांना आपल्याला प्रोत्साहन कसे देता येईल...

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना माहिती देऊ इच्छितो की, यामध्ये धाडसाचा काही प्रश्न नाही. त्या ठिकाणी सरकारी पैशावर जे साखर कारखाने उभे राहिलेले आहेत त्यातील पैसा त्यांच्याकडे आहे आणि ते पैसे त्या ठिकाणी आणून प्रक्रिया उद्योग उभे करीत आहेत.

श्री. गुलाबराव देवकर : यासाठी धाडस, पैसा, मेहनत या सगळ्या गोष्टी पाहिजेत. नुसत्या पैशाने होत नाही. या ठिकाणी जो उल्लेख करण्यात आला त्या सर्व बाबतीत कृषी विद्यापीठ असेल किंवा शासनाच्या माध्यमातून आपल्याला जास्तीत जास्त प्रक्रिया उद्योग त्या ठिकाणी कसे वाढविता येतील या संदर्भात निश्चितपणे प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी कोकणातील अपूर्ण पाणलोट क्षेत्राची कामे पूर्ण झाली पाहिजेत जेणेकरुन मोठ्या प्रमाणावर पाण्याचा उपयोग करता येईल, याबाबत उल्लेख केला. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, देशात सर्वात जास्त पाऊस कोकणामध्ये पडतो. इतका पाऊस पडत असताना सुध्दा त्या पाण्याचा पाहिजे तसा उपयोग कोकणासाठी करुन घेता येत नाही. ते पाणी समुद्रामध्ये वाहून जाते. त्यासाठी सुध्दा आपल्याला जास्तीत जास्त काय उपाययोजना करुन घेता येतील यासाठी बीपीएपीच्या हरियाली आणि एकात्मिक पडीक जमीन विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून तसेच शासनाच्या इतर योजनांच्या माध्यमातून कोकणातील जी अपूर्ण कामे आहेत त्या कामांना गती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर ....

देण्याचे काम निश्चितपणे करावे लागेल. शासनाच्या जलसंधारण विभागाचा कार्यक्रम असेल, पाणलोटचा कार्यक्रम असेल, ठिबक सिंचनाचा कार्यक्रम असेल, या सगळ्या योजना जास्तीत जास्त राबवून, कोकणातील पाणी कोकणामध्ये अडवून त्या ठिकाणी कसे साठविता येईल, ते पाणी कसे जिरवता येईल यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. कोकण हा निसर्ग सौंदर्याने नटलेला प्रदेश आहे. कोकणाच्या सौंदर्याला कोठे तरी नजर लागू नये, तेथील सौंदर्यामध्ये अधिकाधिक वाढ कशी करता येईल, तेथील लोक अधिक सुंदर कसे होतील या संबंधीचा विचार आपल्याला निश्चितपणे पुढच्या काळात करावा लागेल. खरे म्हणजे आम्ही दुष्काळी भागातील आहोत. आमच्याकडे बागायती क्षेत्र कमी असून पडीक क्षेत्र जास्त आहे. आमच्याकडे कोरडवाहू क्षेत्र जास्त आहे. आपल्या कोकणामध्ये जी साधने आहेत मग आंबा असेल किंवा इतर बागा असतील त्या बघण्यासाठी आम्ही त्या ठिकाणी येतो. आमच्याकडील लोक त्या ठिकाणी फिरावयास येतात.

तालिका सभापती (ॲड. उषा दराडे) : मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छिते की, आपण केवळ जळगावचे प्रतिनिधित्व करीत नसून संपूर्ण महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करता. त्यामुळे तुमच्याकडे आणि आमच्याकडे अशी भाषा करु नये.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदया, सांगण्याचा उद्देश एवढाच आहे की, कोकण आज कोणत्याही बाबतीत कमी नाही. त्या ठिकाणी चांगली संपत्ती आहे. सन्माननीय सदस्यांनी जो उल्लेख केला त्या बाबत सांगू इच्छितो की, एकात्मिक पडीक जमीन विकास कार्यक्रमामध्ये भविष्यामध्ये वनीकरणाच्या कार्यक्रमाच्या बाबतीत 16 प्रकल्पातील जे नियोजन आहे त्यामध्ये जवळपास 1 लाख 15 हजार 197 हेक्टर क्षेत्रातील कार्यक्रम आयोजित आहे. त्या माध्यमातून सुध्दा चांगल्या प्रकारचे काम उभे करु शकतो. या ठरावाच्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांचा मी आदर करतो, स्वागत करतो. कोकणासाठी आपण ज्या काही सूचना केल्या, ज्या शिफारशी केल्या त्या बाबतीत शासन स्तरावर जास्तीत जास्त काम कसे करता येईल, जास्तीत जास्त योजनांचा फायदा त्या ठिकाणी कसा देता येईल याबाबतीत निश्चितपणे प्रयत्न केला जाईल. मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की त्यांनी आपला ठराव मागे घ्यावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, हा ठराव मागे घेण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण निर्णय घेतीलच आणि आम्ही ठराव मागे घेऊ, त्या बद्दल काही शंका नाही पण आमची अशी अपेक्षा होती की, माननीय मंत्री महोदय असे म्हणतील की, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी चांगले प्रश्न मांडलेले आहेत आणि त्याचा विचार करण्याच्या दृष्टीने कोकणातील आमदारांची एक बैठक माननीय कृषी मंत्र्यांच्या दालनामध्ये होईल.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई....

मग यासंबंधी नियोजन करुन कोकणाचा विकास करण्यासाठी निर्णय घेण्यात येईल असे तरी निदान सांगावे.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, मी मघाशी आंब्याला हमी भाव देण्याचा मुद्दा मांडला होता. शासनाने सभागृहात हमी भाव देण्याचे सभागृहात कबूल केले होते. शासन आंब्याला हमी भाव देणार काय आणि आंब्यावर प्रक्रिया करण्यासाठी शासन वेगळे धोरण आखणार आहे का ?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी सांगितल्या प्रमाणे हा निश्चितच धोरणाचा भाग आहे. यासंदर्भात माझे खाते निश्चितपणे विचार करील. पण फळझाड लागवड हा विषयच आमच्या विभागाकडे नाही, हा विषय फलोत्पादन विभागाकडे आहे. त्यामुळे मी एवढेच सांगेन की, सन्माननीय सदस्यांच्या तीव्र भावनांचा शासनाकडून निश्चितच आदर केला जाईल. (अडथळा)

तालिका सभापती (ॲड.उषा दराडे) : सभागृहाची वेळ अशासकीय ठरावावरील चर्चा संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, कोकणाला न्याय देण्यासंबंधी मंत्री महोदय घोषणा करतील या आशेने आम्ही आतुर झालो आहोत. परंतु मंत्री महोदयांनी या चर्चेची हवाच काढून टाकली आहे. हा विषय आमच्या विभागाकडे नाही असे ते म्हणाले. निदान त्यांनी काही तरी आश्वासन द्यावयास पाहिजे होते. पण त्यांनी असे म्हटल्यावर या चर्चेला काही अर्थच राहणार नाही. त्यामुळे आपण मंत्री महोदयांना निदेश द्यावेत.

श्री.गुलाबराव देवकर : ठीक आहे, कोकणातील सन्माननीय सदस्यांची या संदर्भात एक बैठक घेण्यात येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या विषयावर एवढी गंभीरपणे चर्चा झाल्यानंतर त्याचा शेवट जर अशा पध्दतीने होत असेल तर आम्हाला म्हणावे लागेल की, कोकणाच्या बाबतीत नेहमीच असे काही तरी होत असते. त्याचे पर्यावसान हसण्यामध्ये होते.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

तालिका सभापती : सन्माननीय मंत्र्यांनी बैठक घेण्याचे आश्वासन दिलेले आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना असे म्हणता येणार नाही. याबाबत मी एवढेच सांगेन की, ज्यावेळी ही बैठक घेतली जाईल त्यावेळी फलोत्पादन विभाग, सिंचन विभागाच्या सचिवांना बोलवावे. कारण झाडे लावावयाची असतील तर त्यासाठी ठिबक सिंचनाची आवश्यकता असते.

श्री.भाई जगताप : आंब्याला हमी भाव मिळाला पाहिजे या एकाच गोष्टीची आम्हाला अपेक्षा होती. त्याचप्रमाणे कोकणात शेती आहे, अन्य पिके आहेत. पीक विमा योजनेबाबत आम्ही सातत्याने आग्रह करीत आहोत, त्याबाबत मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरात उल्लेख करावा असे मला वाटते.

श्री.गुलाबराव देवकर : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी आंब्याला हमी भाव मिळण्याबाबत उल्लेख केला आहे. याठिकाणी सूचना केल्याप्रमाणे या विषयाशी सर्व संबंधित सचिवांची व सन्माननीय सदस्यांसह एक बैठक घेण्यात येईल. त्या बैठकीत ज्या सूचना केल्या जातील त्यांचा समावेश असलेला एक प्रस्ताव शासनासमोर ठेवण्यात येईल. त्या प्रस्तावात शासनाला निश्चितपणे शिफारस केली जाईल.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आता जी काही आकडेवारी दिली त्यामध्ये तफावत आहे. काही हरकत नाही. फलोत्पादनाच्या संदर्भात या राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. शरद पवार साहेब यांनी पहिल्यांदा घोषणा केली. धामापूर येथे फलोत्पादन केन्द आहे. तसेच धामापूर येथे 5 कोटीचे कृषी पर्यटन केन्द्र होत आहे. मी माननीय मंत्री महोदयांना सांगेन की, त्यांनी आमच्या धामापूर या गावी यावे. तेथे आंबा आणि काजूची रोपे दिली जातात. आपले कृषी अधिकारी आणि आपला कृषी विभाग किती सक्षम आहे हे आपण तेथे तपासावे. या वरिष्ठ सभागृहामध्ये आमच्या कोकणातील सन्माननीय सदस्यांची संख्या अधिक आहे. मी माझ्या भाषणामध्ये अशी विनंती केली होती की, या विषयाच्या संदर्भात दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांचा एक अभ्यास गट नेमावा. तसा अभ्यासगट नेमण्याची घोषणा माननीय मंत्री महोदयांनी करावी अशी मी विनंती करतो.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी जमिनीच्या क्षेत्रामध्ये तफावत असल्याचे सांगितले. भारत सरकारच्या भूसंपादन मंत्रालयाने सन 2000मध्ये केलेल्या सर्व्हेच्या आधारे हे पडीक जमिनीचे क्षेत्र 26.65 आहे असे मी सांगितलेले आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नितीन राऊत (रोजगार हमी योजना मंत्री) : सभापती महोदय, माझे आदरणीय मित्र आणि या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी एका चांगल्या विषयावर या सदनामध्ये चर्चा घडवून आणली त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेंतर्गत फलोत्पादन विकास कार्यक्रम राबविला जातो. मध्यंतरी मला कणकवलीला जाण्याची संधी प्राप्त झाली. मी तेथे हेलिकॉप्टरने गेलो. त्यावेळी मला कोकणातील निसर्ग सौंदर्य पाहाण्याची संधी प्राप्त झाली. ही संधी मला सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांच्यामुळे प्राप्त झाली. त्यावेळी मला तेथे फलोत्पादन कार्यक्रमाच्या संदर्भात जावे लागणार आहे हे माहीत नव्हते.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी जो विषय उपस्थित केला त्याचा अभ्यास झाला पाहिजे असे माझे देखील प्रांजळ मत आहे. कोकणामध्ये काजूचे उत्पादन होते. तेथे इस्त्रायलमधील तज्ज्ञ लोकांची मदत घेऊन काजूची कशा पध्दतीने लागवड करावी यासंबंधीचा अभ्यास कराता येणे शक्य आहे. मी येथे आवर्जून सांगू इच्छितो की, सामाजिक वनीकरण विभागाच्या माध्यमातून सामाजिक वनीकरणाचे नवीन धोरण आम्ही आणत आहोत. त्या धोरणामध्ये सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांचा निश्चितपणे समावेश करण्यात येईल. कोकणाला 720 कि.मी.चा किनारा लाभलेला आहे. या किनारपट्टीच्या भागात फळलागवडीला पोषक असे वातावरण आहे. मी जेव्हा कणकवलीला गेलो त्यावेळी मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटले. मला चहासाठी बोलावण्यात आले त्यावेळी मला खाण्यासाठी आंबे दिले आणि फणस देखील दिला. मी कधी फणस खात नाही. पण मी तो खाल्ला. त्यानंतर जेवताना कोकम कढी दिली. इतके चांगले पदार्थ त्या ठिकाणी होतात. मला हे सांगायचे आहे की, फळावर प्रक्रिया करणारे उद्योग त्याठिकाणी निश्चितपणे उभे राहू शकतील जेणेकरुन त्या भागातील डरडोई उत्पन्न वाढेल, रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी या ठरावावर चर्चा करताना ज्या ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांचा निश्चितपणे नवीन धोरणामध्ये समावेश केला जाईल. या ठिकाणी करण्यात आलेल्या सर्व सूचनांचा मी पुन्हा एकदा आदर करतो आणि माझे सहकारी मित्र सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांना विनंती करतो की त्यांनी आपला ठराव मागे घ्यावा.

..नंतर श्री. भोगले...

अशोधित प्रत / मुद्रणासाठी नाही

श्री.राजन तेली : मंत्री महोदय, धन्यवाद.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदया, मंत्री महोदयांनी अत्यंत समर्पक उत्तर दिले असल्यामुळे मला माझा ठराव मागे घेण्यास सभागृहाने अनुमती द्यावी.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

तालिका सभापती (ॲड.उषा दराडे) : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 28 मार्च, 2011 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 4 वाजून 10 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 28 मार्च, 2011 रोजीच्या दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही